




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार १० ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







# ‘माशी मारण्यासाठी हातोडा वापरू नका’

- आज दिल्लीत मोठे आंदोलन
- ५७ मेट्रो स्थानकांच्या प्रवेश-निर्गमनावर निर्बंध
- दिल्लीकडे जाणाऱ्या अनेक गाड्या रद्द
- सामान्य नागरिकांची गैरसोय टाळण्याचे निर्देश




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** आज दिल्लीत मोठे आंदोलन त्यामुळे सरकारने खूप कडक बंदोबस्त केला आहे-मेट्रो स्टेशन बंद करणे, गाड्या रद्द करणे, सीमांवर तपासणी वाढवणे, लोकांना अडवणे अशी पावले उचलली आहेत.यावर सुप्रीम कोर्टाने सरकारला सांगितले की सुरक्षा ठेवणे योग्य आहे, पण त्यासाठी सर्वसामान्य लोकांचे जीवन ठप्प करू नका. कोर्टाने उदाहरण देत म्हटले, ‘माशी मारण्यासाठी मोठा हातोडा वापरू नका.’म्हणजेच, समस्या जितकी आहे तितकीच कारवाई करा; जास्तीची कठोरता दाखवू नका.

**कोर्टाचा मुख्य मुद्दा असा:**आंदोलन रोखताना सामान्य नागरिकांना मेट्रो, रेल्वे आणि प्रवासाचा हक्क नाकारू नका.दुसरीकडे, दिल्ली पोलिसांनी जंतर-मंतरवरील आंदोलनाला परवानगी दिलेली नाही, पण आयोजक म्हणत आहेत की आंदोलन होणारच.

सरकार म्हणते- सुरक्षा महत्त्वाची. सुप्रीम कोर्ट म्हणते-सुरक्षा करा, पण अति करू नका. आंदोलक म्हणतात -आमचा संविधानिक आंदोलनाचा हक्क आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत होणाऱ्या ‘कॉकरोच जनता पार्टी’च्या आंदोलनापूर्वी सरकार आणि पोलिसांनी केलेल्या व्यापक सुरक्षा उपायांवर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. संभाव्य कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न रोखण्यासाठी आवश्यक कारवाई करता येईल; मात्र ती प्रमाणबद्ध असली पाहिजे, असे सांगताना सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी ‘माशी मारण्यासाठी स्लेजहॅमर वापरू नका’ अशी उपमा दिली. सर्वोच्च न्यायालयाने विशेषतः दिल्ली मेट्रोवरील मोठ्या प्रमाणातील निर्बंधांबाबत चिंता व्यक्त केली. न्यायालयाने सांगितले की, आंदोलन रोखण्यासाठी सुरक्षा उपाय करता येतात; मात्र त्यामुळे सामान्य नागरिकांच्या प्रवासाचा अधिकार आणि दैनंदिन जीवन पूर्णपणे ठप्प होता कामा नये. मेट्रो सेवा संपूर्णपणे बंद करण्याऐवजी परिस्थितीनुसार ➪(पान २ वर)

## ‘शक्ती शालिनी’ ठरणार नानांचा शेवटचा चित्रपट?

**मुंबई /प्रतिनिधी-** बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते नाना पाटेकर आता आपल्यात नाहीत. वयाच्या ७५व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने काल त्यांचे निधन झाले. नाना यांच्या निधनाच्या बातमीने त्यांचे चाहते आणि चित्रपटसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. जवळपास पाच दशकांच्या कारकिर्दीत नाना यांनी सुमारे ९० चित्रपटांमध्ये काम केलं आणि आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली. २०२६ मध्येही नाना पाटेकर अनेक प्रोजेक्ट्समध्ये दिसले. आता त्यांच्या निधनानंतर त्यांच्या शेवटच्या चित्रपटाबद्दल चर्चा सुरू झाली आहे. नाना यांना शेवटचं पडद्यावर पाहणं त्यांच्या चाहत्यांसाठी भावुक क्षण असणार आहे. नाना पाटेकर यांचा ‘शक्ती शालिनी’ हा शेवटचा चित्रपट ठरू शकतो. या चित्रपटातून त्यांना शेवटचे पडद्यावर पाहणे चाहत्यांसाठी नक्कीच भावुक असेल. हा चित्रपट मॅडॉक फिल्म्सच्या हॉरर-कॉमेडी विश्वाचा भाग आहे. आदित्य सरपोतदार यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. नाना पाटेकर यांच्यासोबत अनीत पड्डा आणि विशाल जेठवा हे कलाकार मुख्य भूमिकांमध्ये दिसणार आहेत. ➪(पान २ वर)



## भारतीय तिरंदाजांच्या प्रशिक्षकाला ३ महिन्यांपासून पगार नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारताच्या कंपाउंड तिरंदाजी संघाचे मुख्य प्रशिक्षक डेव कजिन्स गेल्या ३ महिन्यांपासून पगार न मिळाल्याने नाराज आहेत. मे महिन्यात कंपाउंड तिरंदाजी कार्यक्रमाची जबाबदारी स्वीकारलेल्या या अमेरिकी प्रशिक्षकाने थकीत रक्कम न मिळाल्यास देश सोडून जाण्याचा इशारा दिला आहे. आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया (AAI) आणि स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) यांनी देयकाला झालेला विलंब मान्य केला आहे. दोन्ही संस्थांनी ही तांत्रिक समस्या असल्याचे सांगितले. तसेच देयकाची प्रक्रिया पूर्ण केली जात असल्याची खात्री दिली. भारताच्या कंपाउंड तिरंदाजांनी जपानमध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमधील तिन्ही सांघिक प्रकारांमध्ये-पुरुष, महिला आणि मिश्र-सुवर्णपदके जिंकली. त्याचबरोबर वैयक्तिक प्रकारात एक कांस्यपदकही मिळवले. यासह त्यांनी लॉस एंजेलिस ऑलिम्पिक-२०२८ साठी या प्रकारातील पहिले कोटा स्थान मिळवले. ➪(पान २ वर)

**एशियन गेम्समध्ये ३ सुवर्णपदके मिळवून दिली होती**

**अमेरिकन कोच डेव यांनी देश सोडायचा इशारा दिला**



## बस-ट्रकच्या धडकेत ३२ बीएसएफ जवान जखमी

**बारपेटा :** आसाममधील बारपेटा जिल्ह्यातील हाउली येथे राष्ट्रीय महामार्ग २७ वर बीएसएफ जवानांना घेऊन जाणा-या बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात बीएसएफचे ३२ जवान जखमी झाले असून, बस चालकाचा जागीच मृत्यू झाला. जखमींपैकी १४ जवानांची प्रकृती गंभीर असून एकाची प्रकृती चिंताजनक आहे. गंभीर जखमींना बारपेटा मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. निवडणूक ड्युटीवरून परतत असताना जवानांची बस ट्रकच्या मागील भागावर धडकली. ही बस धुब्रीच्या दिशेने जात असताना ही धडक झाली. जखमींपैकी एकाची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. बसचालकाचा जागीच मृत्यू झाला. समसुल हक (४२) असे मयत चालकाचे नाव आहे. अपघाताची माहिती मिळताच हाउली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. पोलिस पुढील तपास करत आहेत.




## बंगळुरू विमानतळावर सोने तस्करीचा पर्दाफाश

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** बंगळुरूतील कॅम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर डीआरआयने कारवाई करत सोने तस्करीचा पर्दाफाश केला. या कारवाईत बॅगेज ट्रॉलीखाली लपवलेले १,७८,८८,३६० किमतीचे सोने हस्तगत करण्यात आले आहे. याप्रकरणी दोन प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. सोने लपवण्यासाठी वापरलेल्या ट्रॉली बॅगही जप्त करण्यात आल्या आहेत. अटक केलेले प्रवासी क्वालालंपूरहून बंगळुरूला आले होते. गुप्त माहितीच्या आधारे डीआरआयने या प्रवाशांवर पाळत ठेवत ही कारवाई केली. प्रवाशांच्या सामानाची कसून तपासणी करच डीआरआयने ट्रॉली बॅगच्या खाली लपवून ठेवलेले २४ कॅरेटचे १२००.४० ग्रॅम वजनाची १२ सोन्याची बिस्किटे जप्त केली. याप्रकरणी सीमाशुल्क कायदा, १९६२ अंतर्गत कारवाई करत दोघांना अटक केली आहे.



## ५० हजारांहून अधिक दंगलखोरांना दिल्लीत प्रवेश

■ आंदोलनाला वंचितचा पाठिंबा ■

**मुंबई :** देशातील वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर १० तारखेला दिल्लीत होणाऱ्या आंदोलनाबाबत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी गंभीर आरोप केले आहेत. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित सुमारे ५० हजार कार्यकर्त्यांना दिल्लीत प्रवेश देण्यात आला असून, शांततेने आंदोलनासाठी येणाऱ्या नागरिकांना मात्र दिल्लीच्या सीमेवर अडवले जात असल्याचा दावा त्यांनी केला. या परिस्थितीत हिंसाचार झाला तर देशात ‘गृहयुद्धासारखी परिस्थिती’ निर्माण होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आंबेडकर यांनी १० तारखेला होणाऱ्या देशव्यापी आंदोलनाला वंचित बहुजन ➪(पान २ वर)



## दिल्ली पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली



**नवी दिल्ली :** केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलनाची हाक दिली आहे. दिल्लीत १० ऑक्टोबर रोजी हे आंदोलन होणार आहे. सीजेपीने दिल्ली पोलिसांकडे आंदोलनासाठी परवानगी मागितली होती, पण पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. मागील आंदोलनात नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याचे सांगत पोलिसांनी परवानगी नाकारली आहे.एसआयआरबद्दल उपस्थित झालेले प्रश्न, केंद्रीय मुख्य ➪(पान २ वर)

## दिल्लीत नाकेबंदी, गाड्या केल्या रद्द

**नवी दिल्ली :** दिल्लीतील जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीचे उद्या १० ऑक्टोंबर रोजी आंदोलन होणार आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिस अलर्टवर आहत. मोठ्या संख्येने गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन, पोलिसांनी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनला पत्र लिहून ५७ मेट्रो स्थानकांवरील प्रवेश आणि बाहेर पडण्याचे दरवाजे बंद करण्याची विनंती केली आहे. १० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील जंतर मंतर येथे एक निदर्शन होणार आहे. या निदर्शनादरम्यान मोठी गर्दी होण्याची पोलिसांना भीती आहे. त्यामुळे, दिल्ली पोलीस आधीच सतर्क असून त्यांनी मेट्रो प्रशासनाशी संपर्क साधला आहे. डीएमआरसीला पाठवलेल्या पोलिसांच्या पत्रात ५७ मेट्रो स्थानकांचे प्रवेश आणि निर्गमन दरवाजे बंद करण्याची स्पष्ट विनंती केली आहे. प्रवेश दरवाज्यांना ➪(पान २ वर)



## एमपीएससी आंदोलनप्रकरणी १५ जणांवर गुन्हा दाखल

**पुणे//प्रतिनिधी-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) प्रलंबित मागण्यांसाठी पुण्यातील एस. एम. जोशी पुलाजवळ सुरू असलेल्या आंदोलनावर आता पोलिसांनी कायदेशीर बडगा उगारला आहे. परवानगी रद्द झाल्यानंतरही बेकायदेशीर जमाव जमवून रस्ता अडवल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी १५ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांनी प्रमोद पाटील, अक्षय कांबळे, अनिकेत देशमाने, प्रवीण महादेव पाटील, ऋषिकेश गांगुर्डे, प्रियांका चौधरी, नितीन गिते, सोमनाथ चव्हाण, ओंकार पाटील, गजानन शेळके, अजित काकडे, सिद्धार्थ पंचांगे, संकेत कणसे, सिद्धार्थ जांभुळकर आणि साहेबराव क्षीरसागर या १५ जणांवर व त्यांच्या इतर सहका-यांवर गुन्हा नोंदवला आहे. परवानगी नसताना आंदोलन करणे, चिथावणीखोर वक्तव्ये करणे आणि वाहतुकीला अडथळा आणणे असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत.



परवानगी रद्द झालेली असतानाही आंदोलकांनी कोणतीही पूर्वकल्पना न देता किंवा नव्याने परवानगी न घेता पुन्हा आंदोलन सुरू केले. सलग आठ दिवस रस्ता अडवून धरल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार वाहतुकीचा मुक्त प्रवाह कायम ठेवणे ही राज्याची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस उपायुक्त प्रशांत अमृतकर यांनी आंदोलकांना नोटीस बजावून आंदोलन मागे घेण्यास किंवा सुचविलेल्या पर्यायी जागेवर जाण्यास सांगितले होते. मात्र, पोलिसांच्या या नोटिशीकडे दुर्लक्ष करून रस्ता अडवून आंदोलन सुरूच ठेवल्याने अखेर विविध कलमांन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर परवानगी झाली होती रद्द–**विद्यार्थी प्रतिनिधींना एस. एम. जोशी पुलाजवळ २ ऑक्टोबर रोजी सशर्त आंदोलन करण्यासाठी २६ सप्टेंबरला परवानगी देण्यात आली होती. मात्र, ३० सप्टेंबर रोजी विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन मुख्यमंत्र्यांनी बहुतांश मागण्या मान्य केल्या. त्यानंतर प्रतिनिधींनी २ ऑक्टोबरचे आंदोलन स्थगित करत असल्याचे लेखी पत्र पोलिस आयुक्तांना दिले होते, ज्यामुळे आंदोलनाची पूर्वीची परवानगी आपोआप रद्द झाली होती.

## राज्यात २८३ तालुके दुष्काळी

**मुंबई /प्रतिनिधी-**राज्य सरकारने राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. तसेच नुकसानीची माहिती घेण्यासाठी पंचनामेही सुरू करण्यात आले आहेत. त्यामुळे बळीराजांना लवकरच आर्थिक मदत मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सरकारने राज्यातील ७५ टक्के तालुक्यात दुष्काळ जाहीर केला होता. यातून काही तालुके सुटले होते. त्यामुळे शेतक-यांनी नाराजी व्यक्त केली होती. विरोधी पक्षाकडूनही सरकारवर टीका करण्यात आली होती. त्यानंतर सरकारने अखेर १८ तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश केला आहे. या नव्या दुष्काळी तालुक्यातही पंचनामे करण्यात येणार असून शेतक-यांना त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.



दुष्काळ सदृश्य परिस्थिती असलेल्या तालुक्यांसाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील १८ तालुक्यांत ग्राऊंड ट्रथिंग करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. ५ प्रमुख पिकांच्या २० टक्के सर्वेक्षणाचे आदेशही काढण्यात आले आहेत. तसेच दुष्काळ सदृश्य परिस्थिती असलेल्या या १८ तालुक्यांमध्ये सर्व्हेक्षण होणार➪(पान २ वर)

## राष्ट्रपतींनी मत चोरीचा इन्कार केला नाही

### राहुल म्हणाले- आमच्याकडे पुरावे मागितले,

### सोमवारी सुप्रीम कोर्टात जाऊ; ४ दिवसांतील तिसरा मोर्चा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**’इंडिया’ (INDIA) आघाडीच्या १० खासदारांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी रात्री राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. भेटीनंतर बाहेर पडताना राहुल गांधी म्हणाले की, देशात मते चोरली जात आहेत हे संपूर्ण देशाला माहित आहे आणि राष्ट्रपतींनीही याचा इन्कार केला नाही.

दरम्यान, खरगे म्हणाले, ’आम्ही राष्ट्रपतींना मत चोरीबद्दल-विशेषतः ती कुठे झाली याबद्दल माहिती दिली. राष्ट्रपतींनी पुराव्यांची मागणी केली आहे आणि आम्ही ते गोळा करत आहोत.’ विरोधी पक्षाच्या खासदारांनी आज संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये सुमारे ३० मिनिटे चाललेली बैठक घेतली. ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात सुरू असलेल्या निदर्शनांमध्ये ममता बॅनर्जी पहिल्यांदाच सहभागी झाल्या.

गेल्या चार दिवसांत ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात विरोधी पक्षाच्या खासदारांनी आयोजित केलेला हा तिसरा मोर्चा आहे. यापूर्वी, त्यांनी ६ ऑक्टोबर रोजी ’लोकशाही वाचवा’ (Save Democracy) मोर्चा काढला होता. त्यानंतर, ७ ऑक्टोबर रोजी त्यांनी जंतरमंतर येथे निदर्शने करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना वाटेतच अडवण्यात आले. ८ ऑक्टोबर रोजी त्यांनी कनॉट प्लेस ते राजघाट असा मोर्चा काढला.



**ममता म्हणाल्या, ’आम्ही राष्ट्रपतींना निवेदन सादर केले आहे.’**

ममता यांनी सांगितले, ’आम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यांनी सांगितले की त्या या प्रकरणाकडे लक्ष देतील आणि सर्व तपशीलांची पडताळणी करतील. त्यांनी पुराव्यांची मागणी केली आणि आम्ही ते सादर करण्यास सहमती दर्शवली आहे. या मुद्द्याबाबत देशात मोठी चिंता आहे. संविधानाच्या संरक्षक म्हणून, लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी योग्य पावले उचलली जाणे आवश्यक आहे. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि या प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले.’

**राहुल म्हणाले–ज्ञानेश कुमार मत चोरी करवत आहेत**

राहुल यांनी सांगितले- राष्ट्रपतींशी झालेली भेट अत्यंत महत्त्वपूर्ण होती. जेव्हा आम्ही निवडणुका आणि मतांच्या चोरीबाबत चर्चा केली, तेव्हा राष्ट्रपतींनी त्या गोष्टीचे खंडन केले नाही. या प्रकरणाचा विचार करून योग्य ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रपतींनी आमच्याकडे पुरावे मागितले आहेत. ज्ञानेश कुमार यांनी भारताची लोकशाही नष्ट केली आहे; ते मतांच्या चोरीचे कारस्थान रचत आहेत.➪(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## पान १ व १० वरून

### शक्ती शालिनी ठरणार

कधी प्रदर्शित होणार 'शक्ती शालिनी'?

'शक्ती शालिनी' या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले असून नाना पाटेकर यांनी त्यांच्या वाट्याचे शूटिंग आधीच पूर्ण केली होती. हा चित्रपट याच वर्षी डिसेंबरमध्ये प्रदर्शित होणार होता. मात्र, निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली आहे. 'पिंकव्हिला'च्या रिपोर्ट्सनुसार, हा चित्रपट आता जानेवारी २०२७ मध्ये चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. मात्र, निर्मात्यांकडून अद्याप प्रदर्शनाची अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.

### भारतीय तिरंदाजांच्या प्रशिक्षकाला

भारताच्या कंपाउंड तिरंदाजांची आशियाई क्रीडा स्पर्धेतील सर्वात मोठी कामगिरी मिश्र सांघिक प्रकारात झाली. या सामन्यात साहिल जाधव आणि चिकिता तनीपार्थी या भारतीय जोडीने शूट-ऑफमध्ये दक्षिण कोरियाचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. निर्धारित चार एंडनंतर दोन्ही संघांची गुणसंख्या १५७-१५७ अशी बरोबरीत होती. त्यानंतर शूट-ऑफमध्ये भारतीय जोडीने बाजी मारली. कजिन्स यांच्या प्रशिक्षणाखाली भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेतील कंपाउंड प्रकारात तीन सुवर्ण आणि एक कांस्यपदक जिंकले. रिकर्व्ह आणि कंपाउंड मिळून भारताची एकूण कामगिरी पाच सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्यपदकांची राहिली. कजिन्स म्हणाले होते- ऑलिम्पिकचा कोटा मिळवणे ही मोठी कामगिरी डेव कजिन्स यांनी भारतीय कंपाउंड संघाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर खेळाडूंच्या तयारीवर आणि प्रक्रियेवर भर दिला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील यशानंतर त्यांनी म्हटले होते- 'खेळाडूंना पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरवणे हे संघाचे लक्ष्य होते.'

### माशी मारण्यासाठी हातोडा

नियमन करण्याचा विचार करावा, असे न्यायालयाने सुचवले. दरम्यान, दिल्ली पोलिसांच्या विनंतीनंतर ९ ऑक्टोबरच्या रात्री ९ वाजल्यापासून ५७ मेट्रो स्थानकांच्या प्रवेश आणि निर्गमनद्वारांवर निर्बंध लागू करण्याची तयारी करण्यात आली होती. राजीव चौक, नवी दिल्ली, सेंट्रल सेक्रेटरीएट, पटेल चौक आणि काश्मिरी गेटसह अनेक प्रमुख स्थानकांचा यात समावेश आहे. अनेक ठिकाणी इंटरचेंज सुविधा मात्र सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.दिल्लीकडे जाणाऱ्या रेल्वे वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन स्थानकांकडे येणाऱ्या अनेक मेल आणि एक्सप्रेस गाड्या रद्द किंवा नियंत्रित करण्यात आल्या आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान आणि हरियाणासह विविध राज्यांमधून दिल्लीकडे येणाऱ्या प्रवाशांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

### ५० हजारांहून अधिक

आघाडीचा पूर्ण पाठिंबा जाहीर केला. त्याचवेळी त्यांनी केंद्र सरकार, केंद्रीय गृह मंत्रालय, दिल्लीतील सुरक्षा व्यवस्था, पुण्यातील MPSC विद्यार्थी आंदोलन आणि निवडणूक प्रक्रियेबाबतही भाष्य केले. आंबेडकर म्हणाले की, त्यांच्याकडे आलेल्या माहितीनुसार भाजप आणि संघाशी संबंधित सुमारे ५० हजार कार्यकर्त्यांना हळूहळू दिल्लीत आणण्यात आले आहे. हे लोक आंदोलकांमध्ये घुसून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करतील आणि त्यानंतर पोलिसांना लाठीमार किंवा गोळीबार करण्याची संधी मिळेल, असा दावा त्यांनी केला. या कथित नियोजनामागे केंद्रीय गृह मंत्रालयाची भूमिका असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र या आरोपांच्या समर्थनार्थ स्वतंत्र अधिकृत पुरावे त्यांनी पत्रकार परिषदेत मांडले का, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही.

**'मुख्यमंत्र्यांनी Yes किंवा No मध्ये उत्तर द्यावे'**- MPSC अध्यक्षांच्या भूमिकेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका घ्यावी, असे आंबेडकर म्हणाले. 'MPSCचे अध्यक्ष बरोबर आहेत की चुकीचे? मुख्यमंत्र्यांनी जनतेला थेट Ye किंवा No मध्ये उत्तर द्यावे,' असे आव्हान त्यांनी दिले. चौकशी समित्या नेमून प्रश्न लांबणीवर टाकण्याची पद्धत योग्य नसल्याची टीकाही त्यांनी केली.निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना आंबेडकर यांनी मुंबई उच्च न्यायालयातील एका जुन्या याचिकेचा संदर्भ दिला. निवडणूक आयोगाच्या निर्णयांविरोधातील ती याचिका तांत्रिक कारणांवर फेटाळण्यात आली नसती, तर आयोगाच्या अधिकारांच्या वापराबाबत वेगळी परिस्थिती निर्माण झाली असती, असे त्यांचे म्हणणे होते. लोकशाही वाचवण्यासाठी राजकीय पक्ष आणि नागरिकांनी संविधानाच्या चौकटीत राहून आवाज उठवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेच्या शेवटी प्रकाश आंबेडकर यांनी १० तारखेला होणाऱ्या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीचा सक्रिय पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले.

### दिल्ली पोलिसांनी आंदोलनाला

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याबद्दल दोन निवडणूक आयुक्तांनी केलेल्या तक्रारींमुळे हा मुद्दा देशभरात तापला आहे. याविरोधात कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलनाची हाक दिली आहे. मुंबई, बंगळुरूनंतर आता १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत आंदोलन होणार आहे. पण, पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. सह पोलिस आयुक्त नुपूर प्रसाद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आंदोलनाच्या परवानगीचा अर्ज खूपच उशिर करण्यात आला. नियमानुसार अर्ज दहा दिवस आधी करणे अपेक्षित आहे. तशी माहिती पोलिसांना देणे गरजेचे असते. पोलिस अधिका-याने सांगितले की, कॉक्रोच जनता पार्टीला यापूर्वीही आंदोलनाची परवानगी दिली गेली होती. मागील वेळी झालेल्या आंदोलनात नियमांचे उल्लंघन केले गेले.

### दिल्लीत नाकेबंदी, गाड्या

एंट्री गेट्स आणि निर्गमन दरवाज्यांना एक्झिट गेट्स म्हटले जाते. जर हे दरवाजे बंद केले, तर प्रवासी मेट्रो स्थानकात प्रवेश करू शकणार नाहीत किंवा बाहेर पडू शकणार नाहीत. राजधानी दिल्लीत १० ऑक्टोबर रोजी होणा-या सीजेपी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्थेत प्रचंड वाढ करण्यात आली असून याचा थेट आणि मोठा फटका रेल्वे वाहतुकीला बसला आहे. नवी दिल्लीरेल्वे स्थानकाकडे जाणा-या प्रमुख मार्गांवर कडक निर्बंध व बॅरिकेडिंग लावल्यामुळे तब्बल ५,००० हून अधिक प्रवाशांना स्थानकावर वेळेत पोहोचता आले नाही आणि त्यांची ट्रेन चुकली, अशी माहिती भारतीय रेल्वेच्या अधिका-यांनी दिली आहे. याशिवाय, सुरक्षेचा उपाय म्हणून नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन स्थानकांकडे येणा-या अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या त्यांच्या मूळ (आरंभीच्या) स्थानकांवरूनच रद्द करण्यात आल्याने देशभरातून दिल्लीकडे प्रवास करणा-या प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.

### राज्यात २८३ तालुके

आहे. नांदेड, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा, भंडारा, नाशिक, सातारा, सांगली जिल्ह्यातील तालुक्यांचा या दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे.दुष्काळ जाहीर करण्यासाठी सर्वेक्षण अहवाल महत्वाचा असतो. २६५ दुष्काळी तालुक्यांमध्ये आणखी १८ तालुक्यांची वाढ होणार आहे. त्यामुळे या नव्या १८ तालुक्यातील शेतक-यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यात यंदा पाऊस अत्यंत कमी प्रमाणात पडला. अल निनोमुळे राज्यात पुरेसा पाऊस झाला नाही. त्यामुळे पिकं आली नाहीत. तसेच अनेक ठिकाणी धरणेही भरली नाहीत. त्यामुळे पिण्याच्या पाण्यापासून जनावरांच्या चा-यापासूनची समस्या निर्माण झाली आहे. त्यासाठीच सरकारने राज्यात दुष्काळ जाहिर केला आहे. सरकारने दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना केल्या आहेत. जनावरांच्या चारा आणि पाण्याची व्यवस्था केली आहे. सरकारने पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणी राखीव ठेवले आहे. उरलेले पाणी उद्योग आणि इतर गोष्टींना देण्यात येणार आहे. दुसरीकडे राज्यात केंद्राचे पथक आले आहे. या पथकाकडून नुकसानीची माहिती घेऊन अहवाल तयार केला जात आहे. हा अहवाल केंद्र सरकारकडे गेल्यावर शेतक-यांना आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### राष्ट्रपतींनी मत चोरीचा

खरगे म्हणाले, 'आम्ही राष्ट्रपतींना मतदानातील अफरातफरीबाबत-विशेषतः जिथे असा प्रकार घडला त्या ठिकाणांबाबत-माहिती दिली आहे. राष्ट्रपतींनी पुरावे मागितले असून आम्ही सध्या ते संकलित करत आहोत; आम्ही सर्व तपशील सादर करू. राष्ट्रपतींनी जनतेचा आवाज ऐकून घेतला आहे. निवडणुका ईव्हीएमऐवजी मतपत्रिकांच्या (बॅलेट पेपर्स) माध्यमातून घेतल्या जाव्यात.' काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले, 'प्रत्येक व्यक्तीच्या मतदानाच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी आम्ही हे करत आहोत; मग त्यांची विचारसरणी काहीही असो-ते आमचे समर्थक असोत किंवा टीकाकार. ज्यांच्याकडून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया मलीन आणि कलंकित करण्याचे काम केले जात आहे, त्यांना मी देशद्रोही मानतो.'

### मोतीलाल ओसवाल फायनान्सकडून

व्याजासह ३ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम भरली आहे.तरीही कंपनीकडून अजूनही ३ लाख ९४ हजार २७४ रुपयांची थकबाकी असल्याचे सांगत संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्याशिवाय घराचे सील काढणार नाही, अशी भूमिका अधिकाऱ्यांनी घेतली आहे. एका गरीब मजुराने मुद्दलापेक्षा जास्त रक्कम भरूनही पुन्हा जवळपास ४ लाखांची मागणी कशी? असा सवाल उपस्थित होत असून कंपनीच्या व्याज आकारणी पद्धतीवरच संशय व्यक्त केला जात आहे.आता प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते आणि या बेघर झालेल्या कुटुंबाला त्यांच्या हक्काचे घर कधी परत मिळते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार-आ.गजानन लवटे

या अमानुष प्रकाराची दखल अंजनगाव सुर्जीचे आमदार गजानन लवटे यांनी गंभीरपणे घेतली आहे.'ऐन दुष्काळात एका भूमिहीन शेतमजूर कुटुंबाला मुलाबाळांसह घरातून बाहेर काढून रस्त्यावर आणणे हा माणुसकीला काळिमा फासणारा आणि अत्यंत निंदनीय प्रकार आहे. फायनान्स कंपन्यांनी वसुली करताना माणुसकी तरी दाखवली पाहिजे,' अशा तीव्र शब्दात आमदार लवटे यांनी संताप व्यक्त केला आहे.त्यांनी या प्रकरणी तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आणि विवेक रामेकर कुटुंबाला तातडीने न्याय देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मोतीलाल ओसवाल फायनान्स कंपनीच्या कर्ज वसुलीच्या पद्धतीची आणि अवाजवी व्याज आकारणीची देखील चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

### श्री शिवाजी शिक्षण

ठिबक सिंचन, गोबर गॅस, दुग्ध व्यवसाय, सेंद्रिय शेती, गांडूळ खत युनिट, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती करणारी महिला व शेती करणारा पुरुष तसेच परिसरातील शेतकरी व शेतकरी महिलांना मार्गदर्शन करणारे व त्यांना प्रोत्साहन देऊन विविध उपक्रमात सहभागी करून घेणारे शेतकरी या पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करू शकतील. पीक स्पर्धा, कृषी प्रदर्शन, कृषी मेळावे यात सहभाग घेणारे, कृषी संस्थांना भेटी तसेच कृषी विषयक प्रचार व प्रसार करून शेतकरी व महिला शेतकऱ्यांना उन्नत शेती संबंधित मार्गदर्शन करणारे महिला आणि पुरुष शेतकरी देखील या पुरस्कारासाठी पात्र आहेत. प्रस्ताव पाठविताना सोबत वर उल्लेख केलेल्या विविध कार्याची प्रमाणपत्रे, पुरस्काराची प्रमाणपत्रे, शेतीचा सातबारा व आठ अ आणि प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे असे यावेळी सांगण्यात आले. या पुरस्कारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या प्रेरणेने व त्यांनी दिलेल्या निधीच्या व्याजातून रोख १,११,१११ रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ ,असे महिला शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी' पुरस्काराचे स्वरूप आहे. तर केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृष्ट शेतकऱ्याला स्व.शरद जोशी स्मृती उत्कृष्ट शेतकरी पुरुष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूपही १,११,१११ रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र शाल व श्रीफळ असे आहे. या पुरस्कार योजनेसाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड .जे. व्ही.पाटील यांच्या अध्यक्षतेत पुरस्कार निवड समिती गठित करण्यात आली असून श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती हे पुरस्काराचे संपूर्ण कामकाज पाहणार आहे. या पुरस्कार समितीमध्ये संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा.सुभाष बनसोड यांचा समावेश असून समिती सचिव म्हणून श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. समीर लांडे हे काम पाहत आहेत.या पुरस्कारासाठी प्रस्तावाचा नमुना श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या मोर्शी रोड, अमरावती येथील कार्यालयात तसेच महाविद्यालयाच्या 'डब्ल्यु डब्ल्यु डब्ल्यु.एसएसएसी पिडीकेव्ही.ओआरजी'(www .ssacpdkv.org) या वेबसाईटवर उपलब्ध असून दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत हे प्रस्ताव सादर करावयाचे आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मुख्य. कार्यालयातील सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेला पुरस्कार निवड समितीचे सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा.सुभाष बनसोड, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.वि.गो. ठाकरे, पुरस्कार निवड समितीचे सचिव प्राचार्य डॉ. समीर लांडे, प्राचार्य डॉ.नंदकिशोर चिखले, प्राचार्य सी.एम. देशमुख, प्राचार्य राजेश खाडे, प्राचार्य अभय ढोबळे व डॉ.कुमार बोबडे उपस्थित होते.

### मोर्शीत काँग्रेस कमेटी

विचारण्यात आला. यावर कार्यकारी अभियंता यांनी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचा व शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून लवकरच सर्व समस्याचे समाधान करण्याचे आश्वासन याप्रसंगी दिले.या धरणे आंदोलनाला विपुल भडांगे सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटी, भुषण कोकाटे शहराध्यक्ष तथा नगरसेवक, अल्पजा बडासे तालुकाध्यक्ष महिला काँग्रेस, रमा इंगळे तालुकाध्यक्ष महिला काँग्रेस अनु जाती सेल, निलेश तट्टे सेवादल अध्यक्ष, वासुदेव तायवाडे, गोलु शेख, मुरलीनाना डहाणे, संजय पांडव , संदीप भदाडे,यांनी संबोधित केले. याप्रसंगी पंकज विधळे, निलेश तट्टे, मुरलीनाना डहाणे, अल्पजा बडासे, रमा इंगळे, बबिता बोरेकर, सुनीता कुमरे, सविता ठाकरे, पुष्पा परतेती, गोलु शेख, यादवराव चोपडे, वसीम कुरेशी,अमर कदम,प्रकाश काळे, जावेद पठाण,हितेश साबळे,सुहासराव ठाकरे, केशवराव पांडे, गजानन ठाकरे, प्रफुल्ल चिखले, संदीप भडादे, सुरज अवचार, अन्सार कुरेशी, देवेंद्र गोरडे, ओम चांगोले, नितीन लुंगे, बबलू अंधारे, अभि झोड,सय्यद फैझान, दादाराव वानखडे, पंकज वाघमारे,यश पांडे तसेच इतर अनेक काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

### भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी

त्यांचा हा प्रवास इतक्या दुःखद वळणावर येऊन थांबेल, याची कल्पनाही कुणाला नव्हती.मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथे असताना बाबूजी नळकांडे यांनी आपल्या नातवाशी फोनवर संवाद साधला. यावेळी त्यांनी आपण घरी येत असल्याचे सांगितले. कुटुंबीयांसाठी हा नेहमीसारखा संवाद होता. मात्र तोच संवाद अखेरचा ठरेल, याची कुणालाही कल्पना नव्हती.या संवादानंतर काही मिनिटांतच पुणे रेल्वे स्थानक परिसरात ते रेल्वे रुळांवर अचानक कोसळल्याची घटना घडली. या घटनेत त्यांना दुखापत झाली. त्यानंतर रेल्वे पोलीस प्रशासनाने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही काही तासांनी त्यांना मृत घोषित करण्यात आले. बाबूजी नळकांडे यांचा मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.ते रेल्वे रुळांवर नेमके कसे कोसळले, त्यामागे अचानक आलेली प्रकृतीची समस्या होती की अन्य काही कारण, याबाबत अधिकृत माहिती समोर येणे आवश्यक आहे.विशेष म्हणजे बाबूजी नळकांडे यांची ओळख केवळ भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी म्हणून नव्हती, तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काम करणारे नेते म्हणूनही होती. आपल्या कार्यकाळात त्यांनी शेतकऱ्यांपर्यंत विविध योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेणे, त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे आणि पक्षाच्या माध्यमातून लोकहिताची कामे करणे, ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये होती.

### अमरावती शिक्षक मतदार

प्रहार जनशक्ती पार्टीचे नितीन आगे, पोहरा बंदीचे महंत सुनील महाराज आणि साजिद खान खलीद खान यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. या चार उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर आता निवडणुकीच्या रिंगणात एकूण २६ उमेदवार शिल्लक राहिले आहेत.

**दत्तात्रय लहाने आणि अदिती पोहरेमध्ये मैत्रीपूर्ण लढत-**

महायुतीत पेच असताना महाविकास आघाडीतही आलबेल नाही. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आधीच बुलढाणा जिल्ह्यातील दत्तात्रय लहाने यांना उमेदवारी बहाल केली होती. दुसरीकडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांच्या कन्या प्रा. अदिती पोहरे यांचा काही दिवसांपुर्वी काँग्रेस पक्षात प्रवेश झाला, लगेच त्यांना उमेदवारीही जाहीर केली. या दोन पक्षांमध्ये आता मैत्रिपूर्ण लढत होणार आहे. शिक्षक संघटनांचे विविध उमेदवार देखील रिंगणात आहेत. या निवडणुकीत मतविभागणीचा फटका कोणाला बसणार याचे आडाखे बांधले जात आहेत.

**हे उमेदवार आहे रिंगणात-** माघारीनंतर निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांमध्ये शिवसेनेचे किरणराव रामराव सरनाईक, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे दत्तात्रय श्रीराम लहाने, काँग्रेसच्या अदिती ऋषिकेश पोहरे, बळिराजा पार्टीचे प्रा. अनिल मधुकरराव काळे, भारतीय जनसम्राट पार्टीचे गजानन गोविंदराव धोके आणि समाजवादी गणराज्य पार्टीचे सुरेश बाबूराव देवकर यांचा समावेश आहे. या शिवाय अपक्ष उमेदवारांमध्ये अविनाश मधुकर बोरडे, अशोक वामन हिवाळे, आशीष मनोहर अंबुलकर, उपेंद्र बाबाराव पाटील, किरण अर्जुन चौधरी, किरण अर्जुन पवार, गजानन रामचंद्र उल्हे, दिलीप भीमराव कडू, डॉ. प्रशांत विश्वेश्वर विधे, चंद्रशेखर उर्फ शेखर मनोहरराव भोयर, मिलिंद तुकाराम ब्राह्मणे, राजेशकुमार शालिग्राम कड, रामदास संपतराव कटक, विनोद प्रल्हाद कडू, प्रा. डॉ. श्रीकांत गोविंद देशपांडे, श्रीकृष्ण सूर्यभान पहुरकर, सुनील दुर्गादास राठोड, डॉ. संगीता संचिंद शिंदे-बोंडे, सुमित सुरेशराव पवार, प्रा. डॉ. संतोष श्रीकृष्ण हगे आणि हेमलता दिलीपसिंग मुणोत यांचा समावेश आहे.

### दारूच्या नशेत मारहाण

एकमेकांवर लाठ्या-काठ्या, दगड आणि लोखंडी रॉडने हल्ला करण्यात आला. या तुंबळ हाणामारीत ५ जणांच्या डोक्याला, चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली आहे. जखमींमध्ये महिलांचाही समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना ग्रामीण रुग्णालयात हलवले. प्रकृती गंभीर असल्यामुळे तिघांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पुढील तपास दर्यापूर पोलीस करीत आहेत.

### केंद्रीय पथकाकडून अमरावती

सहसंचालक गणेश घोरपडे आदी उपस्थित होते. केंद्र शासनातर्फे राज्यातील दुष्काळ पाहणीसाठी ११ सदस्यांचे पथक नियुक्त करण्यात आले असून, त्यात कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. बैठकीत अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांच्या जिल्हाधिका-यांकडून जिल्ह्यातील दुष्काळी स्थितीबाबत सादरीकरण करण्यात आले. पावसाच्या कमतरतेमुळे निर्माण झालेली स्थिती, पीक नुकसान, पाणी उपलब्धता व टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता या बाबींकडे जिल्हाधिका-यांनी केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले. विभागातील पाचही जिल्ह्यातील पावसाची स्थिती, शेतीपिकांचे नुकसान, जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती यावेळी पथकाने घेतली. विभागात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. उपलब्ध जलस्त्रोत, तळी, गावांमधील पाण्याचे स्रोत आणि त्यांची सद्य:स्थिती याबाबतही केंद्रीय पथकाला माहिती देण्यात आली. कृषी सहसंचालक घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा यांनी सूत्रसंचालन केले. बैठकीनंतर केंद्रीय पथकाने जिल्ह्यात विविध गावांना भेटी देऊन दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी केली. पथकाकडून दुष्काळग्रस्त भागातील पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि प्रत्यक्ष परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन होणार आहे. त्यानुसार दुष्काळाची वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती केंद्र सरकारसमोर मांडली जाणार आहे.केंद्रीय पथकाने वाशिम जिल्हा दौऱ्यात विविध गावांना भेटी देऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली व शेतक-यांशी संवाद साधून त्यांची व्यथा जाणून घेतली. वाशीम तालुक्यातील सुपखेला येथे दयाराम विठ्ठल राऊत यांच्या शेतीला भेट देऊन नुकसान पाहणी करण्यात आली. त्यानंतर मंगरूळपीर तालुक्यातील स्वासिन येथील लघु पाटबंधारे प्रकल्पाची पाहणी करून परिसरातील पाणीटंचाईचा आढावा पथकाने घेतला, त्याचप्रमाणे कोठारी येथे दिलीप दुबळगुंड यांच्या शेताची पाहणी करण्यात आली.

दौऱ्याच्या पुढील टप्प्यात पथकाने मानोरा तालुक्यातील कुपटा येथे मोहम्मद सादिक मोहम्मद शफी यांच्या, तसेच कारंजा तालुक्यातील काळीकारंजा येथे त्र्यंबक फकिरा गुल्हाने व पानविहीर येथे रमेश भाऊराव यांच्या शेताला भेट देऊन पीक नुकसानाची प्रत्यक्ष पाहणी केली व शेतक-यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर केंद्रीय पथक यवतमाळ जिल्ह्याकडे रवाना झाले.

### अभिजात मराठीचा अभिमान

मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती विभाग संचालक डॉ. श्यामकांत देवरे, मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे आदी उपस्थित होते.

डॉ. सामंत म्हणाले, संत गाडगेबाबा यांच्या नावाने स्थापन झालेल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गुलाबराव महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांची प्रेरणा घ्यावी. यावेळी डॉ. सामंत यांनी दुष्काळी परिस्थितीमध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयांची माहिती देतांना दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्याची विद्यापीठांनी शंभर टक्के अंमलबजावणी करावी. तसेच शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी शासन प्रयत्नशील असून शेतकी व शैक्षणिक कर्जाच्या वसुलीसाठी बँकांकडून अनुचित सक्ती होत असल्यास तक्रार करावी, असेही डॉ. सामंत म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, सप्ताहनिमित्त उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील व उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये विविध कार्यक्रम संपन्न होत आहे. अभिजात मराठी भाषेचा इतिहास, साहित्य संपदा आणि सांस्कृतिक परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असून या सप्ताहानिमित्त विद्यापीठाने विविध उपक्रम राबविले आहेत. तसेच मराठी भाषेच्या अभ्यासकांचे व्याख्यान व विविध स्पर्धा घेण्यात आल्याचे सांगून अभिजात मराठी भाषेच्या अध्ययन व संशोधनाला चालना मिळावी, याकरिता विद्यापीठात स्वतंत्र अध्यासन स्थापन करण्याचा प्रस्ताव लवकरच विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. सांस्कृतिक कार्यक्रम 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' मध्ये अभिजित कोसंबी, प्रसन्नजीत कोसंबी व त्यांच्या चमूने उत्कृष्ट गायन, संगीत कला अकादमी पुरस्कारप्राप्त सुभाष नकाशे व त्यांच्या चमूने नृत्य सादर करुन उपस्थितांची मने जिंकली, तर सुंदर व सुरेल गितांनी प्रेक्षकही मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे निवेदन मराठी अभिनेते दिगंबर नाईक यांनी केले.प्रारंभी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी नटसम्राट नाना पाटेकर यांना सुरुवातीला श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. डॉ. मिलींद बारहाते यांनी ना. डॉ. उदय सामंत यांचा विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. प्रास्ताविक डॉ. मोना चिमोटे, संचालन डॉ. अभिजित इंगळे, तर आभार डॉ. प्रणव कोलते यांनी मानले.

### अंबा- एकविरा देवी

दिल्या. या दरम्यान आयुक्तांनी मंदिर परिसरात करण्यात आलेल्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. त्यांनी मंदिर संस्थानच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून नवरात्रौत्सव काळात येणाऱ्या भाविकांची गर्दी, मंदिर परिसरात लागणाऱ्या दुकानांबाबत माहिती घेतली. तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवणे आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.त्यांच्या सोबत पोलीस उपायुक्त शाम घुगे, यशवंत सोळंके, प्रल्हाद सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खाडे यांच्या सह कोतवाली आणि राजापेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.नवरात्रौत्सव दरम्यान दोन्ही देवींच्या मंदिरात मोठ्या संख्येने महिला भाविक दर्शनासाठी येत असतात. हे लक्षात घेता पोलीस प्रशासन महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विशेष सतर्कता बाळगत आहे. पोलीस उपायुक्त प्रल्हाद सोनवणे यांनीही दोन-तीन दिवसांपूर्वी मंदिर परिसराची पाहणी करून महिलांच्या सुरक्षेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. माहिती नुसार, दोन्ही मंदिरांमध्ये सुमारे १५० पोलीस कर्मचारी तैनात राहणार आहेत. तसेच शहरातील १० पोलीस ठाण्यांच्या क्षेत्रातही कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे, जेणेकरून नवरात्रौत्सव शांततेत आणि सुरक्षितपणे पार पडेल.

### जिल्हा बँकेत 'ङाशासक

वेगवान होण्याची शक्यता असून मतदार यादीचे काम वेगात होणार आहे.

बँकेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ रविवार, ४ ऑक्टोबर रोजी संपला होता. त्यानंतरही प्रशासकाची नियुक्ती आणि संचालकांनी पदावर राहण्याच्या अधिकारावरून कायदेशीर प्रक्रिया सुरू होती. बँकेचे अध्यक्ष तथा आमदार बच्चू कडू यांच्यासह ११ संचालकांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात करण्यात आलेल्या सुधारणेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. याचिका कर्त्यांनी 'अ' वर्गातील सहकारी संस्थांना संचालक मंडळाच्या कार्यकाळाच्या विस्ताराशी संबंधित संरक्षणाबाहेर ठेवणे हे भेदभावपूर्ण आणि असंवैधानिक असल्याचे म्हटले होते. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या खंडपीठाच्या निर्णयामुळे कार्यकाळ संपल्यानंतरही संचालक मंडळाच्या पदावर राहण्याचा मार्ग बंद झाला. न्यायालयाने स्पष्ट केले की, पाच वर्षांची वैधानिक मुदत संपल्यानंतर संचालकांना पदावर राहण्याचा कोणताही अधिकार नाही.न्यायालयाच्या निकालाची प्रत विभागीय सहनिबंधक कार्यालयाला मिळाल्यानंतर प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया पुढे सरकली. यापूर्वी ५ ऑक्टोबर रोजी प्रशासक नियुक्तीवर आक्षेप घेणारी याचिकाही न्यायालयाने फेटाळली होती. त्यानंतर निवर्तमान संचालक मंडळाचे अधिकार संपुष्टात आले आणि बँकेचा कारभार प्रशासकाकडे सोपवण्याचा मार्ग मोकळा झाला. आता विभागीय सहनिबंधक श्रीनिवास पांढरे हे बँकेचे कामकाज सांभाळतील. प्रशासक म्हणून त्यांची नियुक्ती झाल्यामुळे बँकेचे सर्व प्रशासकीय निर्णय आणि दैनंदिन व्यवहार आता नवीन व्यवस्थापनाच्या अधीन असतील. नवीन संचालक मंडळाची स्थापना होईपर्यंत बँकेची संपूर्ण जबाबदारी प्रशासकावर राहणार आहे.

### ५० हजारांच्या खरेदीवर

Couchpuffy मध्ये २०० हून अधिक सोफा डिझाइन्स, १०० हून अधिक डायनिंग टेबल डिझाइन्स आणि ५० हून अधिक इम्पोर्टेड बेडरूम सेट उपलब्ध आहेत. याशिवाय टीव्ही युनिट, प्रीमियम झुले, आउटडोअर फर्निचर, होम थिएटर रिक्लायनर, मसाज चेअर आणि इतर फर्निचरचीही मोठी रेंज उपलब्ध आहे. येथे ग्राहकांना लेदर, फॅब्रिक, एल-शेप आणि महाराजा सोफा यांसह वेगवेगळ्या डिझाइन आणि बजेटमधील पर्याय मिळतात. डायनिंग टेबलमध्ये मॉडर्न, इटालियन, मार्बल आणि ओनिक्स डिझाइनची रेंज उपलब्ध आहे.

Couchpuffy मध्ये ५० हून अधिक इम्पोर्टेड बेडरूम सेट ४९,९०० पासून सुरू होतात. बेडरूम सेटमध्ये किंग साइज बेड, वॉर्डरोब, साइड टेबल आणि ड्रेसिंग टेबलचा समावेश आहे. तसेच बेडरूम सेटवर मोफत इन्स्टॉलेशनची सुविधा देखील उपलब्ध आहे.

घर सुंदर बनवण्यासाठी Couchpuffy मध्ये खास होम डेकोर गॅलरी देखील आहे. येथे वॉल क्लॉक, लॅम्प, पेंटिंग, फोटो फ्रेम, प्लांटर, कलाकृती, पितळेच्या सजावटीच्या वस्तू आणि इतर अनेक होम डेकोर उत्पादने उपलब्ध आहेत. होम डेकोरची किंमत ४९९ पासून सुरू होते.

Couchpuffy ने २०,००० चौरस फुटांचे स्वतंत्र ऑफिस फर्निचर शोरूम देखील सुरू केले आहे. ऑफिस टेबल, चेअर, कॉन्फरन्स टेबल, रिसेप्शन आणि लॉबी सेटअपसह कार्यालयासाठी आवश्यक असलेल्या फर्निचरची संपूर्ण रेंज येथे उपलब्ध आहे. पहिल्या १०० ग्राहकांसाठी BUY १ GET १ ऑफिस चेअर मोफतचा विशेष ऑफर देखील दिला जात आहे.रॉयल फेस्टिव्ह सेलदरम्यान ग्राहकांना फर्निचरच्या खरेदीवर- ५०,००० च्या खरेदीवर ७,५०० चे होम डेकोर मोफत ,७५,००० च्या खरेदीवर ११,९०० ची ऑफिस चेअर मोफत.

रॉयल फेस्टिव्ह सेलदरम्यान ग्राहकांना फर्निचरच्या खरेदीवर-

५०,००० च्या खरेदीवर ७,५०० चे होम डेकोर मोफत, ७५,००० च्या खरेदीवर ११,९०० ची ऑफिस चेअर मोफत, १,००,००० च्या खरेदीवर १९,९०० चा प्रीमियम रिक्लायनर मोफत मिळणार आहे. ५०,००० च्या खरेदीवर ग्रैंड लकी ड्रॉमध्ये प्रवेश. ५०,००० किंवा त्याहून अधिक प्रत्येक खरेदीवर १ लकी ड्रॉ कूपन मिळेल. ग्रैंड लकी ड्रॉमध्ये ग्राहकांसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. पहिले बक्षीस - इलेक्ट्रिक स्कूटर, दुसरे बक्षीस - मसाज चेअर, तिसरे बक्षीस ५५ इंच QLED टीव्ही , चौथे बक्षीस - प्रीमियम झुला, ५ इतर विजेत्यांना प्रीमियम होम डेकोर गिफ्ट हॅम्पर्स.

ग्राहकांसाठी एक्सचेंजची सुविधाही उपलब्ध आहे. जुन्या फर्निचरच्या बदल्यात नवीन फर्निचर घेण्याचा पर्याय Couchpuffy मध्ये उपलब्ध आहे. तसेच ०% व्याजाचा Bajaj फाइनेंस सुविधा देखील उपलब्ध आहे. काउचपफी फर्निचर्स - १ लाख चौरस फुटांचा प्रीमियम फर्निचर आणि होम डेकोर मॉल, ड्रीमलैंड बिझनेस पार्क, रहाटगाव रोड, बमरावती. रॉयल फेस्टिव्ह सेल आणि ग्रैंड लकी ड्रॉ मर्यादित कालावधीसाठी आहे.

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती
यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१९२३/२०२६
Rahul Sahebrao Khadse + 3 Versus NIL
पुढील ता.२८.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants :-

1. Rahul Sahebrao Khadse, **Age 41 yrs. Occ.- Labour**
2. Prashant Sahebrao Khadse, **Aged 39 yrs. Occ.- Labour**
   **(Applicant No.1 & 2)**
   **R/o. Nr. Gajanan Maharaj Mandir, Mahadev Khori, Rukhmini Nagar**
   **SO, Amravtai, Tq. & Dist. Amravati 444 606**
3. Suchita Mahendra Dahake, **Age 43 yrs. Occ.- Household**
   **R/o.Bhujwada, Takali, Tq. Anjangao Surji, Dist. Amravati**
4. Kalpana Vijayrao Bhojane, **Age 40 yrs. Occ.- Household**
   **R/o. Aasara, Tq. Bhatkuli, & Dist. Amravati**

-- Versus --

Non-Applicant - NIL

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत Sahebrao Bhimrao Khadse **हे दिनांक** २२.१०.२०२३ **रोजी** अमरावती : Manda Sahebrao Khadse **हया** दि.०२.११.२०२१ **रोजी** नागपूर **येथे मयत झाले.** Rahul Sahebrao Khadse +3 Versus NIL **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** Rahul Sahebrao Khadse +3 Versus NIL **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.१५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती
यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२०७८/२०२६
Noor Jahan w/o. Sayyed Imran + 3 Versus NIL
पुढील ता.१७.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants :-

1. Noor Jahan w/o. Syyed Imran, **Aged 53 yrs. Occ.- Household**
2. Sayyed Adnan s/o. Sayyed Imran, **Aged 26 yrs. Occ.- Business**
3. Sayyed Ilhan S/o Sayyed Imran, **Aged about 24 yrs. Occ.- Business**
   **All R/o.Near Masjid e Quba, Maulana Azad Colony,**
   **Amravati, Tq. & Dist. Amravati**
4. Naziya Parveen w/o. Aaquib Javed, **Aged 28 yrs. Occ.- Household**
   **R/o. Near Masjid e Quba, Maulana Azad Colony,**
   **Amravati, Tq. & Dist. Amravati**

-- Versus --

Non-Applicant - NIL

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत Syyad Imran s/o Syyed Ahmad **हे दिनांक** १५.०९.२०२० **रोजी** अमरावती **येथे मयत झाले.** Noor Jahan w/o. Sayyed Imran +3 Versus NIL **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** Noor Jahan w/o. Sayyed Imran +3 Versus NIL **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.०६.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पंचायत समिती रिसोडमध्ये दलालांचा रुबाब ? शेतक-यांच्या पैशांचा हिशेब कोण घेणार ?

■ प्रतिनिधी | रिसोड ■

पंचायत समिती रिसोडच्या कार्यालय परिसरात विविध शासकीय योजनांच्या कामांसंदर्भात काही कथित मध्यस्थांची वारंवार ये-जा होत असल्याचे चित्र दिसत असून, यामुळे प्रशासनाच्यां कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. घरकुल, विहीर, पांदण रस्ते, नाला सौंदर्गीकरण, गाळ काढणे, स्मशानभूमी सौंदर्याकरण, फळबाग आदी कामांसाठी शेतकरी व लाभार्थ्यांना कार्यालयीन प्रक्रियेसाठी कोणाची मदत घ्यावी लागते, हा प्रश्न आता चर्चेत आला आहे. विशेष म्हणजे, काहीं मध्यस्थ शेतकरी व लाभार्थ्याकडून पैशांची मागणी करतात किंवा पैसे घेतात, अशा स्वरूपाच्या तक्रारी त्यांनंतर पंचायत समिती कार्यालयात येऊन असल्याची चर्चा आहे. संबंधित व्यक्ती अधिकारी-कर्मचाऱ्यांसमोर




रुबाबात असल्याचे चित्र दिसत असल्याने सामान्य लाभार्थ्यामध्ये नाराजी व्यक होत आहे.

## कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासा !

पंचायत समिती कार्यालयात कोण कोण येते, कोणत्या कामासाठी येते आणि कोणत्या अधिकारी-कर्मचाऱ्यांशी वारंवार संपर्कात असते, याची चौकशी केल्यास अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात. त्यामुळे कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासावे, तसेच संबंधित योजनांच्या लाभार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे पैसे मागितले गेले आहेत का, याची गोपनीय पद्धतीने चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

## चौकशी करून सत्य समोर आणण्याची गरज'

पंचायत समिती प्रशासनाने या प्रकरणाकोड गंभीरतेने पाहुन संबंधित योजनांच्या लाभार्थ्यांकडून लेखी तक्रारी मागवाव्यात, मागील कालावधीतील कामांची तपासणी

## सरकारी योजना की 'मध्यस्थां'ची व्यवस्था ?

शासनांच्या योजना थेट पात्र लाभार्थ्यांपर्यत पोहोचाव्यात, यासाठी ऑनलाइन प्रक्रिया, ग्रामपंचायत स्तरावरील पडताळणी आणि विविध प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असताना लाभार्थ्यांना बाहेरील व्यक्तींच्या माध्यमातून कामे करून घेण्याची वेळ का येते? हा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. जर एखाद्या शासकीय योजनेचा लाभमिळवून देण्यासाठी लाभार्थ्यांकडून अनधिकृतपणे पैसे घेतले जात असतील, तर हा प्रकार अत्यंत गंभीर असून त्याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.पंचायत समिती रिसोड नि. वाशिम पंचायत समिती रिसोड कार्यालय परिसरात दलालांची ये-जा होत असल्याचा आरोप होत आहे.

करावी, लाभार्थ्यांकडून पैसे घेतल्याच्या तकनीकी चौकशी करावी आपि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## मुख्य कामे कोणती ?

घरकुल, विहिरी, पांदण रस्ते, नाला सौंदर्गीकरण, गाळ काढणे, स्मशानभूमी सौंदर्याकरण, फळबाग लाभार्थ्याकडून पैशांची मागणी? तपासणीची मागणी अधिकाऱ्यांचा आशीर्वाद की प्रशासनाचे दुर्लक्ष ? काही व्यक्ती कार्यालयात येऊन लाभार्थ्यांच्या लाभार्थ्यांच्या कामांमध्ये हस्तक्षेप करत असतील, तर त्यांना कोणाचे पाठबळ आहे? अधिकारी-कर्मचाऱ्यांना या कथित मध्यस्थांच्या हालचालींची माहिती आहे का? अधिकाऱ्यांच्या नजरेसमोर हा प्रकार सुरू आहे की प्रशासनाला याची कल्पनाच नाही? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

# वाकद गावातील पाणीटंचाई दूर करा; अतिक्रमणे नियमाकुल करा! सय्यद अकिल

## शिवसेना पदाधिकाऱ्यांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन; अन्यथा आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील वाकद गावामध्ये निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई तात्काळ दूर करावी, तसेच गावातील अतिक्रमणांमध्ये वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या अतिक्रमणांबाबत नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी शिवसेनेचे वाशिम जिल्हा संघटक अकील हुसेन सय्यद यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती रिसोड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, वाकड गावामध्ये अनेक वर्षांपासून पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. गावात जलजीवन मिशन योजनेचे काम जवळपास ८० टक्के पूर्ण झाले असून, गाव अंतर्गत सर्विस पाइपलाइनचे कामही मोठ्या प्रमाणात झाले आहे. नळजोडण्या देण्यात आल्या असून, धरणातून गावात उभारलेली पाणी टाकीपर्यंत पाइपलाइन टाकण्यात आली आहे.



तसेच ग्रामपंचायत क्षेत्रातील मालकीच्या विहिरींमधूनही पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, एवढ्या सुविधा उपलब्ध असूनही गावकऱ्यांना हक्काचे पाणी मिळत नसल्याची तक्रार निवेदनात करण्यात आली आहे. या समस्या निकाली काढण्यासाठी पंचायत समिती मध्ये अनेक निवेदने मोर्चे आंदोलन करण्यात आले आंदोलन झाले तर किंवा आंदोलनाचा इशारा देण्यात आला तर गावात मोजक्या कालावधी साठी पाणी सोड ण्यात येते परत कारण नसताना गावातलं सुरू असलेलं पाणी बंद केल्या जातो हे प्रशासनाचा गावकऱ्यावर एक प्रकारे अत्याचार म्हणाव लागेल आज रोजी परत या निवेदनाद्वारे आपल्याला विनंती करण्यात येते की कायम सुरळीत पाणीपुरवठा गावासाठी सुरू करण्यात यावा तसेच गावामध्ये अनेक वर्ष पासून अतिक्रमण मध्ये वास्तव करणारे सर्व अतिक्रमण धारकांना मालकीची आठवण देण्यात यावी अन्यथा आपल्या कार्यालय समोर आमचे सर्व सहकारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आमरण उपोषण करण्यात येईल होणाऱ्या परिणामास आपण स्वतः जबाबदार राहाल असं थेट इशारा गट विकास अधिकारी यांना सय्यद अखिल यांनी दिला निवेदन प्रतिलिपी विधान परिषद आमदार सन्माननीय भावनाताई गवळी यांना तसेच जिल्हा अधिकारी साहेब यांना तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम तसेच तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व रिसोड पोलीस निरीक्षक यांना दिले.

# मोठेगाव शेत शिवारात सोयाबीनच्या गंजीला आग



■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील मोठेगाव शेत शिवारात शेतात काढून ठेवलेल्या सोयाबीनच्या सुडीला अज्ञात व्यक्तींने आग लावल्याची दिनांक ७ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या दरम्यान घटना घडली असुन सोयाबीन जळून खाक झाला. या आगीमध्ये शेतकरी ज्ञानेश्वर भगवानराव देशमुख यांचे अंदाजे ९० हजार रुपयांचा नुकसान झाले आहे याप्रकरणी रिसोड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. शेतकरी ज्ञानेश्वर देशमुख निवासी करडा यांच्या आई संध्या भगवानराव देशमुख यांच्या नावावर मोठेगाव शिवार मध्ये तीन एकर शेती आहे. दिवसभर सदर तीन एकरातील सोयाबीन हे कापून गंजी मारून ठेवले होते. ७ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास न्यानेश्वर देशमुख घरी असताना त्यांच्या शेताच्या दिशेने आग लागल्याचे दिसलं त्यांनी तात्काळ शेताकडे धाव घेतली मात्र तोपर्यंत सोयाबीनची सुडी जळून खाक झाली होती. सदर घटनेचा पुढील तपास रिसोड पोलीस करीत आहे.

# विविध वसाहतींमध्ये संशयास्पद हालचाली; रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी!

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील राधातारा नगर भाग क्रमांक २, आनंद नगर, सुभाष नगर, पंचवटी नगर तसेच नागपूर–औरंगाबाद महामार्गावरील डहाके पेट्रोल पंप परिसरात रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचाली निदर्शनास आल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित परिसरात पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून संशयास्पद हालचालींची सखोल चौकशी करावी, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. यासंदर्भात ८ ऑक्टोबर २०२६ रोजी कारंजा शहर पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, ८ ऑक्टोबर रोजी रात्री १.५४ ते २ वाजण्याच्या सुमारास काही व्यक्ती चोरीसाठी वापरले जाऊ शकणारे साहित्य व हत्यारे घेऊन कॉलनी परिसरात



फिरत असल्याचे रहिवाशांच्या निदर्शनास आले. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलिसांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून संबंधित व्यक्तींची ओळख पटवावी आणि त्यांच्या हालचालींची चौकशी करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. चौकशीत काही गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणीही रहिवाशांनी केली आहे. राधातारा नगरसह आनंद नगर, सुभाष नगर, पंचवटी नगर आणि महामार्गालगतच्या परिसरात रात्रीच्या वेळी नियमित पोलीस गस्त घालावी. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# नवरात्रात ललिता सहस्त्रनाम अर्चना!



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दरवर्षी वाशिम येथिल श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती नवरात्रीनिमित्त सामूहिक ललितासहस्त्रनाम अर्चना आयोजित करीत असते. यावर्षी रविवार दिनांक ११ ऑक्टोबर अश्विन शुद्ध प्रतिपदा तदनुसार घटस्थापने पासून श्री.ललितासहस्त्रनाम अर्चना प्रारंभ होणार आहे.या साधनेचा समारोप सोमवार दिनांक १९ ऑक्टोबर तदनुसार महानवमीला होणार आहे.

दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत देवी गणपती मंदिर, दुर्गा चौक, गणेश पेठ येथे होणाऱ्या या उपासनेसाठी सर्व भक्तांनी येवून आनंद अनुभूती घ्यावी असे आवाहन श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती, वाशिम च्या वतीने करण्यात आले आहे.

# विविध कला महोत्सव, कलावंत मेळावा आणि नाटकाच्या प्रयोगास प्रतिसाद



■ प्रतिनिधी | मानोरा ■

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई संयुक्त शाखा मानोरा - मालेगाव, नटश्री बहुद्देशीय संस्था, स्त्री शक्ती बहुद्देशीय संस्था मानोरा यांच्या संयुक्त विद्यमाने शाखेच्या वर्धापन दिना निमित्त दिनांक ६ ऑक्टोबर रोजी मानोरा येथे खुपसे सेलिब्रेशन हॉल मध्ये एक दिवसीय कलावंत मेळावा ,विविध कला महोत्सव आणि दोन अंकी विनोदी नाटक गिल्ली मिसळ या मराठी नाटकाचा प्रयोग आयोजित करण्यात आला होता.त्याला कलावंत, प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद

## प्रसिद्ध सिने अभिनेत्री श्वेता भामरे यांची उपस्थिती

दिला. या कार्यक्रमाला प्रसिद्ध मराठी सिने अभिनेत्री श्वेता भामरे (मुंबई) यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते कलावंत मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी शाखेचे अध्यक्ष डॉ. संजय रोठे, नाट्य दिग्दर्शक राजेंद्रसिंह राजपूत, कार्याध्यक्ष प्रा.हेमंत देशमुख, उपाध्यक्ष योगेश देशमुख, कोषाध्यक्ष माणिक डेरे, डॉ.सुहास देशमुख, प्रमुख कार्यवाह यशवंत पद्मगिरवार आदींची उपस्थिती होती.

# उमरी येथील तरुणाचा मृतदेह आढळला

## मानोरा पोलिसांकडून पंचनामा व पुढील तपास

■ प्रतिनिधी | मानोरा ■

दि. ९ ऑक्टोबर :तालुक्यातील पोहरादेवी परिसरातील सेवालाल नगर येथील नवीन प्लॉटिंगजवळ एका २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत तरुणाची ओळख उमरी बुद्रुक येथील रवी रमेश राठोड ( २५ ) अशी करण्यात आली आहे. मृतदेहाची अवस्था पाहता वन्यप्राण्यांनी शरीराचे नुकसान केले असावे, अशी शक्यता फिर्यादीत व्यक्त करण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या फिर्यादीनुसार, ८ ऑक्टोबरच्या रात्रीपासून रवी राठोड घरी परतला नव्हता. त्यानंतर ९ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास त्याच्या नातेवाइकांना मोबाईलद्वारे मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली.वसंतनगर ते सिंगद कडे जाणाऱ्या मार्गावरील, अक्षरा वाईन बारच्या मागील बाजूस सुमारे ५०० मीटर अंतरावर सेवालाल नगरातील नवीन प्लॉटिंग परिसरात हा मृतदेह आढळल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मृतदेहाची अवस्था गंभीर असल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर मानोरा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. याप्रकरणी मृताच्या नातेवाइकाने पोलिसांकडे फिर्याद दिली असून, मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेमागील परिस्थिती तपासातून स्पष्ट होणार आहे.

तरुणाचा मृत्यू नेमका कोणत्या परिस्थितीत झाला, याबाबत अधिकृत निष्कर्ष अद्याप स्पष्ट झालेला नाही. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत्यू झाला की मृत्यूनंतर शरीराचे नुकसान झाले, याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने कोणताही निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहाचे पुनरुज्जीवन करा!

**वाशिम** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी वाशिम शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील जीर्ण झालेल्या सामाजिक सभागृहाचे पुनरुज्जीवन करावे, तसेच महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागांत डिजिटल अभ्यासिका आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक व धार्मिक कार्यकर्ते आयु. जग्गू रामभाऊ राऊत यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या मागणीचे निवेदन अनुसूचित जाती कल्याण समितीचे अध्यक्ष तथा आमदार नारायणराव कुचे यांना जिल्हाधिकारी, वाशिम यांच्यामार्फत सादर करण्यात आले आहे. वाशिम



शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सन १९९० ते १९९४ या कालावधीत तत्कालीन आमदार भीमराव हेंबती कांबळे यांच्या कार्यकाळात टाऊन हॉलची उभारणी करण्यात आली होती. मात्र, कालांतराने या इमारतीची देखभाल व दुरुस्ती न झाल्याने ती जीर्ण झाली आहे. त्यामुळे या सभागृहाचे पुनरुज्जीवन करून तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह उभारण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

# नागरतास येथे जगदंबा देवी संस्थान नवरात्र उत्सवाची तयारी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यासह संपूर्ण विदर्भातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री जगदंबा देवी संस्थान, नागरतास येथे आगामी नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जोरदार तयारी सुरू आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात यंदाही भव्य यात्रा महोत्सव आणि विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ऑक्टोंबर पासून नवरात्र उत्सवास प्रारंभ होता आहे.

मालेगाव तालुक्यातील नागरतास येथील श्री जगदंबा देवी संस्थान या ठिकाणी दरवर्षी नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो नवरात्रोत्सवाच्या नऊही दिवसांत संस्थानच्या वतीने विविध धार्मिक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. दररोज पहाटे



५:०० वाजता होणाऱ्या भव्य महाआरतीसाठी मालेगाव शहरासह परिसरातील हजारो भाविक भक्त पायी (पैदल) प्रवास करून देवी मंदिरात पोहोचतात. देवीच्या भक्तीत लीन होऊन पहाटेच्या शांत व प्रसन्न वातावरणात होणाऱ्या या महाआरतीला हजेरी लावणे, हे भाविकांसाठी विशेष श्रद्धेचे पर्व ठरते. त्यामुळे सात ते आठ हजार भाविक भक्त मालेगाव ते नागरदास पाच किलोमीटर अंतर श्री जगदंबा देवी मंदिरात पायी जातात दररोज कीर्तन, होम-हवन व महाप्रसादः निसर्गरम्य आणि नयनरम्य वातावरणात वसलेले हे संस्थान संपूर्ण वाशीम जिल्ह्यात आणि राज्यभरात सुप्रसिद्ध आहे. नवरात्रात केवळ वाशीम जिल्ह्यातीलच नव्हे, तर राज्यातील कानाकोपऱ्यातून भाविक देवीच्या दर्शनासाठी येथे हजेरी लावतात. उत्सव काळात दररोज सुश्राव्य कीर्तन, होम-हवन, जप-तप आणि धार्मिक अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्र उत्सवा अतिशय उत्साहात साजरा करण्यासाठी श्री जगदंबा देवी संस्थानचे सर्व विश्वस्त मंडळी नागरदास येथील गावकरी मंडळी तसेच सेवेकरी मंडळी सातत्याने नऊ दिवस अथक परिश्रम घेतात तर या उत्सवाची सांगता महाप्रसादाने होत असताना ? ७० ते ८० हजार भाविक महाप्रसादाचा लाभः घेतात, या यात्रा महोत्सवाचे मुख्य आकर्षण असलेल्या भव्य महाप्रसाद वितरण कार्यक्रमास यंदाही सुमारे ७० ते ८० हजार नागरिक व भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्या दृष्टीने संस्थान कमिटीच्या वतीने महाप्रसाद वाटप, दर्शन रांगा, पिण्याचे पाणी आणि पार्किंग व्यवस्था चोख ठेवण्यात येत आहे. श्री जगदंबा देवी हे भक्तांच्या हाकेला धावणारे जागृत देवस्थान मानले जाते.


## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार भारतीय स्टेट बँक यांच्या कडून संकेत जितेंद्र पटेल हे त्यांच्या मालकीचे मौजे भिलखेडा, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथील शेत सर्व्हे / गट नंबर ५१/१ मधील प्लॉट नंबर १२ याचे एकंदर क्षेत्रफळ १७२.५० चौरस मीटर जागेवर कर्ज घेत आहे. परंतु सदर प्लॉटचा जुना खरेदीखताचे दस्त कारंजा दुय्यम निबंधक कार्यालया मध्ये नोंदविला असून त्याच दस्त क्र. ९७९/१९९१ अन्वये दिनांक १८/०४/१९९१ हा आहे, या मूळ खरेदीखताच्या दस्ता दिनांक ०१/१०/२०२६ रोजी संकेत जितेंद्र पटेल यांच्या राहते घरून म्हणजेच रा पो इन्नानी जिन जवळ कारंजा (लाड), ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथून गहाळ झाले असुन, त्या स्वरूपाची तक्रार संकेत जितेंद्र पटेल यांनी पोलीस स्टेशन कारंजा (शहर) ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथे दिनांक ०७/१०/२०२६ रोजी दिली असून त्याचा साना क्र. ३१/२०२६ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदीखताबाबत कोणाला कोणत्याही प्रकार दावा अथवा इतर अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाचे आंत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा जर विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाच्या मुळ खरेदीखता दस्त कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ८ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. करीता ही जाहीर नोटीस.

शिक्का

सही
**ॲड. व्ही. व्ही. ठाकरे**
शॉप नं. एल १०, वर्धमान प्लाझा,
स्टेट बँक समोर, कारंजा (लाड), जि. वाशीम
मो. नं. ९७६६८८०७६४, ९१४६०४८३१४


# अकोल्यात ३५० बनावट सायलेन्सर रोडरोलरखाली चिरडले!

## ध्वनिप्रदूषणाविरोधात वाहतूक पोलिसांची धडक मोहीम ; ७० फॅन्सी नंबर प्लेटही नष्ट



■ प्रतिनिधी | अकोला ■

बुलेट मोटारसायकलींना बनावट सायलेन्सर बसवून मोठ्या आवाजात फटाके फोडल्याप्रमाणे कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनधारकांविरुद्ध अकोला वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. विशेष मोहिमेदरम्यान जप्त करण्यात आलेले ३५० बनावट बुलेट सायलेन्सर आणि नियमबाह्य ७० फॅन्सी नंबर प्लेट गुरुवारी (९ ऑक्टोबर) रोडरोलरच्या साहाय्याने नष्ट करण्यात आले. या कारवाईतून ध्वनिप्रदूषण करणाऱ्या वाहनधारकांना पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून आणि

## मूळ सायलेन्सरचाच वापर करा!

बुलेट मोटारसायकलधारकांनी कंपनीकडून वाहनासोबत उपलब्ध करून देण्यात आलेल्या मूळ सायलेन्सरचाच वापर करावा. मोठ्या आवाजाचे अनधिकृत सायलेन्सर आढळल्यास यापुढेही मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करून संबंधित सायलेन्सर जप्त करण्यात येतील, असा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे. याशिवाय वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, वाहन चालविताना आवश्यक कागदपत्रे जवळ ठेवावीत आणि वाहनावरील प्रलंबित दंडाची रक्कम वाहतूक पोलिसांकडे किंवा शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या कार्यालयात भरावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले आहे.

मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक नियंत्रण शाखा तसेच जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध विशेष मोहिमा राबविण्यात आल्या. या मोहिमेदरम्यान मोठ्या आवाजाचे बनावट सायलेन्सर बसवून ध्वनिप्रदूषण करणाऱ्या बुलेट मोटारसायकलींवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते.

बनावट सायलेन्सरमधून फटाके फुटल्यासारखा मोठा आवाज होत असल्याने आजारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत होता. यासंदर्भात शहर वाहतूक नियंत्रण शाखेकडे नागरिकांच्या तक्रारीही प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत पोलिसांनी संबंधित वाहनधारकांविरुद्ध कारवाई केली. मोहिमेत जप्त करण्यात आलेले ३५० बनावट सायलेन्सर आणि ७० फॅन्सी नंबर प्लेट नष्ट करण्यासाठी न्यायालयाची परवानगी घेण्यात आली होती.

त्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या मान्यतेने आणि त्यांच्या उपस्थितीत ९ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.४५ वाजता जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरील मुख्य रस्त्यावर रोडरोलर फिरवून जप्त केलेले सायलेन्सर आणि नंबर प्लेट नष्ट करण्यात आले.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१३ ■ शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# बांधावर न जाताच ९० टक्के नुकसान

## हेलोडीत पंचनाम्यांचा 'ऑन टेबल' खेळ, शेतकरी संतप्त, तक्रारदारालाच अधिकाऱ्यांचा जाब

### कागदावरच शेतीची पाहणी, ग्रामपंचायतीत अर्जांचा फड

**अभय बेदमोहता-**

**सेलू :** निसर्गाच्या लहरीपणाने आधीच उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा दिलासा देण्याऐवजी त्यांच्या नुकसानीच्या पंचनाम्यांमध्येच कागदी घोडे नाचविले जात असल्याचा गंभीर आरोप सेलू तालुक्यातील हेलोडी येथे करण्यात आला आहे. शेताच्या बांधावर न जाता ग्रामपंचायत कार्यालयात बसून अर्ज भरायचे, नुकसानीची टक्केवारी ठरवायची आणि पंचनामे उरकायचे, असा प्रकार सुरू असल्याची तक्रार एका शेतकऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे. विशेष म्हणजे, या तक्रारीनंतर चौकशीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण गावातील नुकसानीची पाहणी करण्याऐवजी तक्रारदाराच्याच शेताचा पंचनामा करण्यावर भर दिल्याचा आरोप आहे. मग शेतकऱ्यांना न्याय मिळविण्यासाठी प्रत्येक वेळी अधिकाऱ्यांच्या दारातच उभे राहावे लागणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**बांधावर जाण्याचे कष्ट नको, कार्यालयातच पंचनामे**

शेतीच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यासाठी प्रत्यक्ष शेताची पाहणी महत्त्वाची असताना हेलोडी येथे शेतकऱ्यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून अर्ज, आधार कार्ड आणि बँक पासबुक यांसारखी कागदपत्रे गोळा केली जात असल्याचा आरोप आहे. तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक आणि कोतवाल यांनी शेतात जाऊन नुकसानीची पाहणी करण्याऐवजी कार्यालयात बसूनच प्रक्रिया पूर्ण केल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

'ट्रिगर-१' लागू झाल्यामुळे शेतकऱ्यांनी कागदपत्रे द्यावीत, बाकीची प्रक्रिया प्रशासन पूर्ण करेल, असे सांगितले जात असल्याचा दावाही करण्यात आला आहे. प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी न करताच ८० ते ९० टक्के नुकसान नोंदविल्याचे शेतकऱ्यांना सांगितले जात असल्याचा आरोप आहे. जर हे आरोप खरे असतील, तर नुकसानीच्या पंचनाम्यांची विश्वासार्हता आणि शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीच्या अचूकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात.

**तक्रार केली, तर तक्रारदाराच्याच शेताचा पंचनामा**

### संपूर्ण गावाच्या नुकसानीची चौकशी करण्याऐवजी तक्रारदाराच्या शेतापुरतीच कारवाई



हेलोडीतील या प्रकाराची तक्रार उपविभागीय अधिकाऱ्यांसह वर्ध्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. त्यानंतर गुरुवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास संबंधित अधिकारी ग्रामपंचायत कार्यालयात दाखल झाले. मात्र, संपूर्ण गावातील शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्याऐवजी तक्रारदार शेतकऱ्यालाच समोर करून त्याच्या शेताचा पंचनामा करण्यावर भर देण्यात आल्याचा आरोप आहे.

तक्रारदाराने गावातील इतर शेतांचीही पाहणी करण्याची विनंती केली. मात्र, इतर शेतकऱ्यांना पूर्वसूचना न देता अधिकारी तेथून निघून गेल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे तक्रारीमागील मूळ मुद्दा बाजूला पडला आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या सर्वेक्षणाचा प्रश्न अनुत्तरितच राहिल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे.

**सगळ्यांनी उपविभागीय कार्यालयाचे उंबरठे झिजवायचे का**

रस्त्यात भेटणाऱ्या काही शेतकऱ्यांना त्यांचा पंचनामा झाल्याचे आणि ९० टक्के नुकसान नोंदविल्याचे सांगितले जात असल्याचा आरोप आहे. मात्र, प्रत्यक्ष शेताची पाहणी झाली नसेल, तर नुकसानीची टक्केवारी कोणत्या आधारावर निश्चित करण्यात आली, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

शेतकरी दिवसरात्र शेतात राबतो. पिकांचे नुकसान त्याच्या डोळ्यांसमोर होते. अशा परिस्थितीत पंचनाम्यांसाठी त्यालाच कार्यालयात चकरा माराव्या लागणार असतील, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा उपयोग काय, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

तक्रार केल्याशिवाय अधिकारी शेतावर जाणार नसतील, तर तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याने उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवायचे का असा प्रश्न हेलोडीतील शेतकरी विचारत आहेत.

**वरिष्ठ अधिकारी दखल घेणार का**

शेतीच्या नुकसानीचे पंचनामे हा केवळ कागदपत्रांचा व्यवहार नसून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक मदतीशी निगडित विषय आहे. त्यामुळे हेलोडीतील सर्व पंचनाम्यांची प्रत्यक्ष पडताळणी करून नोंदविलेल्या नुकसानीची वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी पुढे येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका जाणून घेऊन आरोपांची निष्पक्ष चौकशी होणेही आवश्यक आहे. आता वरिष्ठ प्रशासन या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे झाले की केवळ कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात आली, याची तपासणी करणार का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यातील पशुचारा इतर जिल्ह्यासह राज्यात विक्री व वाहतुकीस निर्बंध

### -दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

### -भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ अन्वये प्रतिबंध

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये ट्रिगर एकनुसार दुष्काळी स्थिती घोषित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी जिल्ह्यातील पशुचाऱ्याची इतर जिल्ह्यांत तसेच राज्याबाहेर विक्री व वाहतूक करण्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वान्मथी सी यांनी प्रतिबंध घातला आहे.



भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये हा आदेश जारी करण्यात आला आहे. जिल्ह्याच्या संपूर्ण महसूल हद्दीतून हिरवा चारा, कडबा, पेंढा, कुट्टी, मुरघास तसेच पशुधनासाठी वापरला जाणारा तत्सम चारा व पशुखाद्य मोठ्या प्रमाणावर जिल्ह्याबाहेर नेण्यास मनाई करण्यात आली आहे.

मात्र, शासकीय योजना, शासकीय चारा डेपो, पशुसंवर्धन विभागाची अधिकृत व्यवस्था, आपत्कालीन पशुधन बचाव व पुनर्वसन यासाठीची वाहतूक तसेच जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांची लेखी परवानगी असलेल्या वाहतुकीला सूट देण्यात आली आहे. अशा वाहतुकीसाठी अधिकृत परवानगीपत्र सोबत ठेवणे बंधनकारक आहे.

जिल्ह्याबाहेर चारा वाहतूक करण्याची आवश्यकता असल्यास संबंधितांनी कारणांसह पूर्वपरवानगीसाठी अर्ज करावा. परवानगी देताना जिल्ह्यातील चाऱ्याची उपलब्धता, पशुधन संख्या आणि स्थानिक गरजांचा विचार केला जाणार आहे.

प्रतिबंधित वाहतूक रोखण्यासाठी पोलिस, महसूल, पशुसंवर्धन व कृषी विभागाने वाहनांची तपासणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर लागू कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. आवश्यकतेनुसार चारा किंवा वाहन ताब्यात घेण्याची अथवा जप्तीची कार्यवाही विहित कायदेशीर प्रक्रियेनुसार करण्यात येणार आहे. आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

# अवैध दारूविक्रीवर पोलिसांचा वॉशआऊट

## १३८ गुन्हे दाखल, १४१ आरोपींवर कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात अवैध दारूविक्री आणि गावठी दारू निर्मितीविरोधात वर्धा जिल्हा पोलिसांनी ७ व ८ ऑक्टोबर रोजी धडक वॉशआऊट मोहीम राबविली. या मोहिमेत देशी विदेशी दारूविक्रीचे २७ आणि गावठी दारूविक्रीचे १११ असे एकूण १३८ गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईत १४१ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, सुमारे ८८ लाख ४८ हजार रुपयांचा दारूसाठा व संबंधित मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

जिल्ह्यातील अवैध दारूभट्ट्या, दारूसाठे आणि चोरट्या मार्गाने दारू विक्री करणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करून पोलिसांनी ही मोहीम आखली होती. शहरालगतचा परिसर, गावाबाहेरील ठिकाणे, जंगलशिवार तसेच सहज पोहोचता येत नसलेल्या भागांमध्ये गोपनीय पाळत ठेवण्यात आली होती. बाहेरील जिल्ह्यांतून अवैधरीत्या आणली जाणारी देशी विदेशी दारू आणि तिच्या विक्रीच्या ठिकाणांवरही पोलिसांनी लक्ष केंद्रित केले.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम राबविण्यात आली. जिल्ह्यातील चार उपविभागीय पोलीस अधिकारी, ४२ पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा आणि ३२६ पोलीस अंमलदारांनी या कारवाईत सहभाग घेतला. ७ ऑक्टोबर रोजी पहाटे ६ वाजल्यापासून विविध ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले.

# चाऱ्याअभावी पशुधनाचे भाव २५ टक्क्यांनी घसरले

## दुष्काळामुळे शेतकऱ्यांवर लाडक्या गुरांची विक्री करण्याची वेळ

**वर्धा । जनमाध्यम :** दुष्काळाच्या झळांनी शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, आता पशुधन सांभाळणेही कठीण झाले आहे. पिके करपली, पाण्याचे स्रोत आटले आणि चारा टंचाईने गंभीर रूप धारण केले आहे. त्यामुळे गायी, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्यांची विक्री करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. बाजारात पशुधनाची आवक वाढली असली, तरी खरेदीदारांची संख्या कमी असल्याने जनावरांच्या दरात २० ते २५ टक्क्यांपर्यंत घसरण झाली आहे. मुलांप्रमाणे जपलेल्या गुरांना नाइलाजाने कमी भावात विकावे लागत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

**चारा महागला, दूध उत्पादन घटले**

दुष्काळामुळे वर्धा जिल्ह्यातील अनेक गावामध्ये पाणी आणि चारा टंचाईची समस्या गंभीर बनली आहे. काही भागांत उपलब्ध हिरवा चारा जेमतेम एक ते दोन महिने पुरेल, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे भविष्यातील चारा टंचाईची भीती लक्षात घेऊन शेतकरी आतापासूनच पशुधन विक्रीचा निर्णय घेत आहेत. दुसरीकडे, चारा आणि पशुखाद्याच्या किमती वाढल्याने दुग्धव्यवसायाचा खर्च वाढला आहे. पूर्वी दिवसाला २० लिटर दूध देणाऱ्या गायींचे उत्पादन घटून १० लिटरवर आल्याचे चित्र आहे. चाऱ्याचे दर प्रतिटन १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार ५०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे उत्पन्न कमी आणि खर्च अधिक, अशा दुहेरी संकटात पशुपालक सापडले आहेत.

**चारा-पाणी मिळाले नाही तर विक्री वाढणार**



दुष्काळाचा परिणाम पशुधन बाजारावरही स्पष्टपणे दिसत आहे. जनावरांची विक्री करण्यासाठी शेतकरी मोठ्या संख्येने बाजारात येत आहेत. मात्र, त्या प्रमाणात खरेदीदार नसल्याने जनावरांचे भाव घसरले आहेत. चारा आणि पाण्याची उपलब्धता वेळेत झाली नाही, तर पशुधन विक्रीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली.

**दुग्धव्यवसाय सुरू ठेवायचा की गुरे विकायची**

चारा, पशुखाद्य, औषधोपचार आणि जनावरांच्या देखभालीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यात दुष्काळामुळे दूध उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्नही कमी झाले आहे. अशा परिस्थितीत दुग्धव्यवसाय सुरू ठेवायचा की उदरनिर्वाहासाठी पशुधन विकायचे, असा पेच शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. शेतीला जोडधंदा म्हणून उभा केलेला दुग्धव्यवसायच आता दुष्काळाच्या संकटात सापडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

# छप्पन इंचांची छाती कॉकरोचांना घाबरली

## दिल्लीतील आंदोलन रोखण्यासाठी सत्ताधाऱ्यांची धडपड

**दिल्ली जनमाध्यम** एसआयआर प्रक्रियेत कथित गैरप्रकार झाल्याचा आरोप करत कॉकरोच जनता पार्टीने (सीजीपी) आज १० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलनाची हाक दिली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी होणाऱ्या या आंदोलनामुळे राजकीय वातावरण तापले आहे. आंदोलनाला रोखण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे दावे केले जात असून, त्यावरून सोशल मीडियावरही उपरोधिक प्रतिक्रिया उमटत आहेत.

आंदोलनासाठी देशभरातून तरुण दिल्लीकडे रवाना होत असल्याचे सांगितले जात आहे. आंदोलकांना विविध ठिकाणी अडवले जात असल्याचे आरोपही केले जात आहेत. दिल्ली पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारल्याचा दावा करण्यात येत असून, आंदोलनाविरोधात कारवाई करण्यासाठी न्यायालयाची परवानगी मागितल्याचेही वृत्त आहे. मात्र, या दाव्यांची अधिकृत पुष्टी आवश्यक आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे आणि मेट्रो सेवा बंद ठेवण्यात येणार असल्याचे दावेही चर्चेत आहेत. या निर्णयांबाबत अधिकृत माहिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

दरम्यान, आंदोलन रोखण्याच्या कथित प्रयत्नांवरून सोशल मीडियावर 'छप्पन इंचांची छाती कॉकरोचांना घाबरली' अशा उपरोधिक टिप्पणी आणि मीम्स व्हायरल होत आहेत. उद्याच्या आंदोलनाला किती प्रतिसाद मिळतो आणि केंद्र सरकार त्यावर काय भूमिका घेते, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

# वृत्तपत्र विक्रेत्यांचा राज्यव्यापी एल्गार; वर्ध्यात अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**वर्धा जनमाध्यम :** वर्षानुवर्षे संघर्ष करूनही वृत्तपत्र विक्रेत्यांच्या पदरी उपेक्षाच मंत्रिमंडळाने मंजुरी देऊनही वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ प्रत्यक्षात सुरू झालेले नाही. शासनाच्या या दिरंगाईविरोधात महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने ९ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. वर्ध्यातही वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या कार्यालयातून विक्रेत्यांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी अपर जिल्हाधिकारी संजय तेली यांना निवेदन सादर करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात गजानन मसने, संजय देवगिरकर, बंडू मुळे यांच्यासह जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने सहभागी झाले. गेल्या १६ ते १७ वर्षांपासून वृत्तपत्र विक्रेते आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करीत आहेत. १० ऑक्टोबर २०२४ रोजी मंत्रिमंडळाने महामंडळाच्या निर्णयाला मंजुरी दिली. राज्यभरातील या आंदोलनाच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. महामंडळाची अंमलबजावणी करून कष्टकरी वृत्तपत्र विक्रेत्यांना न्याय द्यावा, अशी मागणी या संघटनेने केली.

**हिंगणघाट :** वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी वर्धा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने हिंगणघाट तालुका संघटनेने तहसीलदार शिंदे यांना निवेदन दिले. गेल्या सोळा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागणीची शासनाने दखल घेऊन विक्रेत्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी सुभाष हंबर्डे, कौशल मुंजे, संजय शिंदे यांच्यासह अन्य वृत्तपत्र विक्रेता सहकारी उपस्थित होते.

**पुलगाव :** वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने पुलगाव तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात वृत्तपत्र विक्रेत्यांसह त्यांच्या कुटुंबीयांनी सहभाग घेतला. उन्हाळा, पावसाळा आणि थंडीची पर्वा न करता वृत्तपत्रे घरोघरी पोहोचवणाऱ्या विक्रेत्यांना सामाजिक सुरक्षा व न्याय मिळावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी दीपक कुंभारे, गोपाळ काळे यांच्यासह विक्रेते उपस्थित होते.

**आर्वी :** वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या महामंडळाची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी आर्वी तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटनेने उपविभागीय अधिकारी शिरसाठ यांना निवेदन दिले. गेल्या सोळा वर्षांपासून विक्रेते न्यायासाठी संघर्ष करीत आहेत. १० ऑक्टोबर २०२४ रोजी मंत्रिमंडळाने निर्णय घेऊनही अंमलबजावणी रखडल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजी आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील पारसे यांच्यासह विक्रेते व पत्रकार उपस्थित होते.

# शेतकरी-कष्टकऱ्यांचा आधार हरपला; नानांना लाल सलाम

## आयटक कामगार केंद्रात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण आदरांजली

**वर्धा जनमाध्यम :** पडद्यावर अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारा आणि प्रत्यक्ष आयुष्यात शेतकरी, कष्टकरी व गरजूंच्या वेदनांशी नाते जोडणारा संवेदनशील कलाकार काळाच्या पडद्याआड गेला. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने केवळ चित्रपटसृष्टीचेच नव्हे, तर संकटात सापडलेल्या असंख्य कुटुंबांचा आधार हरपल्याची भावना आयटक कामगार केंद्रात आयोजित आदरांजली सभेत व्यक्त करण्यात आली.

८ ऑक्टोबर रोजी नाना पाटेकर यांच्या निधनाने सर्वत्र शोककळा पसरली. आयटक कामगार केंद्रात आयोजित सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगार नेत्या कॉम्रेड



विजया पावडे होत्या.

**नाम फाउंडेशनचे कार्य अविस्मरणीय**

नाम फाउंडेशनच्या माध्यमातून नाना पाटेकर यांनी वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील शेतकरी, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा आणि आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना मदतीचा हात दिला. त्यांचे सामाजिक कार्य कायम स्मरणात राहील, असे कॉम्रेड दिलीप उटाणे यांनी सांगितले. लोकप्रियतेचा उपयोग समाजातील वंचितांच्या मदतीसाठी करणारे नाना खऱ्या अर्थाने लोककलावंत होते. त्यांच्या निधनाने शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेचे मोठे नुकसान झाले आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कॉम्रेड विजया पावडे यांनीही नानांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी आयटकच्या महिला कार्यकर्त्या, पदाधिकारी आणि कामगार प्रतिनिधींनी नानांच्या स्मृतींना अभिवादन केले. 'नाना पाटेकर अमर रहे' आणि 'नाना पाटेकर यांना लाल सलाम' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

# गणपती विसर्जनाच्या ड्युटीवर गृहरक्षक सुनील पाचरुकर यांचे हृदयविकाराने निधन

## गिरडमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**वर्धा जनमाध्यम :** गणपती विसर्जनाची कर्तव्य बजावत असताना गृहरक्षक सुनील पाचरुकर यांचा तीव्र हृदयविकाराने मृत्यू झाला. कर्तव्यावर असतानाच त्यांची प्राणज्योत मालवल्याने गिरड परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी प्रशासकीय अधिकारी आणि सहकाऱ्यांच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

गणपती विसर्जनाच्या बंदोबस्तासाठी सुनील पाचरुकर यांची ड्युटी लावण्यात आली होती. कर्तव्य बजावत असतानाच त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने पोलीस प्रशासनासह गृहरक्षक दलातील सहकाऱ्यांनाही मोठा धक्का बसला आहे.

सुनील पाचरुकर यांच्या अचानक निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, शिक्षण घेत असलेली दोन मुले, आई आणि बहीण असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनामुळे दोन्ही मुलांच्या डोक्यावरील पितृछत्र हरपले असून, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही निर्माण झाला आहे.



कर्तव्य बजावताना मृत्यू झालेल्या गृहरक्षकाच्या कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी. तसेच कुटुंबाला आवश्यक शासकीय सहाय्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पित्ताशयाच्या कर्करोगावर एव्हीबीआरएचमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया

### प्लीहा काढण्याचीही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया; रुग्णाची प्रकृती सुधारली

**वर्धा जनमाध्यम :** आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने पित्ताशयाच्या कर्करोगाने ग्रस्त रुग्णावर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केली. विविध रुग्णालयांत उपचार घेऊनही आजाराचे निदान न झालेल्या या रुग्णाला एव्हीबीआरएचमध्ये योग्य उपचार मिळाले.

रुग्णाला सतत पोटदुखीचा त्रास होत होता. तपासण्यांमध्ये हिमोग्लोबिन आणि प्लेटलेट्सचे प्रमाण कमी असल्याचे, पित्ताशयाला मोठी सूज आल्याचे तसेच प्लीहा वाढल्याचे आढळले. त्यामुळे शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाची प्रकृती स्थिर करणे आवश्यक होते.

इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पंकज बानोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रियेपूर्वी प्लीहा धमनीचे एम्बोलायझेशन करण्यात आले. त्यानंतर युनिट प्रमुख डॉ. इम्रान अली खान यांच्या नेतृत्वाखाली डॉ. अनुप झाडे आणि शस्त्रक्रिया विभागाच्या पथकाने पित्ताशय आणि प्लीहा काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वी केली.



शस्त्रक्रियेनंतरच्या हिस्टोपॅथॉलॉजी तपासणीत पहिल्या टप्प्यातील पित्ताशयाचा कर्करोग असल्याचे स्पष्ट झाले. सध्या रुग्णाची प्रकृती सुधारली असून कॅन्सर युनिटमध्ये पुढील उपचार सुरू आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश अग्रवाल, डायरेक्टर हॉस्पिटल्स डॉ. चंद्रशेखर महाकाळकर आणि मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय मुडे यांनी डॉक्टरांच्या पथकाचे कौतुक केले.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पथकाकडून पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी







**छत्रपती संभाजीनगर, दि.९ (जिमाका)** : मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाने देमनी शिवारात पाहणी केली. देमनी येथील शेतकरी विलास देविदास शिंदे यांच्या गट ८४ मधील १ हे २० आर क्षेत्रात सोयाबीन पिकाची लागवड होती. पावसाअभावी पूर्ण पीक करपून गेले आहे. यावेळी पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून सर्व स्थिती जाणून घेतली.

कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश आहे. राज्याचे कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

**नाणेगाव, किणगाववाडी, जामखेड परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून जाणून घेतली वस्तुस्थिती**

**जालना** : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील नाणेगाव तसेच अंबड तालुक्यातील किणगाववाडी आणि जामखेड परिसरातील शेतपिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पीक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. पावसाअभावी पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम, पाण्याची उपलब्धता, संभाव्य पीक नुकसान आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांची प्रत्यक्ष शेतावर जाऊन माहिती घेत पथकाने दुष्काळी परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेतली.

## फडणवीस निवडणूक आयोगाचे वकील

**पुणे /प्रतिनिधी** : एसआयआर प्रकरणी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात रोष वाढत आहेत. त्यांच्यावर चौफर टीका होत असून त्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे. पण निवडणूक आयोगावर आरोप होत असताना भाजपचे नेते उत्तर देत आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवडणूक आयोगाचा वकील म्हणून नेमले आहे असा टोला शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे. तसेच राज्यात ताबडतोब निवडणुका लावल्या तर मिंधे गट आणि भाजप इथे औषधलाही राहणार नाही असेही संजय राऊत म्हणाले. जुन्नरमध्ये पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, मूळ शिवसेना ही उद्धव ठाकरे यांची आहे. बाकी सेना डुप्लिकेट आहेत, या डुप्लिकेटचा खेळ सर्वोच्च न्यायालय संपवणार. ज्या पद्धतीने सुनावणी पुढे चालली आहे आणि निवडणूक आयोगाने आणि तेव्हाच्या सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेचे तुकडे करताना असंविधानात्मक पद्धतीने जी पापं केली, त्याच पापाविरोधात आज आगडोंब उसळलेला आहे. त्यामुळे आता मूळ शिवसेनेचेच राज्य येईल. २०२४ साली सुद्धा विधानसभेत शिवसेनाच जिंकली होती हे आता लोकांना पटायला लागले आहे. राज्यात आणि देशात भाजपचा विजय कसा झाला हे आता ज्ञानेश कुमारांचे कारनामे समोर आले आहेत. राज्यात मिंधे, फडणवीस आणि ज्ञानेश कुमार या त्रिकुटाचे जे कारनामे झाले त्यातून हा अकृत्रिम पराभव घडवला गेला. ज्ञानेश कुमार यांचा निकाल लावा आणि ताबडतोब निवडणुका लावल्या तर मिंधे गट आणि भाजप इथे औषधालाही राहणार नाही. आम्ही आशावादी आहोत, जनतेचे अनेक प्रश्न आहेत त्यावर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार बोलत नाहीत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकदिवसा आड दिल्लीत असतात. त्यांच एवढं दिल्लीत काय काम असते आम्हाला माहित नाही. या सगळ्या गोष्टींची नोंद जनता करत असते. राज्यात दुष्काळ पडला आहे आणि त्यावर कोणीही गांभीर्याने चर्चा करताना दिसत नाही. महाराष्ट्रात जमिनीवर काम करणारा एकच पक्ष आहे तो म्हणजे शिवसेना, असे संजय राऊत म्हणाले. इंडिया आघाडीचे महत्त्वाचे घटक आहोत. सहा तारखेला संसदेकडे जो मोर्चा गेला, त्यात राहुल गांधींसोबत सर्वात पुढे मीच होतो. त्यानंतर उशिरा मुंबईत आलो. १० तारखेनंतर आम्ही मोकळे आहोत.



### नंदिग्राममध्ये भाजप उमेदवाराने CM सुवेंदुंचा विक्रम मोडला

# १.२२ लाख मतांनी विजयी

## पुदुचेरीत NDA, तामिळनाडूच्या २ जागांवर TVK विजयी



**कोलकाता/चेन्नई/गुवाहाटी/पुदुचेरी/वृत्तसंस्था-** पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पुदुचेरीमधील पाच विधानसभा जागा आणि आसाममधील एका लोकसभा जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. पश्चिम बंगालमध्ये भाजपने नंदीग्राम आणि रेजीनगर या जागा जिंकल्या, तर तामिळनाडूमध्ये टीव्हीके पक्षाने दोन जागांवर विजय मिळवला.दरम्यान, एनडीएने पुदुचेरीमध्ये विधानसभेची एक जागा जिंकली. आसाममध्ये, नागाव लोकसभा मतदारसंघात भाजप आघाडीवर आहे.

भाजप उमेदवार हसीरानी रथ यांनी नंदीग्रामची जागा १,२२,७५३ मतांच्या फरकाने जिंकली; त्यांना एकूण १,६४,४२७ मते मिळाली. या विजयामुळे हसीरानी यांनी या जागेसाठी सुवेंदू अधिकारी यांच्या नावावर असलेला पूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे. हसीरानी यांचा १,२२,७५३ मतांचा विजयाचा फरक हा १९६७ मध्ये या मतदारसंघाची निर्मिती झाल्यापासूनचा सर्वात मोठा विजय-फरक ठरला आहे. सर्वात मोठ्या विजयाच्या फरकाचा यापूर्वीचा विक्रम सुवेंदू अधिकारी यांच्या नावावर होता; २०१६ मध्ये टीएमसीच्या ( तिकिटावर निवडणूक लढवताना त्यांनी सीपीआयच्या अब्दुल कबीर शेख यांचा ८१,२३० मतांनी पराभव करून हा विक्रम प्रस्थापित केला होता. मोदी म्हणाले, 'पोटनिवडणुकांमधील विजय हे लोकांचे आमच्याशी असलेले घनिष्ठ नाते दर्शवतात.'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी आसाम, पश्चिम बंगाल आणि पुदुचेरी येथील पोटनिवडणुकांमध्ये भाजप-एनडीएला आशीर्वाद दिल्याबद्दल जनतेचे आभार मानले. हे विजय आघाडीच्या सुशासनाच्या अजेंड्याशी लोकांचे असलेले 'घनिष्ठ नाते' पुन्हा एकदा सिद्ध करतात, असे ते म्हणाले. पोटनिवडणुकीच्या निकालांवर प्रतिक्रिया देताना नंदीग्राममधील भाजप उमेदवार हसिरानी रथ म्हणाल्या, 'हा विक्रमी विजय सुवेंदू अधिकारी हे मुख्यमंत्री अलल्याचा परिणाम आहे. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या कार्यकाळात आमच्या कार्यकर्त्यांना छळाचा सामना करावा लागत असे आणि त्यांना मतदान करण्यापासून रोखले जात असे, परंतु आता तशी परिस्थिती नाही. नंदीग्राम हा अत्यंत अशांत भाग होता; मात्र मुख्यमंत्र्यांमुळे येथे लोकशाही पुन्हा प्रस्थापित झाली आहे. यावेळी निवडणुकीदरम्यान कोणताही रक्तपात झाला नाही; ना बॉम्ब फेकले गेले, ना गोळीबार झाला.'

# दुष्काळात शेतकरी पोरं सत्याग्रहात आणि अधिकारी परदेश दौ-यात

**पुणे /प्रतिनिधी** : राज्य भीषण दुष्काळात होरपळत असताना आणि शेतक-यांच्या पोरांना भ्रष्ट अध्यक्षांच्या विरोधात सत्याग्रहाला बसण्याची वेळ आली असताना, शेतक-यांना मदत करण्याऐवजी मुख्यमंत्र्यांनी आपल्या लाडक्या अधिका-यांना १० कोटी रुपये खर्च करून परदेशात पाठवले, यापेक्षा मोठे दुर्दैव काय असू शकते, असा संतप्त सवाल राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. या दौ-यात कोणकोणते अधिकारी गेले आणि लंडनस्थित कंपनीला ५ कोटी रुपये देण्याचे नेमके कारण काय, या सर्व प्रश्नांची उत्तरे सरकारने जनतेला दिली पाहिजेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

राज्य दुष्काळात होरपळत आहे. शेतक-यांच्या पोरांवर भ्रष्ट अध्यक्षांच्या विरोधात सत्याग्रहाला बसण्याची वेळ आली आहे. एवढं होत असताना शेतक-यांना मदत करण्याऐवजी मुख्यमंत्र्यांनी आपल्या लाडक्या अधिका-यांना १० कोटी रुपये खर्च करून परदेशात पाठवले. यापेक्षा मोठे दुर्दैव काय? या दौ-यात कोणकोणते अधिकारी गेले? त्या लंडनस्थित कंपनीला ५ कोटी रुपये देण्याचे कारण काय? या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत.

विद्यार्थ्यांची मागणी काय आणि सरकारची प्राथमिकता काय?



सरकारने उद्योगविकास आणि अभ्यासाच्या नावाखाली परदेश दौरे करण्यापेक्षा, यापूर्वी झालेल्या परदेश दौ-यांतून नेमके काय साध्य झाले, याचा लेखाजोखा आधी जनतेसमोर मांडावा. रोहित पवार यांनी एक्सवर याबाबत संताप व्यक्त केला आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, राज्य दुष्काळात होरपळत आहे. शेतक-यांच्या पोरांवर भ्रष्ट अध्यक्षांच्या विरोधात सत्याग्रहाला बसण्याची वेळ आली आहे.

दौ-यावर १० कोटी खर्च

एवढे होत असताना शेतक-यांना मदत करण्याऐवजी मुख्यमंत्र्यांनी आपल्या लाडक्या अधिका-यांना १० कोटी रुपये खर्च करून परदेशात पाठवले. यापेक्षा मोठं दुर्दैव काय? या दौ-यात कोणकोणते अधिकारी गेले? त्या लंडनस्थित कंपनीला ५ कोटी रुपये देण्याचं कारण काय? या प्रश्नांची उत्तरं सरकारने द्यावीत. आज राज्यातील जनतेची गरज काय, विद्यार्थ्यांची मागणी काय आणि सरकारची प्राथमिकता नेमकी काय, असा सवाल करत रोहित पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

मागील दौ-यातून काय निष्पन्न?

सरकारने उद्योगविकास आणि अभ्यासाच्या नावाखाली अंधपणाने परदेश दौरे करण्यापेक्षा, यापूर्वी झालेल्या अशा परदेश दौ-यांतून नेमके काय साध्य झाले, याचा सविस्तर लेखाजोखा आधी जनतेसमोर मांडावा, अशी आक्रमक भूमिका रोहित पवार यांनी एक्स पोस्टद्वारे मांडली आहे.

## स्थलांतरित कुटुंबांनाही रास्तभाव दुकानातून धान्य घेता येणार

**मुंबई**: राज्यातील जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पर्जन्यमानातील तूट आणि अन्य घटकांमुळे प्रभावित झालेल्या दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा सुरळीतपणे आणि विनाविलंब उपलब्ध करून देण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या लाभार्थी मर्यादेत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरित केले जाते. दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा नियमित, सुरळीत आणि विनाविलंब होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, पात्र लाभार्थ्यांना एपीएल डीबीटी योजनेचा लाभ नियमितपणे मिळेल, याची दक्षता घेण्यासही सांगण्यात आले आहे.दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या व्यक्तींनी मोफत अन्नधान्याची मागणी केल्यास, त्यांची शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार पात्रता तपासण्यात येणार आहे. संबंधित व्यक्तींचे उत्पन्न आणि योजनेसाठी उपलब्ध असलेली लाभार्थी मर्यादा विचारात घेऊन, पात्र व्यक्तींना अंत्योदय अन्न योजना किंवा प्राधान्य कुटुंब लाभार्थी गटात समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून तयार झालेल्या 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान

**मुंबई** : पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे हे जागतिक पटलावर उमटलेले प्रतिबिंबच आहे.महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्तिमार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात आले आहे.महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी २२ मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचविण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूर वारी ही भक्तीमार्गातील अतिशय प्राचीन परंपरा असून ती जात, धर्म, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद न करता सर्वांना विठुरायाच्या रंगात रंगवून एकत्र आणते. ही महान परंपरा, तिचे उद्दिष्ट आणि विचार जगभरात पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' ही सुंदर डॉक्युमेंट्री तयार करून रिलीज करण्यात आली आहे. या डॉक्युमेंट्रीला 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६ मध्ये भारत देशासाठीचा 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.

## नोएडा विमानतळ आता 'नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय विमानतळ'

**जेवर/वृत्तसंस्था-** उत्तर प्रदेशातील जेवर येथे उभारण्यात आलेल्या नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव बदलून 'नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय विमानतळ' करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली आहे. गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातील जेवर येथे असलेला हा विमानतळ राष्ट्रीय राजधानी क्षेत्रासाठी दुसरा आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील प्रवाशांचा आणि हवाई वाहतुकीचा ताण कमी करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे.राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील हे दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन झाले होते. या विमानतळाच्या पहिल्या टप्प्यात एक धावपट्टी आणि प्रवासी टर्मिनल उभारण्यात आले आहे. या टप्प्यातून वर्षाला सुमारे १.२ कोटी प्रवाशांना हाताळण्याची क्षमता नियोजित आहे. भविष्यात अनेक धावपट्ट्यांचा विस्तार करून २०५० पर्यंत विमानतळाची क्षमता वर्षाला सुमारे ७ कोटी प्रवाशांपर्यंत नेण्याचे नियोजन आहे. हा ग्रीनफिल्ड विमानतळ सार्वजनिक-खासगी भागीदारीतून विकसित करण्यात आला आहे. 'झ्युरिक एअरपोर्ट इंटरनॅशनल एजी'ची उपकंपनी 'यमुना इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड' आणि उत्तर प्रदेश सरकारच्या संबंधित यंत्रणा या प्रकल्पात सहभागी आहेत. दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यासाठी आणि एनसीआर परिसरातील विमान वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी या विमानतळाची रचना करण्यात आली असून, तो यमुना एक्सप्रेसवे आणि मल्टि-मोडल ट्रान्झिट लिंक्सशी जोडलेला आहे.




## भारतीय वंशाच्या नवनीतम पिल्लै यांना शांततेचा नोबेल पुरस्कार

**ओस्लो/वृत्तसंस्था-** नॉर्वेच्या नोबेल समितीने २०२६ चा शांतता पुरस्कार भारतीय वंशाच्या नवनीतम नवी पिल्लै यांना देण्याची घोषणा केली आहे. दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या पिल्लै यांनी वर्णभेदाविरोधात लढणारे नेल्सन मंडेला यांच्यासह अनेकांना वकील म्हणून मदत केली होती. युद्धगुन्हे आणि नरसंहारासाठी दोषींना शिक्षा मिळवून देण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय कायदा मजबूत करण्याच्या प्रयत्नांसाठी त्यांना हा सन्मान दिला जाणार आहे. पिल्लै यांचा जन्म दक्षिण आफ्रिकेतील डरबन येथे भारतीय तमिळ वंशाच्या कुटुंबात झाला होता. पिल्लै दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश होत्या. रवांडातील नरसंहाराशी संबंधित प्रकरणांची सुनावणी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय न्यायालयातही त्यांनी काम केले. त्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार प्रमुखही राहिल्या आहेत. रवांडातील एका ऐतिहासिक खटल्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. या प्रकरणात न्यायालयाने बलात्कार आणि लैंगिक हिंसाचारालाही नरसंहाराचा गुन्हा मानले जाऊ शकते, असे नमूद केले. नोबेलचे बाकी पुरस्कार स्वीडनमध्ये दिले जातात, मात्र शांततेचा नोबेल नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे दिला जातो. यामागची वजह सुमारे १३० वर्षे जुनी आहे. ही व्यवस्था स्वतः अल्फ्रेड नोबेल यांनी त्यांच्या इच्छापत्रात ठरवली होती. १८९५ मध्ये लिहिलेल्या आपल्या इच्छापत्रात नोबेल यांनी ठरवले होते की शांतता पुरस्काराचा निर्णय नॉर्वेच्या संसदेद्वारे निवडलेली समिती घेईल. त्या वेळी स्वीडन आणि नॉर्वे एकाच राजाच्या अधिपत्याखाली होते, मात्र दोन्ही देशांची स्वतःची संसद आणि वेगळी राजकीय व्यवस्था होती. शांतता पुरस्कारासाठी त्यांनी नॉर्वेचीच निवड का केली, हे नोबेल यांनी सांगितले नव्हते. नोबेल यांचा १८९६ मध्ये मृत्यू झाला आणि १९०१ पासून पुरस्कार दिले जाऊ लागले. त्या वेळी स्वीडन आणि नॉर्वे एका संघराज्यात होते.



## स्फोटके निकामी करताना ४ जवान जखमी

**सुकमा/वृत्तसंस्था** : छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त सुकमा जिल्ह्यात निकामी व जुनी स्फोटके नष्ट करत असताना झालेल्या अपघाती स्फोटात केंद्रीय राखीव पोलिस दलाचे (सीआरपीएफ) चार जवान जखमी झाले आहेत. यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. भेजी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एलारमडगु सुरक्षा शिबिराजवळ गुरुवारी सायंकाळी ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, कोंटा रेंज अंतर्गत येणा-या भागातील विविध शिबिरांची पाहणी करणे आणि तेथील निरुपयोगी तसेच शिल्लक राहिलेली स्फोटके सुरक्षितपणे निकामी करण्यासाठी सीआरपीएफच्या ५०व्या बटालियनचे दारूगोळा तांत्रिक पथक जगदलपूरहून एलारमडगु शिबिरात पोहोचले होते. हे पथक सुरक्षा शिबिरापासून सुमारे २०० मीटर अंतरावर असलेल्या बोडराजपदार नाल्याजवळ सर्व सुरक्षा नियमांचे पालन करत स्फोटके निकामी करण्याचे काम करत होते. मात्र, त्याच वेळी स्फोटकाचा एक तुकडा अचानक उडून जवळच पडला आणि त्याचा जोरदार स्फोट झाला, अशी माहिती एका वरिष्ठ अधिका-याने दिली. या अपघाती स्फोटात सुरक्षितता आणि विल्हेवाटीच्या कामासाठी तैनात असलेले चार जवान जखमी झाले. जखमींमध्ये एटीटी पथकाचे सदस्य असलेले सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक एम. के. तिवारी आणि निरीक्षक अमरनाथ मिश्रा, तसेच ५० व्या बटालियनचे एएसआय अनिस खान आणि हेड कॉन्स्टेबल कुलदीप राज यांचा समावेश आहे. यापैकी दोन्ही एएसआय गंभीर जखमी झाले आहेत.



## सोन्याची चमक जागतिक बाजारात खालावली

**नवी दिल्ली** : सोन्याची किंमत झपाट्याने वाढत असताना आता त्या वेगाने घसरण पाहायला मिळत आहे. जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किंमती २७ टक्क्यांनी घसरल्या आहेत. भारतीय बाजारपेठेत जानेवारीपासून आतापर्यंत २३ टक्क्यांनी दर कपात झाली आहे. त्यामुळे सण, उत्सवाच्या वातावरणात सोने खरेदी करणा-यांना अद्याप हा प्रश्न पडला आहे की सोन्याचे दर आणखी घसरणार आहेत का? एमसीएक्सवर सोन्याचे दर ऑगस्ट अखेरीस प्रति १० ग्रॅम १ लाख ६४ हजार ७७३ रूपयांवर पोहचले होते. त्यानंतर सोन्याच्या किंमतीत घट पाहायला मिळत आहे.मागील आठवड्यात प्रति ग्रॅम भाव १ लाख ४५ हजार ९९१ पर्यंत घसरला होता. जागतिक बाजारपेठेत सोन्याचे दर घसरत आहेत. सोन्याच्या किंमती घसरण्यामागे कारणे सोन्याच्या किमतीतील अलीकडील घसरणीमागे अनेक जागतिक घटक आहेत. सुरुवातीला विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर गुंतवणूकदारांनी केलेल्या नफावसुलीमुळे किमतींवर दबाव आला. त्यानंतर अमेरिकेतील महागाई आणि व्याजदरांविषयीच्या वाढत्या चिंतेनेही सोन्याच्या वाढीला कमकुवत केलेअमेरिकेच्या वास्तविक बॉण्ड उत्पन्नातील तीव्र वाढीमुळे व्याजरहित सोने गुंतवणूकदारांसाठी कमी आकर्षक बनले आहे.डॉलरच्या मजबुतीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्यावर दबाव वाढला आहे. याशिवाय वाढत्या महागाईची भीती आणि अमेरिकेच्या व्याजदर धोरणातील कठोरपणाचाही सोन्याच्या किमतींवर परिणाम झाला आहे. आंतरराष्ट्रीय स्पॉट गोल्डचा भाव प्रति औंस ४,०२५ ते ३,९५० डॉलरपर्यंत घसरण्याची शक्यता आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## मर्यादांचे भान ठेवा

भारतीय राज्यघटनेने संसदीय लोकशाहीचा पाया रचताना सत्तेचे विभाजन करतानाच विविध घटनात्मक संस्थांना परस्परांवर अंकुश ठेवण्याची आणि त्याच वेळी आपापल्या क्षेत्रात स्वायत्त राहण्याची सुदृढ व्यवस्था निर्माण केली. या रचनेचा कणा म्हणजे निःपक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रणाली.राज्यघटनेच्या कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगावर देशातील निवडणुकांचे संचालन, दिशादर्शन, नियंत्रणाची जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीसंदर्भात दाखल जनहित याचिकांवरील सुनावणी झाली. ती भारतीय राज्यव्यवस्था, प्रशासकीय कायदे आणि न्यायालयीन पुनरावलोकन या तिन्हींसंदर्भात महत्त्वाची ठरते. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने नोंदवलेली निरीक्षणे लोकशाही संस्थांच्या अंतर्गत कामकाजाचे घटनात्मक मर्म अधोरेखित करणारी आहेत. निवडणूक आयोगाला दिलेले अधिकार सर्वसमावेशक आहेत; मात्र देशातील कोणतीही संस्था संविधानाच्या मूलभूत रचनेच्या पलीकडे नाही. न्यायालयाने हीच बाब नव्याने स्पष्ट केली. आयोगाचा कोणताही निर्णय प्रचलित कायदे किंवा राज्यघटनेतील तरतुदींचे उल्लंघन करणारा असेल, तर त्या निर्णयाची छाननी करणे, त्याला स्थगिती देणे किंवा तो रद्दबातल ठरवणे हा सर्वोच्च न्यायालयाचा घटनादत्त अधिकार असल्याचे खंडपीठाने अधोरेखित केले. आयोगाच्या दैनंदिन कामकाजात अनाठायी हस्तक्षेप न करणे आणि कायदा डावलून घेतलेल्या निर्णयांवर न्यायिक अंकुश ठेवणे, हा समतोल लोकशाही टिकवण्यासाठी अपरिहार्य ठरतो. प्रशासकीय कायद्यातील 'अल्ट्रा व्हायरस' म्हणजेच अधिकाराबाहेरचे कृत्य या तत्त्वानुसार, कोणत्याही स्वायत्त संस्थेला कायद्याने आखून दिलेल्या मर्यादेतच काम करावे लागते. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या धोरणात्मक निर्णयांची न्यायिक तपासणी होऊ शकते, हे सांगून न्यायालयाने कायद्याचे राज्य सर्वोच्च असल्याचे पुन्हा स्पष्ट केले. याचिकांमध्ये आरोप आहे की,'एसआयआर'संदर्भातील सुमारे १४ निर्णय इतर दोन निवडणूक आयुक्तांच्या सहमतीशिवाय अथवा चर्चेविना घेतले. यावर खंडपीठाने केलेले भाष्य संस्थात्मक कार्यपद्धतीचा गाभा विषद करणारे आहे. निवडणूक आयोगाने सर्व निर्णय एकमताने घेणे अपेक्षित आहे. तीन सदस्यीय आयोगात कोणत्याही एका सदस्याचा मग ते मुख्य निवडणूक आयुक्त का असेना, एकतर्फी निर्णय हा संपूर्ण आयोगाचा निर्णय मानला जाऊ शकत नाही. १९९३ च्या सुधारणेनंतर निवडणूक आयोग हा खऱ्या अर्थाने बहुसदस्यीय बनला. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने 'टी. एन. शेषन विरुद्ध भारत सरकार' खटल्यात स्पष्ट केले की, मुख्य निवडणूक आयुक्त हे सहकाऱ्यांमध्ये 'प्रथमात प्रथम' असतात; पण ते इतर सहकाऱ्यांपेक्षा अधिकाराने उच्च अथवा सर्वेसर्वा नसतात. बहुसदस्यीय मंडळात विचारविनिमय, सामूहिक जबाबदारी आणि बहुमताचे तत्त्व हेच निर्णयाचे अधिष्ठान असते. एखादा निर्णय आवश्यक प्रक्रियेशिवाय किंवा सहकाऱ्यांच्या संमतीशिवाय परस्पर घेतल्याचे निष्पन्न झाले, तर असा निर्णय मागे घेतला जाऊ शकतो अथवा त्यावर न्यायालय बंदी घालू शकते, ही टिप्पणी संस्थेअंतर्गत लोकशाहीचे रक्षण करणारी आहे. याचिकेत मुख्य निवडणूक आयुक्तांच्या तत्काळ निलंबनाची मागणी होती; ती न्यायालयाने विवेकपूर्ण आणि घटनात्मक पद्धतीने फेटाळली. मुख्य निवडणूक आयुक्त पदाला घटनात्मक संरक्षण आहे. त्यांना पदावरून हटवण्यासाठी महाभियोगासारखी विशेष प्रक्रिया पूर्ण करावी लागते. राज्यघटनेने न्यायालयाला मुख्य निवडणूक आयुक्तांना तडकाफडकी निलंबित करण्याचे थेट किंवा विशेष अधिकार दिलेले नाहीत. केवळ आरोपांवरून घटनात्मक पदावरील व्यक्तीविरोधात अंतरिम आदेश दिला जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले. न्यायालयाने केंद्र सरकार, निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू व विवेक जोशी तसेच संबंधित अधिकाऱ्यांना नोटिसा बजावून त्यांची अधिकृत उत्तरे आणि मूळ दस्तावेज मागवले आहेत. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सत्य समोर येईल.कळीचा मुद्दा म्हणजे 'फॉर्म ६'मधील बदलांचा विषय. हा फॉर्म मतदार यादीतील नावनोंदणीसाठीचा मूलभूत अर्ज आहे. मतदार यादीची शुद्धता आणि सर्वसमावेशकता यावरच प्रातिनिधिक लोकशाहीचा डोलारा उभा असतो. त्यामुळे अर्जातील अथवा त्याच्याशी संबंधित नियमावलीत बदलांबाबत न्यायालयीन मंजुरी अथवा विहित कायदेशीर पद्धतींचा अवलंब होणे अनिवार्य असते. अशा कोणत्याही बदलाला सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिलेली नाही. आयोगाचे नियम बदलताना निवडणूक कायदे आणि नियमावलीच्या चौकटीचे तंतोतंत पालन झाले आहे की नाही, हे आयोगाच्या अधिकृत उत्तरावरून आणि नोंदींवरून स्पष्ट होईल. दुबार मतदार नोंदणी जशी बेकायदेशीर तसेच पात्र मतदारांचा मताधिकार काढून घेणेही बेकायदाच. याची दक्षता आयोगाने घ्यायलाच हवी. जात, धर्म, वंश, लिंग, संपत्ती किंवा सामाजिक प्रतिष्ठा या निकषांवर भेदभाव न करता प्रत्येक सज्ञान नागरिकाला दिलेला मताधिकार ही भारतीय प्रजासत्ताकाची खरी ताकद आहे. ब्रिटिश राजवटीत मतदानाचा अधिकार केवळ कर भरणारे, उच्चशिक्षित किंवा विशिष्ट मालमत्ता असणाऱ्या मूठभर उच्चभ्रू लोकांना होता. पाश्चात्त्य आणि विकसित देशांत महिला आणि उपेक्षितांना मतदानाच्या हक्कासाठी कित्येक दशके संघर्ष करावा लागला होता; पण संविधानाने स्वतंत्र भारताला पहिल्याच दिवसापासून सार्वत्रिक प्रौढ मताधिकार बहाल केला.'एक व्यक्ती, एक मत आणि एका मताचे समान मूल्य' या तत्त्वाने शतकानुशतके चालत आलेली सामाजिक विषमतेची उतरंड राजकीय पातळीवर एका झटक्यात मोडून काढली. न्यायालयाने नागरिकांच्या मताधिकाराचे महत्त्व जपण्याच्या कर्तव्याची आठवण आयोगाला करून दिली. न्यायालयाने निवडणूक आयोगाला उत्तरदायी ठरवत सर्व दस्तावेज मागवून घेतले, तर केवळ आरोपांच्या आधारे घटनात्मक पदाला अस्थिर करण्याचे प्रयत्न रोखून संस्थेचे संरक्षण केले. कोणत्याही लोकशाही राष्ट्रात घटनात्मक संस्थांची पत ही त्यांनी घेतलेल्या निर्णयांच्या पारदर्शकतेवर आणि सामूहिक विचारमंथनावर अवलंबून असते. निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थेतील प्रत्येक पाऊल संशयातीत असणे ही घटनात्मक जबाबदारी आहे. आगामी तपासणी या संपूर्ण प्रकरणाला कायदेशीर परिणती देईल. तोपर्यंत पूर्वग्रहाविना, न्यायालयीन प्रक्रियेचा आदर राखत आणि संविधानाने घालून दिलेल्या मर्यादांचे भान ठेवत या विषयाकडे पाहणे, हाच सुजाण लोकशाहीचा मार्ग आहे.

# दुष्काळ सर्वेक्षण अन् मदतीतील आव्हाने



**दुष्काळी मदत जर योग्य पात्र व्यक्तीकडे पोहोचायला हवी असेल तर योग्य सर्वेक्षण होणे आवश्यक आहे आणि योग्य सर्वेक्षण होण्यासाठी आवश्यक तो वेळ देणे आवश्यक आहे...**

महाराष्ट्रात अखेर शासन स्तरावरून दुष्काळ जाहीर झाला. आता या विषयाचा दुसरा अध्याय सुरू झाला आहे आणि तो म्हणजे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे सर्वेक्षण ! मदत वाटपाच्या पार्श्वभूमीवर महसूल मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे दुष्काळामुळे पिकांचे नुकसान झालेल्या प्रत्येक शेतांचे सर्वेक्षण बांधावर जाऊन केले जाणार आहे. प्रत्येक शेताचा पंचनामा होणार आहे. सर्व पंचनामे ग्रामसभेसमोर ठेवले जाणार आणि ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर ही यादी अंतिम होणार आहे. हे सर्व ऐकल्यानंतर सर्वसामान्यांना मंत्री महोदयांनी एकदम योग्य भूमिका घेतली असा भाव निर्माण होणे स्वाभाविक आहे.दुसरीकडे शासनाच्या एका जबाबदार मंत्र्यांच्या घोषणेनुसार सर्व शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी मदत खात्यात जमा केली जाणार आहे, ही घोषणा सुद्धा दिलासादायक आहे. यामधील चौथा स्तंभ माध्यमे आहेत. ते सुद्धा त्वरित मदत झाली पाहिजे, ही भूमिका आग्रहपूर्वक मांडत आहेत.

या सगळ्या गदारोळात प्रशासकीय यंत्रणा मात्र मूक आहे. प्रचंड दडपणात असलेल्या या यंत्रणेला विहित मुदतीत आणि अचूक काम करायचे आहे. २६५ तालुक्यातील सर्वेक्षण करावयाचे गावांची संख्या सुमारे ३० ते ३२ हजार आहे, असे गृहीत धरुया. महाभूमीनुसार राज्यातील एकूण गट/स.नं. (सातबारा) संख्या १.९५ कोटी ते २.०० कोटी आहे तर खातेदार संख्या १.५० ते १.६० कोटी असेल. एकंदरीत यंत्रणेला म्हणजेच ग्रामस्तरीय समितीला १.९५ ते २.०० कोटी शेतांच्या बांधांवर जावे लागणार आहे. बरे प्रत्यक्षात क्षेत्रीय स्तरावर कोण काम करणार आहे तर ते ग्रामस्तरीय समिती करणार आहे. या समिती मध्ये तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायक (सुलभ संदर्भासाठी जुनी पदनामे घेतली आहेत.) यांची कार्यरत पदसंख्या किती आहे. तलाठी ११,५००, ग्रामसेवक १६,००० आणि कृषी सहायक ७,५००. अर्थात याच्या ७५ टक्के कर्मचारी बाधित क्षेत्रातील कार्यरत पदसंख्या असेल. प्रशासनाच्या दृष्टीने पहिले आव्हान हे ठरते की असमतोल पदसंख्या असलेल्या या तीन संवर्गाच्या एकूण गावांसाठीच्या 'ग्रामस्तरीय समित्या' स्थापन करणे आणि त्यांना गाव वाटप करणे. त्यांच्या मध्ये समन्वय घडवून आणणे आणि त्यांच्याकडून काम करून घेणे. या वरून आपल्याला या कामाची व्याप्ती आणि भीषण वास्तव लक्षात येईल.

दुसरीकडे मात्र सत्ताधारी, विरोधक, माध्यमे हे आपापल्या परीने या प्रश्नांची दाहकता मांडून शेतकरी प्रेम व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात. शेतकरी यांना जेवढ्या शक्य होईल तेवढ्या लवकर मदत मिळावी यासाठी प्रशासनावर दबाव निर्माण करतात.

या मध्ये मग शासनाचा जिल्हा प्रशासनावर दबाव वाढतो. सर्वेक्षण सुरू झाले की रोजचे progresive आकडे देणे सुरू होते. त्याचा परिणाम असा होतो, की विविध जिल्हा अधिकारी यांच्यामध्ये एक स्पर्धा सुरू होते. परिणामी ग्रामस्तरीय समितीवर सुद्धा दबाव वाढतो. आता इथेच मोठी अडचण निर्माण होते. प्रत्येक शेताच्या बांधावर जाणे आणि पंचनामा करणे, शेतकरी यांचे समाधान करणे, याकरिता लागणारा प्रत्यक्ष वेळ आणि प्रशासनाचा दबाव यामध्ये काळ/काम/वेग यांचा मेळ साधणे कठीण होऊन जाते. यामध्ये चुका होण्याची शक्यता वाढते. सोबतच शेतीच्या संबंधित ताबा आणि मालकी हक्काचे वाद, सामाईक क्षेत्र,वारस हक्काचे वाद हे सुद्धा अडचणीचे आणि सर्वेक्षणाचा वेळ वाढविणारे ठरतात. या सर्वेक्षण करण्यासोबतच मदत वाटपाचे दुष्टीने आवश्यक असलेली माहिती, जसे की लाभार्थ्यांचे नाव, आधार क्रमांक, बँकेचे नाव, खाता क्रर्माक, बँकेचा IFSC कोड, ही माहिती सुद्धा संकलित करायची असते. ते अतिशय जिकरीचे आणि वेळखाऊ आहे. स्थानिक स्तरावर होणारा राजकीय हस्तक्षेप सुद्धा एक महत्त्वाचा घटक ठरतो जो दुर्लक्षित करता येणार नाही.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा असा आहे, की हे प्रचंड काम करीत असताना ग्रामस्तरीय समिती ते जिल्हास्तरीय समिती यांना मोठ्या प्रमाणात साधन सामग्री आवश्यक असते. दुर्दैवाने आणि खेदपूर्वक नमूद करावे लागते की राज्याचा,'मदत आणि पुनर्वसन' विभाग या करिता एक छदाम सुद्धा देत नाही, ही शोकांतिका आहे. हे काहीही असले तरी हे काम लोक हिताचे काम असल्यामुळे यंत्रणा प्रामाणिकपणे काम करेल आणि त्यांनी ते करणेच अपेक्षित आहे. परंतु दुसऱ्या बाजूला सत्ताधारी, विरोधक आणि माध्यमे यांनी या प्रश्नाचे गांभीर्य समजून घ्यायला पाहिजे. जर योग्य पात्र व्यक्तीकडे मदत पोहोचायला हवी असेल तर योग्य सर्वेक्षण होणे आवश्यक आहे आणि योग्य सर्वेक्षण होण्यासाठी आवश्यक तो वेळ देणे आवश्यक आहे.

**श्याम जोशी,**
सेवा निवृत्त मंडळ अधिकारी, महसूल विभाग
तथा सल्लागार
महाराष्ट्र राज्य तलाठी/पटवारी/मंडळ अधिकारी समन्वय महासंघ,वाशीम.
मो.९४२०३९१२५५

# गुंतवणूकदार व शेतक-यांचे नुकसान

'नुकसानी'च्या दोन बातम्या एकाचवेळी येऊन आदळत आहेत.१.काल सेन्सेक्स जवळपास १००० अंशांनी खाली आला आणि गुंतवणूकदारांचे जवळपास १० लाख कोटी रुपयांचे 'नुकसान' झाले. मागच्या सहा महिन्यात ६००० अंशांनी खाली. म्हणजे नुकसान काही दश लक्ष कोटी रुपये.२. त्याचवेळी अल निनो मुळे भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे बरेच 'नुकसान' झाले आहे. खरेतर अस्मानी संकटे शेतकऱ्यांवर दरवर्षी निरनिराळ्या नावाखाली आदळत असतात.

दोन्हीला 'नुकसान'च म्हटले जाते. पण अधिक बारकाईने बघितले तर कळते 'नुकसान' या शब्दाच्या अनेक अर्थछटा आहेत. नोशनल/ प्रतिकात्मक नुकसान वि रिअल/ खरेखुरे नुकसान, भरून येऊ शकणारे वि भरून येऊ न शकणारे, कायमचे/ उद्ध्वस्त करणारे वि सहन करण्याजोगे नुकसान, स्वताच्या चुकीच्या निर्णयामुळे वि सिस्टिममुळे/ आपला काही दोष नसताना.. इत्यादी

**प्रथम शेयर मार्केट मधील नुकसान**

शेयर बाजारात ज्यावेळी एखाद्या कंपनीचा शेयर किंवा निर्देशांक पडतो त्यावेळी 'नुकसान' झाले असे जे म्हटले जाते त्याला Notional Loss असेच म्हणतात.म्हणजे तो कागदावर असतो. एखाद्या गुंतवणूकदाराने चढ्या किमतीला घेतलेला शेयर तो गुंतवणूकदार पडलेल्या भावाला विकतो त्याचवेळी त्याला प्रत्यक्ष नुकसान/तोटा झालेला असतो. विकला नाही तर तो नोशनल लॉस असतो. उद्या तोच पडलेला शेयर, गुंतवणूकदाराने स्वतः काहीही न करता (स्वतः काहीही न करताष्ठ.हे शब्द महत्वाचे आहेत) वधारला तर त्याचा तोटा नफ्यात परावर्तित होऊ शकतो.

हेच दुसऱ्या शब्दात मांडता येईल.१०० रुपये खरेदी किमतीला घेतलेला शेयर समजा १५० रुपये झाला तर गुंतवणूकदाराला ५० रुपये नोशनल नफा झालेला असतो. त्यानंतरच्या काळात तोच शेयर आता समजा १२५ रुपयांवर घसरला तर त्याचे नुकसान झाले असे म्हणता कामा नये तर आधीचा ५० रुपये नोशनल नफा आता २५ रुपये नोशनल नफा झाला असे म्हटले पाहिजे. नुकसान नाही.

**आता शेतीतील नुकसान**

पूर्णपणे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारा भारतीय शेतकऱ्याचे ज्यावेळी निसर्गाच्या अवकृपेमुळे नुकसान होते ते खरेखुरे असते. त्यात नोशनल असे काही असूच शकतात नाही.

यावर्षी 'अल निनो' वर बिल घालता येईल. पण देशाच्या विविध भागात कधी अतिवृष्टी,कधी दुष्काळ, कधी किडीचा प्रादुर्भाव यामुळे नफा जाऊदे, शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघत नाही. त्यात भर पडते शासनाच्या विविध निर्णयांची. सिस्टीमची. यावर्षी पुरेसे शेतीकर्ज मिळाले का, हमीभाव किती मिळणार, परदेशातून आयात होणाऱ्या त्याच शेतमालावर आयात कर कमी केले का जास्त केले इत्यादी.

यात नोशनल काहीही नसते. सारे काही ठोस. त्यामुळे ज्यावेळी नुकसान होते त्यावेळी ते नुकसान, शेतकरी हातावर हात ठेवून बसला तर आपोआप भरून येऊ शकत नाही. ऊस वगैरे सोडला तर एकूण वर्किंग सायकल काही महिन्याचे. फक्त धान्य निगम, मोठे व्यापारी गोडाऊन मध्ये साठा करतात. त्यांना नोशनल नफा/तोटा होतो. शेतकऱ्यारी लगेच पीक विकतात. कारण त्यांना पुढच्या हंगामासाठी, कुटुंबासाठी पैसे हवे असतात. (याची तुलना शेयरशी करा)

बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक असल्यामुळे सीझनला मिळणारा नफा, मिळालाच तर, मुळात कमी. त्यामुळे संचित नफा/ ठेवी अशा काही फार नसतात. आधीच्या सायकल मधील संचित नफा यासाठी महत्वाचा की त्यामुळे जोखीम क्षमता तयार होते. शेयर बाजारातील संस्थात्मक गुंतवणूकदार बाजूला ठेवूया. हाय नेटवर्थ गुंतवणूकदार देखील बाजूला ठेवूया. ज्या व्यक्ती शेअर्स मध्ये गुंतवणूक करतात त्यांचे त्यांची कुटुंबे चालवण्यासाठी लागणारे अर्थार्जन करण्याचे स्त्रोत वेगळे असतात. शेतकऱ्याचे तसे नाही. शेती त्याचे उपजिविकेचे



कुटुंब चालवण्याचे साधन आहे. अर्थव्यवस्थेतील विविध प्रकारच्या ॲक्टिव्हिटीज मध्ये होणारा नफा/तोटा,लाभ/नुकसान यांना एकच एक परिभाषा वापरली तर त्यातील सूक्ष्म फरक चिमटीत पकडता येत नाही.

शेतीमध्ये नुकसान झाले तर दरवेळी शासनाने का नुकसानभरपाई द्यायची? कोणत्याही धंद्यात नुकसान होतच असते की? त्यांना का नाही शासन भरपाई देत? असे प्रश्न शहरातील मध्यम वर्गीय व्यक्ती सहजपणे विचारतात.हा वाटतो तसा अकादेमिक किंवा तांत्रिक, भाषिक प्रश्न नाही. शेवटी नफा/ तोटा/ नुकसान.. या संज्ञा अर्थशास्त्रातील संज्ञा आहेत. ज्या औद्योगिक क्षेत्र आणि शेतीक्षेत्रातील मूलभूत आर्थिक फरक पकडत नाहीत.

दरम्यान नवउदारमतवादी काळात औद्योगिक/वित्त भांडवलाने आपली वेगळी परिभाषा मात्र तयार केली आहे. जी आधी कधीच नव्हती. दोनच उदाहरण: बदनाम शब्द असणाऱ्या सब्सिडीला त्यांनी Viability Gap Funding बनवले आणि कर्जमाफीला हेयर कट! अशी अनेक उदाहरणे देता येतील. अत्यंत पोचलेले लोक आहेत हे.

शेतीक्षेत्रासाठी शेतकरी स्नेही आर्थिक परिभाषा तयार झाली तर त्याचा उपयोग शेतकरी संघटनांना ठोस मागण्या करण्यासाठी, शासनाला शेती स्नेही धोरणे आखण्यासाठी उपयोगी पडेल. शेतीसकट अनेक क्षेत्रासाठी राजकीय अर्थव्यवस्थेतील, मनाची पकड घेणाऱ्या भाषा, परिभाषा, नवनवीन संकल्पना खुप महत्वाच्या असतात. यावर काम झाले पाहिजे.

उदा. देशाला हव्या असणाऱ्या पण स्वतःहून अनव्हायेबल असणाऱ्या शासनाकडून व्हायबिलिटी गॅप फंडिंग मिळणार असेल तर त्याचा पहिला दावेदार structurally unviable असणारे शेती क्षेत्र आहे. ही मांडणी जोमदारपणे पुढे आली पाहिजे.

**-संजीव चांदोरकर**

# हव्यास ठेकेदारीचा सत्यानाश विकासाचा

दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत लोकसभा,राज्यसभा,राज्यातील विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थामधील लोकप्रतिनिधी हे जनप्रतिनिधी ऐवजी ठेकेदारी करण्यात अग्रेसर आहेत.परिणामी निकृष्ठ दर्जा ३०ते ४०% कमिशनच्या हव्यासापोटी रस्ते विकासाचा सत्यानाश होत आहे.कमिशन खोरीमुळे निकृष्ठ दर्जाचे बांधकाम खुलेआम सुरु आहे. बांधकामापुर्वीच कमिशन लाटल्या जाते.परिणामी निकृष्ट दर्जाचे बांधकाम अनिर्बंध सुरु आहे. याचा थेट परिणाम निर्माणाधीन रस्ते व पुलांच्या बांधकामावर होतो.आणी पूल पाच सहा महिन्यातच ध्वस्त होतात. हे निकृष्ठ दर्जाच्या बांधाकामाचे वास्तव आहे. परंतु या वास्तवाचे भान लोकप्रतिनिधींना व केंद्र आणी राज्य सरकारांना आहे.लोकप्रतिनिधीच ठेकेदाराच्या भूमिकेत असल्याने त्यांच्या हेतुपुरस्सर दुर्लक्षामुळे उपलब्ध निधीचा गैरवापर वाढला आहे.

भारतात २०२० ते २०२५ पर्यंत १७० पेक्षा अधिक पूल कोसळल्याच्या घटना व २०२ लोकांचे मृत्यू झाले आहेत.यात नवीन निर्माणाधीन पुलांचा समावेश आहे.राष्ट्रीय महामार्गावरील केंद्रीय वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने संसदेत ही माहिती दिली आहे. तीन वर्षात राष्ट्रीय महामार्गावरील ४७ पूल कोसळले. मोदींच्या १२ वर्षात काळात बिहार,गुजरात,उत्तराखंड या राज्यात सर्वाधिक पूल कोसळल्याच्या घटना आहेत.

राज्यातील नोंदी अश्या बिहार २६,उत्तराखंड (डोंगराळ भागात) २५,गुजरात १६, साधे पूल व ओहर ब्रिज यामुळे झालेले नुकसान बिहार ३९५३ कोटी, गुजरात २१२ कोटी, उत्तराखंड बिहारमधील मोरवी पूल दुर्घटना १३५ जणांचा मृत्यू तर पुनर्बांधणी खर्च ७हजार कोटी खर्चाचा बोजा राज्यसरकारवर पडला. तसेच २०१३ ला केदारनाथ महापुराच्या काळात एकाचवेळी २१ मोठे पूल वाहून गेले.

वेगवेगळ्या घटनात २०१२ मधे चौरस (पौंडी) पूल अपघातात ६ मजुरांचा मृत्यू झाला.रुद्रप्रयाग येथील सिग्नेचर पुल,एकूण छोट्या मोठ्या पूल कोसळण्याच्या घनात ३० लोकापेक्षा लोकांचा मृत्यू झाले.महाराष्ट्रात नांदेड उड्डाण पूल दुर्घटना, पुना इंद्रायणी पूल दुर्घटना यात वित्तहानी जीवितहानी झाल्याची नोंद आढळते. सत्तारूढ सरकार मधील पंतप्रधानांपासून विविध राज्याचे मुख्यमंत्री देशाचे व राज्याचे बांधकाम मंत्री, यांच्या वरदहस्ताने हा भ्रष्ट कारभार दामदुपट्टीच्या वसुलीने संपूर्ण देशातील निर्माणाधीन बांधकामे बाधित होत आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील विकासकामे निकृष्ठ्दर्जाने दैनंदिन वाहतुकीसाठी निरोपयोगी ठरतात.राष्ट्रीय महामार्गावर करोडो रुपये खर्चून बनविण्यात आलेले तथा बनविण्यात येणारे साधे आणी उड्डाणपूल सहा महिन्यातच कोसळतात याला निर्माणाधीन पूल अपवाद नाहीत.

उत्तराखंडातील पर्वत रागांना पोखरून बनविण्यात आलेले बोगदे निर्माणाधीन बांधकामा दरम्यान कोसळले. त्यात शेकडो मजूर अडकले.काही मृत्यूमुखी पडले.तर काही जखमी झाले.निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. उत्तराखंडमधील पर्वत रांगा निसर्गातील अनोखे संरक्षक व पर्यावरण पुरक आहेत.त्यांना पोखरण्याच्या निर्णयाने पर्वतांना हानी पोहोचली.जनजीवनावर विपरीत परिणाम झाला. पर्वत कडावर आश्रयासाठी उभारलेली घरे असुरक्षित झाली.रहिवाश्यांचे जिवन बाधित झाल्याचे केंद्रीय संशोधकांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे.

दिल्ली येथे गरज नसतांना बनविण्यात आलेले संसद भवन इमारत पहिल्याच पावसात इमारतीतून पाझर फुटले.संपूर्ण इमारतिचा परिसर जलमय झाला.करोडो रुपये अनावश्यक खर्चातील निकृष्ट दर्जातील इमारत कमिशन खोरीत बाधित झाली.या सर्व प्रकारचा धागा पीएमओपर्यंत पोहचतो.

पूल कोसल्यामुळे केवळ सिमेंट लोखंडाचे नुकसान होत नाहीतर अर्थव्यवस्थेची गती खंडित होते.याव्यतिरिक्त पूल तुटल्यामुळे माल वाहतूक करणारे ट्रक इतर वाहनांना ४० ते १०० किलोमीटर वळसा घेऊन माल पोहचता करावा लागतो.त्यमुळे कोट्यवधीचे इंधन वाया जाते.माल उशिरा पोहोचतो.महामार्ग व मुख्य रस्त्यावरील नवनिर्माणा साठी बंद राहते. स्थानिक उद्योग शेतमाल वाहतूक व्यवस्था कोलमडते.परिणामी बाजारपेठेचे मोठे नुकसान होते. हे धक्कादायक खुलासा एका अहवालात उघड झाला.

**पुरुषोत्तम गुळवे**
मो.९४२२३२५०७

शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दुर्गोत्सवाच्या गर्दीआधी नगर परिषद ॲक्शन मोडवर!

## प्रभागनिहाय सनियंत्रण अधिकारी तैनात,रस्ते, स्वच्छता व नागरी सुविधाचा आढावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ , दि. ९ :** यवतमाळच्या ऐतिहासिक दुर्गोत्सवात लाखोंच्या संख्येने भाविकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन नगर परिषद प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांच्या सूचनेवरून शहरातील प्रत्येक प्रभागात सनियंत्रण अधिकारी नियुक्त करण्यात आले असून, उत्सवकाळात नागरी सुविधांमध्ये कोणतीही उणीव राहू नये, यासाठी प्रभागनिहाय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

मात्र, या नियोजनाची खरी कसोटी प्रत्यक्ष अंमलबजावणीत लागणार आहे. यवतमाळच्या दुर्गोत्सवाला शंभर वर्षांहून अधिक काळाची परंपरा आहे. भव्य देखावे, आकर्षक रोषणाई आणि विविध दुर्गा मंडळांच्या सजावटी पाहण्यासाठी महाराष्ट्रासह अन्य राज्यांतूनही भाविक शहरात दाखल होतात. अशा वेळी रस्त्यांची दुरवस्था, अस्वच्छता, अपुरा पाणीपुरवठा, सार्वजनिक शौचालयांची गैरसोय आणि वाहतुकीचे प्रश्न निर्माण होऊ नयेत, यासाठी नगर परिषद प्रशासनाने आतापासूनच हालचाली सुरू केल्या आहेत. नियुक्त सनियंत्रण अधिकाऱ्यांसोबत सहायक अधिकारी व कर्मचाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. प्रभागातील प्रलंबित कामांचा आढावा घेणे, संबंधित विभागांशी समन्वय साधणे आणि उत्सवापूर्वी आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, अशी जबाबदारी या यंत्रणेवर राहणार आहे. उत्सवाच्या काळात भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त वातावरण मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे केवळ अधिकारी नियुक्त करून चालणार नाही, तर रस्ते दुरुस्ती पासून स्वच्छते पर्यंत सर्व कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. नगर परिषदेच्या ॲक्शन प्लॅनची प्रभावी अंमलबजावणी झाली, तरच यवतमाळच्या दुर्गोत्सवाची शिस्तबद्धता आणि शहराची प्रतिमा अधिक उजळेल.

### रस्ते दुरुस्तीला वेग, नगराध्यक्षांकडून प्रत्यक्ष पाहणी

**दुर्गा उत्सवाच्या मिरवणुकांना अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शहरातील रस्त्यांच्या पॅचिंगची कामे सुरू करण्यात आली आहेत. नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके स्वतः विविध प्रभागांना भेटी देत असून, दुर्गा मंडळांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधून रस्ते, वाहतूक आणि अन्य अडचणी जाणून घेत आहेत.**

### प्रशासनावर नोडल अधिकाऱ्याचे सनियंत्रण

**नगर परिषदेचे प्रशासन अधिकारी विनोद डवले यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रभागनिहाय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेणे, मार्गदर्शन करणे आणि अहवाल प्राप्त करणे, ही जबाबदारी त्यांच्याकडे असेल. नगराध्यक्षा आणि मुख्याधिकारीही संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष ठेवणार आहेत.**

# आरेगाव येथे शॉट सर्कीट मुळे घराला आग लागून घरातील रोख रक्कम सह गृहउपयोगी वस्तू जळून खाक

## लाखोचे नुकसान निराधार कुटुंबांना शासनाकडून मदतीची आस!





✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ९ :** तालुक्यातील आरेगाव खुर्द येथील रहिवाशी पंकज तारासिंग पवार यांच्या राहत्या घराला आज दि.९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजताच्या दरम्यान विद्युत शॉर्ट सर्किट मुळे आग लागुन राहत्या घरातील सर्व गृह उपयोगी वस्तू जळून खाक झाल्या आहे.

यामध्ये TV, फ्रिज, फॅन, कुलर, शिलाई मशिन, कपाट, भांडे इतर वस्तु तसेच घरातील अन्नधान्य,कागदपत्रे, कपडे गृहपयोगी वस्तुसह रोख रक्कम ५०,०००/-हजार व दोन ग्रॅम सोने, इत्यादी सर्व गृहपयोगी वस्तुंचे आगेत जळून नुकसान झाले आहे.

घरातील जळालेल्या वस्तू एकुण त्यांचे अंदाजे २,५००००/- लाख रूपये नुकसान झाले आहे. अशी महसूल प्रशासनाने केलेल्या पंचनामा मध्ये उल्लेख आहे, आग एवढी भयंकर होती घरातील कोणत्याही वस्तू टिनपत्रे सुद्धा जळून खाक झाले आहे सुदैवाने या आगेत कोणतीही जिवितहानी झाली नाही, सदर घटनेनचा ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी स्थळ निरीक्षण व पंचनामा करून तहसीलदार यांच्याकडे तात्काळ सुपूर्द केला आहे, परंतु पवार कुटुंब हे आज रोजी सर्वतोपरी निराधार झाल्यामुळे त्यांना तात्काळ मदतीची गरज आहे, त्यामुळे झालेल्या नुकसान भरपाईची शासनाकडून मिळावी अशी आस लागली आहे.

## थोडक्यात

### दारव्हा उपजिल्हा रुग्णालय की चोरांसाठी मोकळे रान?



**दारव्हा :** उपचारासाठी रुग्णालयात यायचे की वाहनांच्या सुरक्षेची चिंता करीत बसायचे, असा संतप्त सवाल दारव्हा उपजिल्हा रुग्णालयातील वाढत्या चोरीच्या घटनांमुळे उपस्थित होत आहे. रुग्णांच्या नातेवाइकांच्या वाहनांमधून बॅटरी आणि पेट्रोल चोरीला जाण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचा आरोप असून, रुग्णालयाच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ८ ऑक्टोबर रोजी येथील अमोल वामनराव पांडे हे बहिणीला उपचारासाठी रुग्णालयात घेऊन आले होते. त्यांनी MH २९ T ५४८० क्रमांकाची महिंद्रा मॅक्सिमो रुग्णालयातील पिंपळाच्या झाडाजवळ उभी केली. दुपारी दोनच्या सुमारास वाहना जवळ परतल्यानंतर गाडीची बॅटरी चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दुपारी १२.४७ वाजता बसस्थानकाच्या दिशेने एक संशयित महिंद्रा सुप्रो वाहन परिसरात येताना, तर १२.५६ वाजता बाहेर जाताना दिसल्याची माहिती आहे. मात्र, वाहनाचा क्रमांक स्पष्ट दिसत नसल्याने संशयितांचा शोध घेण्याचे आव्हान कायम आहे. यापूर्वीही वाहनांमधून पेट्रोल चोरीला जाण्यासह तीन ते चार वाहनांच्या बॅटऱ्या चोरीला गेल्याचे सांगण्यात येते. आजारपणामुळे आधीच आर्थिक संकटात असलेल्या नागरिकांना चोरीमुळे अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागत आहे. रुग्णालय परिसरात पुरेशी सुरक्षा, नियमित देखरेख आणि प्रभावी गस्त आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेण्याची मागणी केली आहे. वैद्यकीय प्रशासन, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हाधिकारी आणि दारव्हा पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून चोरट्यांचा शोध घ्यावा व सुरक्षा व्यवस्था मजबूत करावी, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा पक्षाच्या वतीने तीव्र ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### पाण्याचा अपव्यय रोखा, अन्यथा नळजोडण्या तोडा!



**यवतमाळ :** खंडित पावसामुळे भूजल पातळीत घट होत असताना शहरात पिण्याच्या पाण्याचा अपव्यय सुरूच असल्याने, आता बेजबाबदार नळधारकांवर कारवाई करण्याची मागणी पुढे आली आहे. प्रभाग क्रमांक १७ सह संपूर्ण यवतमाळ शहरात पाणी वाया घालविणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक व प्रतिबंधात्मक मोहीम राबवावी, अशी मागणी नगरसेवक भारत ब्राम्हणकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता प्रफुलजी व्यवहारे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. नळांना तोट्या न लावणे, पाणी रस्त्यावर वाहू देणे आणि पिण्याच्या पाण्याचा वापर स्वच्छतागृहे धुण्यासाठी करणे, अशा प्रकारांमुळे पाण्याची नासाडी होत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. पाणीपुरवठ्याच्या वेळी विशेष तपासणी पथक तैनात करून प्रत्यक्ष पाहणी करावी, दोषी नळधारकांवर दंडात्मक कारवाई करावी, तसेच वारंवार सूचना देऊनही अपव्यय सुरू ठेवल्यास नळजोडणी तात्पुरती खंडित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पाणीटंचाईचे संकट उंबरठ्यावर असताना प्रशासनाने केवळ आवाहनांवर न थांबता प्रत्यक्ष कारवाई करावी, अशी भूमिका ब्राम्हणकर यांनी मांडली आहे.

### नागरिकांना पाणी बचतीचे धडे,जीवन प्राधिकरण कडूनच पाण्याची नासाडी!

**चांदणी चौक,पाइपलाइन गळती,धामणगाव मार्गावर खड्डा.**



**यवतमाळ :** जिल्ह्यात खंडित पावसामुळे भूजल पातळीत कमालीची घट झाली असून, आगामी काळात यवतमाळ शहरासह जिल्ह्याला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना पाणी जपून वापरण्याच्या सूचना वारंवार दिल्या जात आहेत. मात्र, दुसरीकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाइपलाइन मधूनच पाण्याची गळती होत असल्याचे चित्र दिसत असल्याने, नागरिकांनीच पाणी वाचवायचे आणि यंत्रणेने पाण्याची नासाडी होऊ द्यायची का? असा सवाल उपस्थित होत आहे. शहरातील चांदणी चौक परिसरात पाइपलाइन मधून पाणी गळत असल्याने मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याची तक्रार आहे. एकीकडे पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना, दुसरीकडे गळती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना होत नसल्याने संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यवतमाळ शहरातील विविध भागांत रस्ते खोदकामामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारीही आहेत. धामणगाव मुख्य मार्गावर मॉलच्या पुढे पाइपलाइनशी संबंधित मोठा खड्डा पडल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पाइपलाइनच्या कामाचा दर्जा, गळती आणि रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. पाणी वाचविण्याची जबाबदारी केवळ नागरिकांचीच नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणानेही गळती शोधून तातडीने दुरुस्ती करावी, निकृष्ट कामाची चौकशी करावी आणि संभाव्य पाणीटंचाईसाठी ठोस नियोजन करावे, अशी मागणी होत आहे. भविष्यात दुष्काळी परिस्थितीत बेंबळा धरणाचे पाणी उपयोगी पडण्यासाठीही आतापासून नियोजन आवश्यक आहे. नागरिकांना पाणी बचतीचे धडे देणाऱ्या यंत्रणेने स्वतःच्या कामातूनही पाणी वाचविण्याचा आदर्श घालून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वनजीव सप्ताहाचे औचित्य साधत काळी (दौ.) वनविभागाचा उपक्रम

## तिवरंग बीटमध्ये श्रमदानाने वनराई बंधाऱ्याची निर्मिती!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ९ :** वन्यजीव सप्ताहाचे औचित्य सादत वनपरिक्षेत्र काळी (दौ.) वर्तुळा अंतर्गत तिवरंग बीटमध्ये वन विभागाच्या वतीने ६ ऑक्टोबर रोजी अधिकारी, कर्मचारी व वनमजुरांनी श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली. या उपक्रमामुळे पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यास मदत होणार आहे. वनक्षेत्रातील वन्यजीवांसह जैविक विविधतेसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास हातभार लागणार आहे. वनक्षेत्रात पाण्याचे संवर्धन,मृदू संधारण आणि वन्यजीवांसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

ह्या वनराई बंधाऱ्यामुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून भूजल पातळी वाढून परिसरातील नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे. मंगळवारी काळी (दौ.) वनपरिक्षेत्र कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्याद्वारे श्रमदानातून वन्य जीवांची तहान भागविण्याच्या उद्देशाने वनराई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. सदर उपक्रमात वनपरिक्षेत्र अधिकारी आर.एस. बांगर मॅडम, वनपाल एस.जी. ठाकरे,वनरक्षक डी.एस.कोळी,ए. डी. राठोड,अरुण राठोड, वनरक्षक हगवणे, वनरक्षक मानतुटे, वनरक्षक सावते, वनरक्षक केंद्रे, वनरक्षक कु.एन. एन. नलावडे, वनरक्षक कु.एम.आर.मुसळे, वनरक्षक कु.आर. एस.कडवेकर तसेच वनमजूर सयाजी कांबळे, जयपाल आडे, सुभाष बेले,कृष्ण वायकुळे,गजानन कुडमाते,करण पिलावन,श्रीकांत डोरले,सचिन कदम,आकाश जाधव, करण देवकते, सुमित जाधव, बाळू कोकाटे,विष्णू चव्हाण व जय राठोड या कर्मचाऱ्यांनी बंधारा निर्मितीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

**या वर्षी पर्जन्यमान तूट असल्याने वन्यजीवांची तहाण भागावी या उद्देशाने वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधत मंगळवारी राबविण्यात आलेला वनराई बंधारा उपयुक्त ठरणार आहे. सदर उपक्रमातून 'वन्यजीवांचे संरक्षण म्हणजेच त्यांच्या अधिवासाचे आणि पाण्याचे संरक्षण' हा संदेश देण्यात येतो.वन्यजीव संवर्धनासाठी श्रमदानातून केलेला ह्या बंधारा निर्मितीचा उपक्रम भविष्यात महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**

**आर. एस. बांगर मॅडम,**
**वनपरिक्षेत्र अधिकारी,**
**वनपरिक्षेत्र कार्यालय,**
**काळी (दौ.)**

# ८० लाखांच्या मालमत्ता व्यवहारावर प्रश्नचिन्ह, सहकार खात्यावर संताप!

## संचालक मंडळावर कारवाईसाठी दिग्रसमध्ये धरणे आंदोलन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. ९ :** येथील शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्थेच्या सुमारे ७५ ते ८० लाख रुपये मूल्याच्या जागेवरील नऊ पक्क्या दुकानांच्या विक्री व्यवहारावरून सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. व्यवहारात सहकारी कायद्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप करीत भागधारकांनी सहकार खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

संबंधित संचालक मंडळावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. भागधारकांच्या निवेदनानुसार, दुकानांच्या विक्रीसाठी वृत्तपत्रांत जाहिरात किंवा जाहीर बोली प्रक्रिया राबविण्यात आली नाही. तसेच, मर्यादित अधिकार असलेल्या अधिकाऱ्याने ८० लाखांच्या मालमत्ता विक्रीला परवानगी दिल्याचा आरोप आहे. चौकशीदरम्यान संचालक मंडळाने व्यवहार बेकायदेशीर असल्याचे कबूल केल्याचा दावाही तक्रारदारांनी केला आहे. मात्र, याबाबत सहकार खात्याकडून ठोस कारवाई होत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. संस्थेचे जिनिंग-प्रेसिंग युनिट आठ वर्षांपासून बंद असून, २०० ते २५० कामगार बेरोजगार झाल्याचा दावा करण्यात आला आहे. याचा फटका ३५०० शेतकरी भागधारकांना बसत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणी ८ ऑक्टोबरपासून सहाय्यक निबंधक कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू करण्यात आले. प्रवीण शिंदे, पुनम पटेल, मनोज राठोड, प्रमोद बनगिनवार, बंडू अण्णा मात्रे, आनंद राऊत, अजिंक्य मात्रे, पुंडलिक इंगोले व अनिल हरसूलकर यांच्यासह शिवसैनिक आणि शेतकरी सहभागी झाले. संचालक मंडळ बरखास्त करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

# मराठीचा अभिमान केवळ भाषणात नको, व्यवहारातही हवा!

## नगर वाचनालयात डॉ. दिलीप अलोणे यांचे अभिजात मराठी भाषेवर परखड विवेचन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. ९ :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे हा अभिमानाचा विषय असला, तरी तिचे खरे संवर्धन दैनंदिन व्यवहारातील वापरातूनच होणार आहे. मराठीचा गौरव केवळ भाषणांपुरता मर्यादित न ठेवता शिक्षण, प्रशासन आणि सामाजिक व्यवहारातही तिचा प्रभावी वापर वाढविणे गरजेचे आहे, असे परखड प्रतिपादन लोककलावंत व वक्ते प्रा. डॉ. दिलीप अलोणे यांनी केले. नगर वाचनालय, वणी येथे अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते 'अभिजात मराठी भाषा' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी वाचनालयाचे संचालक अनिल जयस्वाल होते.

डॉ. अलोणे यांनी मराठीचा समृद्ध इतिहास, संत साहित्याची परंपरा आणि भाषेचे सांस्कृतिक वैभव उलगडले. भाषेचे जतन करण्यासाठी तिचा दैनंदिन वापर वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात अनिल जयस्वाल यांनी विद्यार्थ्यांनी मातृभाषेचे महत्त्व ओळखून मराठी संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. गजानन कासावार यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. देवेंद्र भाजीपाले, प्रमोद लोणारे आणि राम मेंगावर यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी, वाचक आणि साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# प्रकल्पबाधितांच्या प्रश्नांवर आता आरपारची लढाई!

## बच्चू कडूंचा इशारा,१८ तारखेच्या रात्रीपासून बोरगाव कोळसा खाणीत आंदोलन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. ९ :** वेकोलि प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनानंतरही मूलभूत समस्या कायम असल्याने आता आंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात येणार आहे.

"कोणत्याही दबावाला न घाबरता प्रकल्पबाधितांना न्याय मिळवून देऊ," असा ठाम निर्धार विधानपरिषद सदस्य तथा प्रहार संघटनेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी व्यक्त केला. मागण्या पूर्ण न झाल्यास १८ ऑक्टोबरच्या रात्रीपासून बोरगाव परिसरातील कोळसा खाणीत आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. भालर वसाहतीनजीकच्या बोरगाव पुनर्वसन परिसरात प्रकल्पबाधितांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी नागरिकांनी पिण्याचे पाणी, नियमित वीजपुरवठा, रस्ते आणि बेरोजगारीच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. स्थानिक युवकांनी कायमस्वरूपी रोजगाराची मागणी केली. पुनर्वसन होऊनही प्रश्न सुटत नसतील, तर प्रकल्पबाधितांनी न्याय कोणाकडे मागायचा, असा सवाल या समस्यांतून उपस्थित होत आहे. बच्चू कडू यांनी कुटुंबे, शेतमालक आणि नोकरदारांची माहिती घेत समस्यांची गांभीर्याने दखल घेतली. मागण्या मार्गी न लागल्यास खाण बंद करण्याच्या आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला. आंदोलन रोखण्यासाठी कोणताही दबाव आणला, तरी माघार घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रहारचे वणी विधानसभा अध्यक्ष सतीश देरकर व प्रहार शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुवीर कारेकर यांनी केले. यावेळी प्रवीण हेंडवे, मुकेश जीवतोडे यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# मानसिक आरोग्य दिनानिमित्त ताणतणाव, चिंता व नैराश्यावर संवाद

## डॉ. विनोद जाधव यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. ९ :** मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष न करता त्यावर वेळीच संवाद आणि योग्य समुपदेशन घेणे आवश्यक आहे, हा संदेश शिवरामजी मोघे महाविद्यालयात जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानातून देण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'मानसिक आरोग्य : समस्या आणि उपाय' या विषयावर हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. विनोद जाधव यांनी विद्यार्थ्यांना ताणतणाव, चिंता, नैराश्य आणि भावनिक अस्वस्थतेविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही आपल्या मनातील प्रश्न व वैयक्तिक समस्या मोकळेपणाने मांडल्या. डॉ. जाधव यांनी त्यांच्या अडचणी समजून घेत समुपदेशनात्मक मार्गदर्शन केले आणि योग्य उपाय सुचविले. मानसिक आरोग्याबाबतचे गैरसमज दूर करून गरजेनुसार तज्ज्ञांची मदत घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय सोळंके होते. क्षेत्रीय समन्वयक उषा राखुंडे व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पुरुषोत्तम उदार उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. नरेश महाजन यांनी, सूत्रसंचालन लक्ष्मी मेश्राम यांनी, तर आभार अनुष्का मेश्राम यांनी मानले. प्रा. डॉ. अमर वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा..!

## श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ९ :** दि.५ ऑक्टोबर २०२६ वनविभाग पुसद व एमएच-२९ हेल्पिंग हँड्स वाइल्ड ॲडव्हेंचर अँड नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त येलदरी बीट येथे श्रमदानातून वनराई बंधारा तयार करण्यात आला. वन्यप्राण्यांना पाण्याची उपलब्धता व्हावी, हा यामागील उद्देश होता.

तसेच जिल्हा परिषद मराठी शाळा, येलदरी व राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आडगाव येथे वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेबाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे खंडाळा वर्तुळाचे वनपाल मार्कड (R.O.) यांनी मार्गदर्शन केले. वन्यजीवरक्षक दिनेश पिंपरे यांनी विद्यार्थ्यांना विषारी व बिनविषारी सापांची ओळख, सर्पदंश प्रतिबंध व साप आढळल्यास घ्यावयाची काळजी याबाबत माहिती दिली. यावेळी वनरक्षक प्रकाश भोसले, वनरक्षक मुस्तफा पठाण, वनरक्षक पांडे मॅडम, वनरक्षक कोते मॅडम तसेच हरितसेना प्रमुख गजानन वाळके सर यांनीही विद्यार्थ्यांना वन्यजीव व पर्यावरण संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी एमएच-२९ हेल्पिंग हँड्स वाइल्ड ॲडव्हेंचर अँड नेचर क्लबचे वन्यजीवरक्षक दिनेश पिंपरे, गौतम खडसे, आनंद खडसे,आनंद सागर, निखिल गायकवाड, सविधान मुळे, पवन भिसे, गुड्डू राऊत आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले. व कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# संशोधन संस्कृतीला बळ देणारा 'संशोधन पद्धती' ग्रंथ लोकार्पित!

## कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते डॉ.सुनील खाडे व डॉ.प्रियंका गायकवाड यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ९ :** संशोधनाची दिशा स्पष्ट करणारे आणि विद्यार्थ्यांना शास्त्रीय दृष्टिकोन देणारे साहित्य उच्च शिक्षणासाठी महत्त्वाचे ठरते. याच भूमिकेतून फुलसिंग नाईक महाविद्यालयातील डॉ. सुनील एन. खाडे आणि डॉ. प्रियंका गायकवाड यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या 'संशोधन पद्धती' या ग्रंथाचे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते ७ ऑक्टोबर रोजी लोकार्पण करण्यात आले.

जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित फुलसिंग नाईक महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला प्रा. डॉ. मोना चिमोटे आणि विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. संतोष बन्सोड यांची प्रमुख उपस्थिती होती. संशोधन प्रक्रियेतील विविध पैलूंचे सुलभ व सखोल आकलन करून देणारा हा ग्रंथ विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापकांसाठी उपयुक्त मार्गदर्शक ठरणार आहे. संशोधन संस्कृती अधिक सक्षम करण्यासाठी अशा अभ्यासपूर्ण ग्रंथलेखनाची गरज असल्याचे कुलगुरू डॉ. बारहाते यांनी नमूद केले. त्यांनी लेखकद्वयीच्या शैक्षणिक व संशोधनात्मक योगदानाचे कौतुक करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जय नाईक, सचिव ॲड. मोहिनी इंद्रनील नाईक, महाविद्यालयाचे प्राचार्य, आयक्यूएसी समन्वयक डॉ. वसंत एन. कांबळे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी लेखकांचे अभिनंदन केले. या ग्रंथामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधनपर परंपरेत मोलाची भर पडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पीककर्जासाठी विमा पॉलिसीची सक्ती नको

## जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर तक्रारींच्या चौकशीची मागणी

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत पीककर्जासाठी बँकांकडून एलआयसी अथवा अन्य विमा पॉलिसी घेण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत. शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारची विमा पॉलिसी लादणे खपवून घेतले जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेत अरबट यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून संबंधित प्रकाराची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे.



राष्ट्रीयकृत बँकांमध्ये पीककर्जासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांना एलआयसी अथवा अन्य विमा पॉलिसी घेतल्याशिवाय कर्ज मिळणार नाही, अशा स्वरूपाचा दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे अरबट यांनी निवेदनात नमूद केले आहे. शेतकरी आधीच आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना त्याच्यावर अतिरिक्त आर्थिक भार टाकणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अंजनगाव सुर्जी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत पीककर्जासाठी गेलेल्या शेतकऱ्याला विमा पॉलिसी घेण्याबाबत दबाव आणल्याची तक्रारही समोर आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका तपासावी आणि दोष आढळल्यास योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.पीककर्जाच्या नावाखाली विमा पॉलिसीची सक्ती केली जात असेल तर त्याची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी अरबट यांनी केली आहे.पीककर्ज हे शेतकऱ्यांच्या शेतीच्या हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्यामुळे कर्जप्रक्रियेत अनावश्यक अटी लादून शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी करू नये. अमरावती जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांना पीककर्ज देताना एलआयसी अथवा कोणत्याही अन्य विमा पॉलिसीची सक्ती करू नये, याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी गोपाल पाटील अरबट यांनी केली आहे.तसेच पीककर्जासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना विनाअडथळा व सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध करून द्यावे, कर्जप्रक्रियेत अनावश्यक अटी लादणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

'शेतकरी संकटात असताना त्याच्या अडचणीचा गैरफायदा घेऊन कोणतीही सक्ती केली जाऊ नये. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी. अन्यथा शेतकरी हितासाठी शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल,' असा इशारा गोपाल पाटील अरबट यांनी दिला.

# मोर्शीत दोन अवैध बोअर करणाऱ्या वाहनावर कारवाई

**अमरावती/ का.प्र.**

यावर्षी पाऊस कमी पडल्यामुळे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यात नवीन विहीर व बोअर खणण्यावर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे.

मात्र काही ठिकाणी अवैध बोअरवेल खणण्याचे काम सुरू असल्याच्या माहितीवरून मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार यांनी दोन वाहनांवर जप्तीची कारवाई केली.

गुरूवार, ८ ऑक्टोबर रोजी मोर्शी तालुक्यातील पाळा येथील पकडे यांच्या शेतात अवैधपणे बोअरवेल खणण्याचे काम सुरू असताना महसूल पथकाने कारवाई केली.

या कारवाईदरम्यान कल्याणसिंग राजपूत, रा. उदयपूर, राजस्थान यांचे क्र. जीजे ०३ सीएल ८१०० आणि रोहन सेजवर, रा. राजकोट, गुजरात यांच्या मालकीचे जीजे ०३ सीएल ८१०९ दोन्ही बोअरवेल मशीन वाहने जप्त करण्यात आली. जिल्ह्यातील ही पहिलीच धडक कारवाई आहे.



जप्त करण्यात आलेली दोन्ही वाहने पंचनामा व जप्तीनामा करून मोर्शी पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आली आहेत.

ही कारवाई उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार गजानन दाते, सहायक महसूल अधिकारी सुधिर शिरभाते, वाहन चालक प्रविण देवतळे, महसूल सेवक दुर्गेश चारे, तसेच पाळा साझाचे ग्राम महसूल अधिकारी रोशन जैस्वाल, ग्राम महसूल अधिकारी जयंत मालपे, रोशन पकडे व गोपाल राठोड यांनी पार पाडली.

# अमरावतीच्या वैभवीची पाण्यातून विजयी भरारी

## पुण्यातील जलतरण स्पर्धेतून राज्यात पहिला क्रमांक

**अमरावती/ का.प्र.**

डेक्कन क्रीडा मंडळ आणि बर्गमन यांच्या वतीने पुण्यातील ओझर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत अमरावतीच्या वैभवी अमोल नानोटकर हिने अप्रतिम कामगिरी केली. तिने धरणातील खुल्या पाण्यात १ किलोमीटरचे अवघड अंतर अवघ्या २८ मिनिटे ३ सेकंदात पूर्ण करून राज्यभरात पहिला क्रमांक मिळवला आणि जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

पुण्याजवळच्या ओझर परिसरातील खुल्या धरणाच्या खोल पाण्यात ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी ही मोठी साहसी जलतरण स्पर्धा पार पडली. या राज्यस्तरीय स्पर्धेत १ किलोमीटर २ किलोमीटर आणि ४ किलोमीटर अशा वेगवेगळ्या गटांमध्ये सामने रंगले होते. संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या सुमारे ५०० पट्टीच्या जलतरणपटूंनी यात भाग घेतला होता. जंगलातील धरण किंवा मोठ्या नदीच्या वाहत्या पाण्यात पोहणे हे अत्यंत



आव्हानात्मक मानले जाते. अशा कठीण लाटांचा सामना करत अमरावतीची कन्या वैभवी हिने सुरुवातीपासूनच वेगवान मुसंडी मारली. तिने जिद्दीच्या जोरावर सर्व स्पर्धकांना मागे टाकत अवघ्या २८ मिनिटे ३ सेकंदात १ किलोमीटर अंतर पार केले आणि सुवर्णयश मिळवले.विदर्भ वृत्त ३६५ वाहिनीचे व्यवस्थापकीय संपादक अमोल नानोटकर यांची कन्या असलेल्या वैभवीने आपल्या सातत्यपूर्ण कष्टाने हे यश खेचून आणले आहे. ती रोज अमरावती येथील प्रिया उद्यान परिसरातील रंगोली क्रीडा मंडळात कसून सराव करते. तिने मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून तिचे मोठे कौतुक होत आहे. वैभवीने आपल्या या यशाचे सर्व श्रेय आई वडील आणि मार्गदर्शक गुरुजनांना दिले आहे.

# कौंडण्यपूर येथे उद्यापासून शारदीय नवरात्र महोत्सव

## अखंड दीपज्योत प्रज्वलीत होणार

**कुऱ्हा/ वार्ताहर**

विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील ऐतिहासिक श्री रुक्मिणी हरण मंदिर परिसरातील श्री अंबिका देवी देवस्थानात दरवर्षीप्रमाणे यंदाही आश्विन शारदीय देवी नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार,११ ऑक्टोबर ते मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हा महोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. यानिमित्त श्री मनोकामना सिद्धीसाठी अखंड दीपज्योत महोत्सव, दुर्गासप्तशती पाठ, देवीची महापूजा, नवचंडी हवन, भजन-कीर्तन आणि अन्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाची सुरुवात रविवार ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत श्रींच्या पूजा-अभिषेकाने होईल. या पूजेचे यजमान म्हणून कौंडण्यपूर येथील विश्वस्त मंडळ तसेच आर्वी येथील श्री व सौ. गिरधरजी अग्रवाल सहभागी होणार आहेत. त्यानंतर सकाळी ९.३० ते १० या वेळेत विश्वस्त मंडळाच्या हस्ते घटस्थापना करण्यात येणार



आहे. त्याच दिवशी सकाळी १०.३० वाजता अखंड दीपज्योत प्रज्वलित करून दीपज्योत महोत्सवाला प्रारंभ होईल. ही ज्योत मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता विसर्जित करण्यात येणार आहे.

नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत पाद्यपूजा व महापूजा, सकाळी ७ ते ८ देवी सहस्त्रनाम, सकाळी ८.३० वाजता महापूजा व आरती, तर सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत दुर्गासप्तशती पाठ होणार आहे. दुपारी १२ ते १२.३० या वेळेत धूपारती व नैवेद्य, सायंकाळी ७ ते ७.३० आरती, रात्री ८ ते ९ विष्णुसहस्त्रनाम व हरिपाठ आणि रात्री ९ वाजल्यानंतर दैनिक भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

महोत्सवादरम्यान विविध भजनी मंडळे आपली सेवा अर्पण करणार आहेत. यामध्ये हनुमान भजनी मंडळ, कौंडण्यपूर; श्री लहानुजी महाराज भजन मंडळ, देऊरवाडा; श्री अंबिका देवी भजन मंडळ, आर्वी; श्री महिला भजन मंडळ, कौंडण्यपूर; श्री गुरुदेव भजनी मंडळ, अहिरवाडा; श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ, सर्कसपूर आणि जीवन विकास भजन मंडळ, मिर्चापूर (तरोडा) यांचा समावेश आहे. रविवार १८ रोजी सकाळी ६.३० ते ८ या वेळेत दैनिक यजमानांच्या हस्ते महापूजा, तसेच कौंडण्यपूर-देऊरवाडा वारकरी भजनी मंडळाच्या वतीने काल्याच्या भजनाचे आयोजन करण्यात आले आहे.सोमवार,१९ रोजी सकाळी ७.३० वाजता महाअष्टमी पूजापाठ व नवचंडी हवन होणार आहे. मंगळवार,२० रोजी सकाळी ५ वाजता पूर्णाहुती आणि सकाळी ११ वाजता नवमी घटविसर्जन करण्यात येईल. बुधवार, २१ रोजी दुपारी १२ वाजल्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## आचारसंहितेमुळे लोकशाही दिन रद्द

**अमरावती-** शासन निर्णयानूसार दर महिन्याला दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन आणि महिला विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन विभाग स्तरावर करण्यात येते. मात्र भारत निवडणूक आयोगाने सध्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता जाहीर केली आहे. तसेच २६ सप्टेंबर २०१२ च्या शासन परिपत्रकामधील मुद्दा क्र. ५.७ नुसार ज्या-ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीकरिता आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे, अशा ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये याबाबत तरतूद आहे.

त्यामुळे विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन माहे ऑक्टोबर महिन्यात करता येणार नाही, तरी सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (सा.प्र.) संजय जाधव यांनी केले आहे.

# विशाल तराळ यांचा नाट्यप्रवास आकाशवाणीवर

**अमरावती-** 'नाट्यकला, प्रकार आणि वाटचाल' या विषयावर प्रख्यात नाट्यलेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता विशाल रमेश तराळ यांची मुलाखत सोमवार (दि.१२ ऑक्टोबर) आणि मंगळवार (दि. १३ ऑक्टोबर) रोजी सकाळी १० वाजता आकाशवाणीच्या अमरावती केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे. लोकप्रिय निवेदक नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे.'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमात ही मुलाखत प्रसारित केली जाईल. शाळा ते व्यावसायिक रंगभूमीपर्यंतचा प्रवास, नाट्यलेखनाची प्रक्रिया, एकाचवेळी अभिनेता, लेखक आणि दिग्दर्शक या तिहेरी भूमिका करतानाचा अनुभव, मराठी नाटकाचा सुवर्णकाळ आणि आणि आजच्या ओटीटी प्लॅटफॉर्मच्या काळातली रंगभूमी यातला भेद, बदलत्या कालानुरूप नाटकाचे कथानक आणि विषय यामध्ये झालेले बदल, अभिनेता किंवा लेखक म्हणून एखाद्या पात्रात शिरण्यासाठी करावी लागणारी तयारी, दिग्दर्शक म्हणून नवीन कलाकाराकडून हवा असलेला अभिनय काढून घेण्याची प्रक्रिया, झाडीपट्टी रंगभूमीची परंपरा आणि प्रवास, होतकरू कलाकारांच्या दृष्टीने एकांकिका स्पर्धा, हौशी रंगभूमी आणि व्यावसायिक रंगभूमीचे महत्व, नाटकाचे बजेट, प्रायोजक मिळवणे, रिकामे सभागृह अशी आव्हाने, सेन्सॉरशिप, राजकीय दबाव आणि सोशल मीडियावरील ट्रोलिंग याचा कलाकारांवर होणारा परिणाम, वाढत्या सोशल मीडियामुळे 'थिएटर इज डेड' अशी अवस्था भविष्यात येणार का? कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नाट्यक्षेत्रात घडू घातलेले बदल आदी विषयांवर या मुलाखतीत विशाल तराळ भाष्य करतील.



# रोहित्र बंद पडले?फोटो काढा अन् महावितरणला कळवा!

## महावितरणने जिल्हानिहाय सुरू केली विशेष व्हॉट्सअॅप सेवा

**अमरावती/ का.प्र.**

दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकरी आणि सर्वसामान्य ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणच्या अमरावती परिमंडळाने नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्रांची (ट्रान्सफॉर्मर) त्वरित माहिती देण्यासाठी विशेष व्हॉट्सअॅप सुविधा सुरू केली आहे. यामुळे रोहित्र दुरुस्ती आणि ते बदलण्याची प्रक्रिया जलद होऊन ग्राहकांना वेळेत वीजपुरवठा उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी व्यक्त केला आहे.




महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या निर्देशानुसार याअगोदरच मोबाईल अॅपव्दारे नादुरूस्त रोहित्राची माहिती देण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. अॅप सुविधा मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध असून अॅपमध्ये ग्राहक आपल्या ग्राहक क्रमांकाद्वारे लॉगिन करून किंवा 'गेस्ट' म्हणूनही 'नादुरुस्त रोहित्राची माहिती नोंदवा' या पर्यायाद्वारे फोटो अपलोड करून एका क्लिकव्दारे तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासोबतच अमरावती परिमंडळात व्हॉट्स अॅपची विशेष सेवा सुरू करण्यात आली असून अमरावती जिल्ह्यासाठी ७८७५३ ९०२२३ आणि यवतमाळ जिल्ह्यासाठी ७८७५३ ००३४० हे दोन स्वतंत्र व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वीजग्राहकांनी नादुरुस्त रोहित्राचा फोटो काढून तो संबंधित जिल्ह्याच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवायचा आहे. महावितरणला अचूक लोकेशन ट्रॅक करता यावे, यासाठी फोटोसोबत रोहित्राचे नाव, ठिकाण आणि सविस्तर पत्ता देणे आवश्यक आहे. व्हॉट्सअॅपवर माहिती मिळताच ती तातडीने संबंधित विभागाकडे वर्ग करून रोहित्र दुरुस्ती किंवा ते बदलण्याच्या कामाला गती दिली जाणार आहे.

सध्या परिमंडळाअंतर्गत अधीक्षक अभियंता दीपक देवहाते (अमरावती) आणि रूपेश टेंभुर्णे (यवतमाळ) यांच्यामार्फत दररोज रोहित्रांची स्थिती व वीजपुरवठ्याचा आढावा घेतला जात असून, तांत्रिक कारणांमुळे खंडित झालेला पुरवठा पूर्ववत करण्याची कार्यवाही सुरू आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला १ हजार याप्रमाणे अतिरिक्त रोहित्र उपलब्ध करून देण्यात आले

## बुधवारी सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी व्याख्यान

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने व सुश्री केशरताई मेश्राम यांचेकडून प्राप्त दाननिधीमधून तपस्वी तुळशीरामजी मेश्राम स्मृतीप्रित्यर्थ 'लीळाचरित्रातील अर्थकारण आणि धर्मकारण' या विषयावर व्याख्यानाचे बुधवार १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा, जि. बुलढाणा येथे आयोजन करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून, मराठी भाषा विद्यापीठ, रिध्दपूर येथील अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे हा 'लीळाचरित्रातील अर्थकारण आणि धर्मकारण' या विषयावर प्रबोधन करणार आहेत.

या प्रसंगी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. गजानन पुंडकर, विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य अॅड. शालीग्रामजी कळसकर, अॅड. ओमप्रकाशजी देशमुख यांची उपस्थिती राहणार आहे.

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षक समिती आक्रमक

## मेळघाटातून सपाटीवर बदली झालेल्यांना कार्यमुक्त करा

## नवनियुक्त शिक्षण सेवकांचे थकीत मानधन तातडीने द्या

**अमरावती/ का.प्र.**

जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत शिक्षक व नवनियुक्त शिक्षण सेवकांच्या प्रलंबित प्रश्नांवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. मेळघाटातून सपाटीवर बदली झालेल्या शिक्षकांना तातडीने कार्यमुक्त करावे तसेच नवनियुक्त शिक्षण सेवकांची पदनिर्मिती करून सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांचे थकीत मानधन अदा करावे, अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली.



सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रियेत मेळघाटातून सपाटीच्या भागात बदली झालेल्या शिक्षकांना अद्याप कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. परिणामी संबंधित शिक्षकांना बदलीच्या ठिकाणी रुजू होता येत नसून प्रशासकीय व कौटुंबिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे त्यांना तातडीने कार्यमुक्त करून बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.तसेच पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सप्टेंबर २०२६ मध्ये जिल्हा परिषद अमरावतीअंतर्गत इयत्ता १ ते ५ व ६ ते ८ साठी नवनियुक्त शिक्षण सेवकांना नियुक्ती देण्यात आली आहे. मात्र, त्यांच्या पदांची जिल्हास्तरावर अद्याप निर्मिती न झाल्याने मानधनाची प्रक्रिया रखडली आहे. त्यामुळे सर्व नवनियुक्त शिक्षण सेवकांची पदनिर्मिती करून सप्टेंबर व ऑक्टोबर २०२६ या दोन्ही महिन्यांचे थकीत मानधन तातडीने अदा करावे, अशी मागणी समितीने केली.

यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन देण्यात आले. शिक्षक व शिक्षण सेवकांच्या प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली.

यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार व जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र स. दहातोंडे उपस्थित होते.अशी माहीती शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात जागतिक अहिंसा दिवस उत्साहात



**अमरावती/ का.प्र.**

अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच जागतिक अहिंसा दिनाचे औचित्य साधून राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अतुल वानखडे, ग्रंथालय विभाग प्रमुख, तर उद्घाटक व प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. संगीता भांगडिया मालाणी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख,नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा,डॉ. गजानन काळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी हे व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. डॉ. संगीता भांगडिया यांनी राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन केल्याची घोषणा करून विद्यार्थ्यांना गांधी विचारांची प्रासंगिकता या विषयावर मार्गदर्शन केले. पूर्वी कधीही नव्हती त्यापेक्षा जास्त आवश्यकता आज आधुनिक काळात गांधी विचारांची तरुण पिढीला आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.आधुनिक काळात युवकांनी नीतिमत्तेचे पालन करावे, सोशल मीडियाचा वापर संयमाने करावा, आलेली पोस्ट भराभर फॉरवर्ड न करता दोन मिनिटे थांबून, विचार करून आणि आपल्या अंतरात्म्याला प्रश्न विचारून फॉरवर्ड करावी असा मोलाचा संदेश त्यांनी याप्रसंगी दिला.

अध्यक्षीय मनोगतातून प्रा. डॉ. अतुल वानखडे यांनी प्रा. डॉ. भांगडीया यांनी उपस्थित राहून अतिशय मोलाचे विचार मांडल्या बद्दल विशेष आभार मानले.याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यात वैष्णवी शेळके आदित्य नागदिवे,पूनम सहारे,पलक निषाद,सानिका गदर,प्रथमेश मसराम,सार्थक राऊत,विक्रम खरबडे,प्रज्वल दोदलकर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे संचालन प्रा.गजानन काळे, राज्यशास्त्र विभाग यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ.बबीता येवले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. गजानन काळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने राष्ट्रीय स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# To be or not to be... हाच प्रश्न उरला!

## नाना, तुमच्या जाण्याने एका युगाचा पडदा खाली आला

**ना**ना पाटेकर यांची अचानक झालेली एक्झिट ही केवळ एका अभिनेत्याची एक्झिट नाही; ती रंगभूमीच्या एका महत्त्वाच्या अंकाचा पडदा खाली येण्यासारखी आहे.रंगमंचावर प्रकाश पडतो, कलाकार प्रवेश करतो, संवाद सुरू होतात आणि क्षणभर आपण त्याचे जगणे जगू लागतो. नाना आले की, असेच काहीसे व्हायचे. ते पात्र साकारत नसत, ते पात्र जगत असत. म्हणूनच आज त्यांच्या जाण्याची बातमी मनाला धक्का देऊन जाते.

नाना म्हणजे अभिनयाची एक स्वतंत्र शाळाच. आवाजात धार, नजरेत आग, चेहऱ्यावर असंख्य भाव आणि संवादात काळजाला भिडणारी ताकद. 'अंकुश', 'प्रहार', 'क्रांतिवीर', 'तिरंगा', 'परिंदा' अशा असंख्य चित्रपटांतून त्यांनी समाजातील अस्वस्थता, अन्याय, राग, वेदना आणि माणुसकी पडद्यावर आणली. मराठी रंगभूमीवरही त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी उंची निर्माण केली. आणि मग आला 'नटसम्राट'गणपतराव बेलवलकरांच्या रूपाने नानांनी दाखवून दिले की, नट जेव्हा भूमिका करत नाही, तर ती जगतो, तेव्हा रंगमंच आणि वास्तव यांच्यातली सीमारेषाच पुसली जाते.

आजच्या झगमगाटाच्या,



दिखाव्याच्या आणि टपरवेअर हृदय घेऊन वावरणाऱ्या काळात बाहेरून चकचकीत, पण आत भावना जपून ठेवणारी माणसे कमी होत असताना नाना मात्र अस्सल राहिले. त्यांच्या अभिनयात कृत्रिम भावुकता नव्हती; तिथे रक्त होते,घाम होता, वेदना होती, राग होता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणूस होता. म्हणूनच त्यांचा संवाद कानावर पडत नव्हता, तो थेट काळजावर आदळत होता.

नानांना स्वतःच्या क्षमतेवर विलक्षण विश्वास होता. समोर अमिताभ बच्चन असोत, राजकुमार असोत किंवा कोणताही दिग्गज कलाकार अथवा दिग्दर्शकनाना कधीही कुणाच्या सावलीत उभे राहिले नाहीत. प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या सलमान खान, शाहरुख खान किंवा आमिर खान यांच्या वागण्यात त्यांना काही चुकीचे वाटले,तर तेही त्यांनी स्पष्टपणे सुनावले. स्टारडमसमोर न झुकता आपल्या मनातले बोलण्याचे धाडस नानांकडे होते. कारण त्यांच्यासाठी माणूस मोठा नव्हता, तर माणुसकी मोठी होती; प्रसिद्धी मोठी नव्हती, तर तत्त्व मोठे होते.

पडद्यावरचा नाना जितका मोठा होता, तितकाच पडद्याबाहेरचा नाना माणूस म्हणून मोठा होता. शेतकऱ्यांच्या वेदनेशी त्यांनी नाते जोडले. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागात आणि शेतकऱ्यांसाठी त्यांनी केलेले काम ही त्यांच्या सामाजिक जाणिवेची वेगळी ओळख ठरली. शेतात राबणे, व्यायाम करणे, साधेपणाने जगणे आणि मातीशी नाते जपणे..हे नाना नावाच्या माणसाचे दुसरे रूप होते.

'प्रहार'मधून त्यांनी दिग्दर्शक म्हणूनही आपली स्वतंत्र मुद्रा उमटवली. माधुरी दीक्षितसारख्या लोकप्रिय अभिनेत्रीला ग्लॅमरच्या चौकटीबाहेर नेऊन व्यक्तिरेखेच्या गरजेनुसार सादर करणारा दिग्दर्शक म्हणून नानांनी वेगळा ठसा उमटवला. त्यांच्यासाठी कलाकाराचा चेहरा नव्हे, तर पात्राचा आत्मा महत्त्वाचा होता.

नाना म्हणजे सदाबहार, हरहुन्नरी आणि हाडाचा कलावंत. त्यांनी रंगभूमी जगली, चित्रपट जगले आणि त्याहीपलीकडे माणूसपण जगले. त्यांची एक्झिट म्हणजे एका कलाकाराचा शेवट नाही; तो एका अस्सल आवाजाचा विराम आहे.

आज रंगमंचावर प्रकाश आहे...पण नाना नाहीत.

पडदा आहे.. पण नटसम्राट नाही.

संवाद आहेत.. पण तो आवाज नाही.

'To be or not to be...' हाच प्रश्न आज उरला आहे.

नाना, तुमचा शेवटचा प्रयोग संपला असेल.पडदा खाली आला असेल. पण प्रेक्षकांच्या काळजात तुमच्यासाठी राखून ठेवलेली जागा कधीच रिकामी होणार नाही.तुम्ही रंगमंच सोडला नाही..तुम्ही रंगमंचाचा एक भाग होऊन कायमचे राहिलात.भावपूर्ण श्रद्धांजली, नाना!

**धनंजय**

# नाती पैशांनी श्रीमंत होत नाहीत..!

**ए**का मित्राने दुसऱ्या मित्राला कोरा चेक दिला...'खात्यात १५ हजार रुपये आहेत तुला जितके पाहिजेत तितके काढून घे!' हा प्रसंग एखाद्या सिनेमातला नाही..ही गोष्ट आहे नाना पाटेकर आणि अशोक सराफ यांच्या मैत्रीची! आज नाना पाटेकर आणि अशोक सराफ हे दोघेही अभिनयाच्या क्षेत्रात दिग्गज म्हणून ओळखले जातात.पण एक काळ असा होता, जेव्हा नाना पाटेकर संघर्ष करत होते.



पैशांची चणचण होतीष्ठ काम होते, पण हातात पैसा टिकत नव्हता.. आणि अशाच काळात त्यांच्या आयुष्यात एक मित्र देवदूतासारखा उभा राहिला.. अशोक सराफ!

'हमीदाबाईची कोठी' या नाटकाच्या काळात दोघांची मैत्री घट्ट झाली. त्या वेळी नानांना प्रयोगाचे ५० रुपये, तर अशोक सराफांना २५० रुपये मिळायचे. नाटकाचे प्रयोग नसताना दोघे पत्ते खेळायचे. पण या खेळात एक वेगळाच खेळ चालायचा..अशोक सराफ मुद्दाम हरायचे! पाच-दहा रुपये नानांच्या हातात जायचे. नानांना हे कळायचे की अशोक मुद्दाम हरतोय. पण नानांना पैशांची गरज होती.. म्हणून तेही ते पैसे घ्यायचे. कारण काही माणस मदत करताना समोरच्याचा स्वाभिमान जपत असतात. अशोक सराफही तसेच करत होते. पण एक दिवस अशी परिस्थिती आली की नानांना खरोखर पैशांची गरज पडली. गणपतीचे दिवस होते. घरात फुलांचा खर्च होता.

पण नानांच्या खिशात पैसे नव्हते. सकाळची वेळ..अशोक सराफ फिल्मसिटीला शूटिंगसाठी निघाले होते. जाताना ते नानांच्या माटुंग्यातल्या घरी आले. दारावर टकटक केली.नानांनी दार उघडले. अशोक सराफांनी हातात एक कोरा चेक ठेवला. आणि म्हणाले..'माझ्या खात्यात १५ हजार रुपये आहेत. तुला पाहिजे तेवढे काढून घे.'

ना कसलं स्पष्टीकरण.. ना कसलं कर्जाचं बोलणं.. ना सहीची हमी.. ना परत कधी देणार याचा सवाल! फक्त मित्रावर विश्वास! नानांनी त्या चेकमधून ३ हजार रुपये काढले. आणि विशेष म्हणजे.. अशोक सराफांनी नंतर कधीही त्या पैशांचा हिशोब मागितला नाही. काही दिवस नाही.. काही महिने नाही.. कित्येक वर्षं! काळ पुढे सरकत गेला. नाना पाटेकर मोठे होत गेले. काम मिळत गेले. आर्थिक परिस्थिती सुधारली.

आणि एक दिवस नाना पाटेकरांनी अशोक सराफांचे ते ३ हजार रुपये त्यांच्या हातावर परत ठेवले. अशोक सराफांनी पैसे हातात घेतले.. आणि नानांकडे पाहून मिश्कीलपणे म्हणाले— 'काय पाटेकर.. पैशेवाले झाले तुम्ही?' नानांनी दिलेले उत्तर मात्र आजही या मैत्रीची खरी श्रीमंती सांगून जाते 'पैसेच परत करतोय.. वेळ नाही परत करू शकत!'

काय भन्नाट वाक्य आहे ना? पैसे परत करता येतात.. पण गरजेच्या वेळी एखाद्याने दिलेला आधार, विश्वास आणि साथ त्याची परतफेड करता येत नाही. आणखी एक छोटासा किस्सा नाना पाटेकरांनी सांगितला होता. नाटकाच्या दौऱ्यावर असताना नाना अशोक सराफांचे पाय चेपायचे, डोक्याला तेल लावून द्यायचे. त्याबदल्यात अशोक सराफ त्यांना ५ रुपये द्यायचे. नानांच्या आयुष्यात त्या पाच रुपयांचीही किंमत होती.

म्हणूनच आज परिस्थिती बदलली, प्रसिद्धी आली, पैसा आलाष्ठ तरी नाना त्या जुन्या दिवसांना विसरले नाहीत.नाना म्हणतात की आजही अशोक सराफ भेटले की ते त्यांचे पाय चेपतात. आणि अशोक मामा त्यांना म्हणतात..

'ए नाना गाढवा, असे करू नकोस!' खरं तर ही गोष्ट ३ हजार रुपयांची नाही. ही गोष्ट आहे.. मैत्रीची विश्वासाची स्वाभिमानाची.. आणि गरजेच्या वेळी न बोलावता मदतीला धावून जाण्याची! आजच्या काळात हजारो रुपयांची मदत करून त्याचा फोटो काढणारे अनेकजण भेटतील..

पण स्वतःच्या खात्यातील १५ हजार रुपयांचा कोरा चेक मित्राच्या हातात देऊन 'तुला पाहिजे तेवढे काढून घे' म्हणणारा मित्र मिळणे हीच खरी श्रीमंती! आणि म्हणूनच नाना पाटेकर आणि अशोक सराफ यांची मैत्री आजही इतकी खास वाटते. कारण काही नाती पैशांनी श्रीमंत होत नाहीत..ती माणुसकीने श्रीमंत होतात! नाना आणि अशोक मामा पडद्यावरचे दिग्गज, पण आयुष्यात एकमेकांचे खरे मित्र!



# शेतकऱ्यांचे कैवारी बाबूजी उर्फ अरविंद नळकांडे

**अ**रविंद नळकांडे यांचे आज पुणे येथे निधन झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली.त्यांची उद्या १० ऑक्टोबर सकाळी अंत्ययात्रा निघेल. ते एक अतिशय मनमिळावू व उत्तम संघटक होते.त्यांनी तरुणपणापासूनचा तर अखेरच्या मरणापर्यंत शेतकऱ्यांसाठी कार्य केले.शरद जोशींच्या नेतृत्वात ज्या काळात काँग्रेसचे जबरदस्त वर्चस्व होत.त्या काळात प्रचारासाठी माणस मिळणे सुद्धा कठीण होते. तेव्हा त्यांनी घरावर तुळशीपत्र ठेवून, गोर गरिबांचे घरी जाऊन शेतकऱ्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी इतिहास घडविला. विदर्भात शेतकरी समाज जागृत करण्यासाठी ज्यांनी जीवाचे रान केले, संपूर्ण विदर्भ पिंजून काढून सन १९८२ ते २००० या काळापर्यंत शेतकरी आंदोलनाची धुरा सांभाळणे व सर्व शेतकरी वर्ग जागृत करून आज सुखासमान जगत आहे. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. त्याचे सर्व श्रेय बाबूजी उर्फ अरविंदराव नळकांडे आणि श्रीकांत भाऊ तराळ या जोडीला जाते.



श्रद्धांजली

आज शेतकऱ्यांना कर्जमुक्ती किंवा राजकारणात ज्या सक्रिय महिला आल्यात ते चांदवडचे महिला अधिवेशनामुळे महिला आरक्षण जाहीर झाले, ते सुद्धा त्यांच्याच कर्तृत्वात पार पडले.शेतकऱ्यांना कर्जमाफी व इतरही शेतीवरील अनुदान,पैसा येतो व काही फायदे मिळतात सरकार जागृत होऊन शेतकऱ्यांना आधार देत आहे ती सर्व पुण्याई शेतकरी आंदोलनाची आहे. इतरही फायदे होत असेल तर ते त्यांच्या नेतृत्वाची जागृतीमुळे झाली.यात तीळमात्र शंका नाही. वडूरा (तालुका चांदूरबाजार ,जि.अमरावती) इसवी सन २५ नोव्हेंबर १९९० साली या गावात लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने शेतकरी नेते श्रीमान बाबूजी आणि स्वर्गीय शरद जोशी यांचा भरगच्च कार्यक्रम झाला होता. तेव्हा त्या विचाराची छाप आमच्या गावकऱ्यावर झाली. आम्ही त्यांच्या नेतृत्वात अनेक वर्ष काम करून शेतकरी हितासाठी रात्रदिवस झटलो हीच खरी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.त्यांनी नंतर भाजपाची सूत्रे हाती घेऊन राजकीय कारकीर्द सुरू केली होती.आणि संपूर्ण जीवन शेतकऱ्यांसाठी समर्पित केले.त्यांच्या आठवणीत संपूर्ण अमरावती जिल्हाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राला कार्याची प्रेरणा देईल, हीच खरी श्रद्धांजली.

**धनंजय पाटील काकडे,**
मो.९८९०३६८०५८

# शेतकऱ्यांचा कैवारी नाना



**म**राठी मातीतला रांगडा, रोखठोक आणि दिलदार अभिनेता म्हणजे नाना पाटेकर. आपल्या दमदार अभिनयाने, प्रभावी संवादफेकीने आणि प्रत्येक भूमिकेत जीव ओतून अभिनय करण्याच्या विलक्षण क्षमतेने त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले. वयाच्या ७५व्या वर्षी त्यांच्या निधनाने भारतीय सिनेसृष्टीने एक असामान्य कलावंत, तर समाजाने एक संवेदनशील आणि माणुसकी जपणारा माणूस गमावला आहे. नानांचा अभिनय हा केवळ मनोरंजन नसे, त्यांनी आपल्या भूमिकांमधून समाजातील वास्तव, अन्याय, दुःख, वेदना आणि सामान्य माणसाची घुसमट यांचे जणू वास्तव प्रभावीपणे व्यक्त होत असे. 'नटसम्राट', 'क्रांतिवीर', 'परिंदा' यांसारख्या अनेक नाटकं, चित्रपटांतील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात ठसठशीत आहेत. त्यांचा आवाज, त्यांची देहबोली, डोळ्यांतील भाव, मुद्राभिनय आणि संवादफेकीची वैशिष्ट्यपूर्ण शैली यामुळे त्यांनी साकारलेली पात्रे केवळ पडद्यावरची राहिली नाहीत, ती लोकांच्या मनाचा एक भाग बनली. प्रसिद्धी आणि झगमगाटापासून दूर राहून त्यांनी सामान्य माणसाच्या प्रश्नांशी, त्यांच्या वेदनेशी आपले नाते जपले. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकरी, दुष्काळग्रस्त आणि ग्रामीण भागासाठी केलेले कार्य त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वश्रुत उदाहरण आहे. शेतकऱ्यांच्या वेदनेला केवळ शब्दांची पाखर न घालता प्रत्यक्ष मदतीचा हात देणारा हा कलाकार म्हणून त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील.

नाना पाटेकर गेले, पण नानांचा आवाज, त्यांचा अभिनय, त्यांचे रोखठोक विचार आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांचे माणूसपण कधीही मरणार नाही. पडद्यावर त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा आणि समाजासाठी त्यांनी केलेले कार्य पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहील.आज एक बुलंद आवाज शांत झाला आहेष्ठ पण त्यांची कला आणि माणुसकीची ज्योत कायम तेवत राहील.

**विश्वनाथ पंडित**

## त-ड-का



### नाही कसं म्हणता..?

तुम्ही गरबा जरूर खेळा
त्याबद्दल आक्षेप नाही काही
पण स्वसंरक्षणार्थ कराटे ही
शिकायला हवे की नाही..?

दांडीया शिकायला पालक
कौतुकाने लावती क्लास
पण तेवढेच मुलींच्या
रक्षणार्थ
जागृत नाही हमखास..

वर्तमान स्थिती पाहता -
महिला कुठे आहे सुरक्षित
अशा स्थितीत नटाथ
टायला
प्रोत्साहन देणे आहे का
उचित ?..



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

जागतिक मानसिक आरोग्य दिवस

# त्यांना ऐकून तर घ्या.. कदाचित आयुष्य बदलून जाईल!

**मा**णूस बोलतो तेव्हा त्याचे शब्द ऐकू येतात; पण तो गप्प राहतो, तेव्हा त्याच्या मनात सुरू असलेली घालमेल कळणे हे जवळपास अशक्यच असते? चेहऱ्यावरचे हसू पाहून आपण त्याच्या आनंदाचा अंदाज बांधतो; पण त्या हास्यामागे दडलेले दुःख ओळखण्याचा प्रयत्न किती जण करतात? शरीराला झालेली जखम दिसते, म्हणून तिची काळजी घेतली जाते; मनावर झालेल्या जखमा मात्र अनेकदा अदृश्य राहतात. म्हणूनच मानसिक आरोग्याच्या प्रश्नांकडे पाहताना केवळ डोळे उघडे असून चालत नाही, तर मनही संवेदनशील असावे लागते.

१० ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन. यंदा जागतिक आरोग्य संघटनेने दिलेला संदेश आहे 'अनुभवांना मिळू दे आवाज, खऱ्या आवाजांतून घडू दे खरा बदल!' (Lived Experiences Heard: Real Voices, Real Change). मानसिक आजारांचा अनुभव घेतलेल्या व्यक्तींचे म्हणणे केवळ ऐकून घेणे नव्हे, तर त्यांच्या अनुभवांना उपचारपद्धती, आरोग्यसेवा आणि धोरणे ठरवताना महत्त्व देणे, हा या संदेशाचा खरा गाभा आहे.

एका तरुणाची कल्पना करा. उत्तम शिक्षण, चांगली नोकरी आणि सुखवस्तू कुटुंब बाहेरून पाहता आयुष्यात काहीच कमी नाही. पण हळूहळू तो एकलकोंडा होऊ लागतो. कामावर जाणे टाळतो, मित्रांपासून दूर राहतो आणि आपल्याविरुद्ध काहीतरी कटकारस्थान सुरू असल्याचे सांगू लागतो. घरच्यांना वाटते, हा आळशी झाला आहे; कुणाला वाटते, तो मुद्दाम नाटक करतोय. समाज काय म्हणेल, या भीतीने कुटुंब त्याची अवस्था लपवण्याचा प्रयत्न करते. अखेर त्याला मानसोपचारतज्ज्ञांकडे नेले जाते. योग्य उपचार, कुटुंबाचा आधार आणि वेळ यांच्या मदतीने त्याची प्रकृती सुधारू लागते.

या उदाहरणातील तरुणाला स्किझोफ्रेनियासारखा गंभीर मानसिक आजार असू शकतो.त्याच्या वागण्यामागे केवळ हट्ट किंवा इच्छाशक्तीचा अभाव नासून आजाराची गुंतागुंत असू शकते. त्याला



वेळीच समजून घेतले असते, तर त्याचा संघर्ष कदाचित कमी झाला असता. आजारापेक्षा कधी कधी समाजाचे गैरसमज आणि आप्तांची उदासीनता अधिक वेदना देतात.मानसिक आजार म्हणजे वेडेपणा नव्हे आणि मदत मागणे म्हणजे कमजोरीही नव्हे. नैराश्याने ग्रासलेली व्यक्ती हसत-खेळत वावरत असली, तरी तिच्या मनात निराशेचा अंधार असू शकतो. सततची भीती, झोपेतील बदल, एकटेपणा, असामान्य विचार किंवा जगण्याची इच्छा कमी होणे ही लक्षणे दुर्लक्षित करता कामा नयेत. योग्य वेळी तज्ज्ञांची मदत घेतल्यास अनेक मानसिक आजारांवर प्रभावी उपचार शक्य आहेत.

यंदाच्या संकल्पनेचा अर्थ एवढाच नाही की रुग्णांना आपली कहाणी सांगण्याची संधी द्यावी. त्यांच्या अनुभवांतून आरोग्यसेवा अधिक मानवी, सुलभ आणि परिणामकारक व्हावी. उपचार कसे असावेत, पुनर्वसन कसे घडावे आणि समाजात सन्मानाने जगण्यासाठी कोणत्या सुविधा मिळाव्यात, हे ठरवताना संबंधित व्यक्तींचा आवाजही महत्त्वाचा ठरला पाहिजे व त्यानुसार आपला दृष्टिकोण व आचरणात आमूलाग्र बदल करणे आवश्यक ठरते.आपणही आपल्या घरातून या बदलाची सुरुवात करू शकतो. एखादी व्यक्ती मन मोकळे करत असेल, तर लगेच सल्ले देण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकूया. 'विसरून जा', 'मन घट्ट कर', 'तुझ्याकडे सगळे असूनही तुला काय झाले?' असे प्रश्न विचारण्याऐवजी, 'तुला काय वाटते आहे? मी तुझ्यासाठी काय करू शकतो?' एवढे विचारून पाहूया. कधी कधी सहानुभूतीने ऐकून घेणारा एक माणूसही निराशेच्या गर्तेत सापडलेल्या व्यक्तीसाठी आशेचा किरण ठरू शकतो.

कारण प्रत्येक माणसाला केवळ उपचारांचीच नव्हे, तर समजून घेतले जाण्याचीही गरज असते. या जागतिक मानसिक आरोग्य दिनी आपण एवढेच ठरवूया... मानसिक आजार असलेल्या व्यक्तींबद्दल बोलण्यापेक्षा त्यांच्याशी बोलूया; त्यांच्यासाठी निर्णय घेण्यापेक्षा त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करूया. त्यांच्या वेदनांना आवाज देऊया आणि त्या आवाजातून बदल घडवूया.शेवटी, माणसाला सावरण्यासाठी नेहमी मोठ्या शब्दांची गरज नसते; कधी कधी प्रेमाने विचारलेला एक प्रश्न, निःपक्षपातीपणे ऐकून घेणारे दोन कान आणि सोबत असल्याची जाणीव पुरेशी ठरते.

ऐकू या.. समजून घेऊ या..आणि समजून घेतल्यानंतर आवश्यक ती कृतीही करूया. कारण जेव्हा अनुभवांना खऱ्या अर्थाने आवाज मिळतो, तेव्हाच बदलाची सुरुवात होते.



**डॉ. रोमिल वारकरी**
मानसोपचार तज्ञ,
अरुणोदय माईंड अँड डेंटल केअर,
खापर्डे बगीचा,
अमरावती.
मो.७७३८३८३७९६



paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच


# न्यू तापडिया नगर रेल्वे गेट त्वरित सुरू करा!

## जानेवारीअखेर उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्याचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

न्यू तापडिया नगर रेल्वे गेट तातडीने सुरू करा आणि रखडलेला रेल्वे उड्डाणपूल जानेवारीच्या अखेरपर्यंत वाहतुकीसाठी खुला करा, असे स्पष्ट निर्देश आमदार रणधीर सावरकर यांनी दिले. दुसरीकडे, खासदार अनुप धोत्रे यांनी रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांशी (डीआरएम) थेट संपर्क साधत कामातील दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त केली. नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नका, अडथळे दूर करून कामाला गती द्या, अशा शब्दांत त्यांनी रेल्वे प्रशासनाला सुनावले.

### १०८ कोटींच्या निधीनंतर कामाला गती



### १५ ऑक्टोबरपासून गर्डर उभारणी

अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार, १५ ते ३० ऑक्टोबरदरम्यान रेल्वे विभागाकडून गर्डर उभारणीचे काम केले जाणार आहे. त्यानंतर नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये रेल्वे व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उर्वरित बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. जानेवारीअखेर संपूर्ण उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मात्र, यापूर्वीही काम रखडल्याचा अनुभव पाहता, या वेळापत्रकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### १०८ कोटींच्या निधीनंतर कामाला गती

उड्डाणपुलासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्याकडे पाठपुरावा करून आमदार रणधीर सावरकर यांनी १०८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याचे सांगण्यात आले. यापूर्वी माजी केंद्रीय मंत्री संजय धोत्रे आणि आमदार सावरकर यांच्या मागणीनंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही निधी मंजूर केला होता. महाविकास आघाडीच्या काळात काम थांबल्याचा दावा करण्यात आला असून, आता निधी आणि प्रशासकीय पाठपुराव्यानंतर कामाला गती मिळाल्याचे सांगण्यात आले.

गुडधी येथील रेल्वे उड्डाणपूल व अंडरबायपास, डाबकी रोड अंडरपास आणि अकोट फाईल रेल्वे उड्डाणपुलाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी प्रलंबित कामे, तांत्रिक अडचणी आणि काम पूर्ण करण्याच्या कालमर्यादेवर चर्चा करण्यात आली. विशेषतः न्यू तापडिया नगर रेल्वे गेटमुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता, संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम पूर्ण करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

#### जुना पूल न पाडता पर्यायी आराखडा

अकोट फाईल उड्डाणपुलाच्या कामासाठी यापूर्वी रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तीन बैठका झाल्या होत्या. जुन्या पुलाला पाडून वाहतुकीचा प्रश्न अधिक गंभीर होऊ न देता नवीन उड्डाणपूल कसा उभारता येईल, यावर यावेळी चर्चा झाली.

यासाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था, आर्थिक तरतूद आणि तांत्रिक अडचणींचा विचार करून आराखडा तयार करण्यात आला. या प्रक्रियेत खासदार अनुप धोत्रे यांनी पुढाकार घेतल्याचे सांगण्यात आले.

#### लोकप्रतिनिधींसह अधिकारी उपस्थित

बैठकीला आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, माजी महापौर शारदाताई खेडकर, विजय अग्रवाल, जयंत मसने, नगरसेवक प्रशांत जोशी, बबलू जगताप, नितू जगताप, शशिकला काळे, संदीप गावंडे, संदीप शेगोकार, रणजीत खेडकर, गिरीश जोशी आणि ॲड. देवाशिष काकड उपस्थित होते. प्रशासकीय बाजूने सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, रेल्वेचे सहाय्यक मंडळ अभियंता ए. डी. रायबोले, वरिष्ठ अभियंता प्रमोद सर, उपअभियंता राजेश राठोड, उपअभियंता मृणालिनी ढंगारे यांच्यासह रेल्वे आणि बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# हुंडिवाले हत्याकांडातील श्रीराम गावंडे यांना दिलासा नाही

## आजीवन कारावासाची शिक्षा स्थगित करण्याची याचिका नागपूर खंडपीठाने फेटाळली

■ प्रतिनिधी | अकोला ■

किसनराव हुंडिवाले हत्याकांडात दोषी ठरविण्यात आलेले श्रीराम काजदान गावंडे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलासा देण्यास नकार दिला आहे. आजीवन कारावासाची शिक्षा स्थगित करून जामिनावर मुक्त करण्याची मागणी करणारी त्यांची याचिका न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती राज डी. वाकोडे यांच्या खंडपीठाने फेटाळून लावली. ६५ वर्षीय गावंडे यांनी दाखल केलेल्या अर्जावर १ सप्टेंबर २०२६ रोजी हा निर्णय देण्यात आला.

अभियोजन पक्षाच्या माहितीनुसार, किसनराव हुंडिवाले हे अकोल्यातील खेतान नगर येथील स्वामी विवेकानंद इंग्लिश हायस्कूल आणि मलकापूर येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक मराठी विद्यालय चालविणाऱ्या संस्थेशी संबंधित होते.

संस्थेचे व्यवस्थापन आणि निवडप्रक्रियेवरून २०१४ पासून धर्मादाय आयुक्तांकडे वाद सुरू होता. तसेच, आरोपींनी कथितरीत्या अवैध मार्गाने मालमत्ता मिळविल्याप्रकरणी मृतकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्याचा आरोपही होता. ६ मे २०१९ रोजी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या परिसरात किसनराव हुंडिवाले यांच्यावर हल्ला करून त्यांची हत्या करण्यात आल्याचे अभियोजनाचे म्हणणे आहे.

### साक्षीदारांच्या जबाबांवर बचाव पक्षाचे आक्षेप

गावंडे यांच्या वतीने ज्येष्ठ अधिवक्ता अनिल मार्डीकर यांनी युक्तिवाद करताना, कनिष्ठ न्यायालयाने विश्वासार्ह मानलेल्या प्रमुख साक्षीदारांच्या जबाबांमध्ये विसंगती असल्याचा दावा केला. मृतकाचे पुत्र प्रवीण हुंडिवाले, अधिवक्ता नितीन धूत आणि पोलीस शिपाई राजेश वानखडे यांच्या साक्षींच्या विश्वासार्हतेवर बचाव पक्षाने प्रश्न उपस्थित केले. गावंडे यांचे वय ६५ वर्षे असून, हल्ल्यात त्यांची विशिष्ट प्रत्यक्ष भूमिका स्पष्ट होत नसल्याचाही युक्तिवाद करण्यात आला. मात्र, राज्य सरकारच्या वतीने सहायक सरकारी अधिवक्ता व्ही. ए. ठाकरे यांनी याचिकेला विरोध केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यास विलंब झाला म्हणून त्यांची साक्ष अविश्वसनीय ठरत नाही. तसेच, या टप्प्यावर दोषसिद्धीच्या निर्णयावर शंका घेण्याइतका ठोस आधार नसल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

### सामूहिक जबाबदारीचाही न्यायालयाचा निर्वाळा

भारतीय दंड संहितेच्या कलम १४९ चा संदर्भ देताना खंडपीठाने स्पष्ट केले की, बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशातून गुन्हा घडल्यास त्या जमावातील सदस्यांवर सामूहिक जबाबदारी निश्चित होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक आरोपीने स्वतः प्रत्यक्ष हल्ला केलेला असणे आवश्यक नाही. केवळ साक्षीपुराव्यांतील संभाव्य त्रुटी किंवा अपीलमध्ये विचारात घेण्यासारखे मुद्दे आहेत, या आधारावर आजीवन कारावासाची शिक्षा स्थगित करता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले. दोषसिद्धी प्रथमदर्शनी टिकू शकत नाही, असा स्पष्ट आणि ठोस आधार अर्जदाराला दाखविता आला नसल्याचे निरीक्षण नोंदवत खंडपीठाने गावंडे यांची याचिका फेटाळली.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत मनपा शालेय विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिकेच्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा शालेय विद्यार्थ्यांसाठी नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शुक्रवारी (९ ऑक्टोबर) चिवचिव बाजारजवळील समग्र शिक्षा अभियान कार्यालयात हे शिबिर पार पडले.

मनपाच्या समाजकल्याण व महिला-बालकल्याण विभागाच्या वतीने आयोजित या शिबिरात नेत्रतज्ज्ञ डॉ. विवेक खपली आणि मनपाचे शैलेश मिश्रा यांनी विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करून सेवा दिली. या उपक्रमाचा मनपा अधिनस्त शाळांमधील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

विद्यार्थ्यांच्या डोळ्यांचे आरोग्य जपणे आणि दृष्टीसंबंधी समस्या वेळीच लक्षात येऊन त्यावर योग्य उपचार करता यावेत, या दृष्टीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मनपा शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर, समाजकल्याण व महिला-बालकल्याण विभागप्रमुख रंजना आंधळे, पंकज गायकवाड, मंगेश शिरसाट, माया ठाकूर, पुष्पा तिवारी आणि पवन सोळंके यांच्यासह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतचोरीविरोधात काँग्रेसचे दोन महिन्यांचे जनजागृती महाभियान

## जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे यांच्या नेतृत्वात जिल्हाभरात विविध उपक्रम; पाच टप्प्यांत होणार अभियान

■ प्रतिनिधी | अकोला ■

मतचोरीच्या मुद्द्यावरून देशातील राजकीय वातावरण तापले असताना काँग्रेसने या विरोधात जनजागृती करण्यासाठी दोन महिन्यांचे महाभियान हाती घेतले आहे. पाच टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या या अभियानाच्या माध्यमातून मतदारांमध्ये जागृती करणे, मतदार याद्यांची पडताळणी करणे आणि कथित मतचोरीचे पुरावे संकलित करण्यावर भर दिला जाणार आहे. अकोला जिल्ह्यात जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश भाऊ तायडे यांच्या नेतृत्वात हे अभियान राबविण्यात येणार आहे.



### संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत राष्ट्रीय रॅली

महाभियानाच्या पाचव्या आणि अंतिम टप्प्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील मित्रपक्षांच्या सहभागातून नवी दिल्लीतील रामलीला मैदानावर भव्य राष्ट्रीय रॅली आयोजित करण्याचे नियोजन आहे. या रॅलीत देशभरातील काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. २६ नोव्हेंबर या संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते दिल्लीकडे रवाना होतील. मतदार यादीच्या पडताळणीपासून ते राष्ट्रीय स्तरावरील आंदोलनापर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतचोरीच्या मुद्द्यावर जनजागृती करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. अकोला जिल्ह्यात प्रकाश भाऊ तायडे यांच्या नेतृत्वात या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सक्रिय होणार असून, गावपातळीपासून जिल्हा आणि राष्ट्रीय स्तरापर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

अभियानाच्या पहिल्या टप्प्याला १० ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून, १८ ऑक्टोबरपर्यंत काँग्रेसच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी गावागावांत सभा घेऊन नागरिकांना मतचोरीच्या मुद्द्याबाबत माहिती देतील. त्यानंतर २५ ते २७ ऑक्टोबरदरम्यान दुसऱ्या टप्प्यात जनजागृती मोहिमेचा अहवाल तयार करणे, माध्यमांद्वारे माहिती प्रसारित करणे आणि प्रदेश काँग्रेस कार्यालयाकडे अभियानाची माहिती पाठविण्याचे काम केले जाणार आहे. तिसऱ्या टप्प्यात २७ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरदरम्यान ब्लॉक अध्यक्ष आणि जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत बैठका घेतल्या जातील. काँग्रेसचे कार्यकर्ते 'वोटरक्षक' म्हणून प्रत्येक मतदान केंद्राच्या स्तरावर मतदार यादीची पडताळणी करतील. मतदार यादीतील कथित त्रुटी आणि घोळासंदर्भातील पुरावे ११ नोव्हेंबरपर्यंत काँग्रेस कार्यालयात जमा करण्याचे नियोजन आहे. चौथ्या टप्प्यात १२ ते ३० नोव्हेंबरदरम्यान गावोगावी चौकांमध्ये खाटांवर बसून सभा घेण्याचा उपक्रम राबविला जाईल. या सभांमध्ये प्रारूप मतदार यादीचे वाचन करण्यात येईल. गावातील प्रतिष्ठित नागरिकांना सोबत घेऊन मतदार यादीतील नोंदींची माहिती दिली जाईल. तसेच मतचोरीच्या आरोपांबाबत नागरिकांमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

**अकोला :** अग्रवाल समितीच्या वतीने अग्रसेन भवनात आयोजित जयंती उत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.शुक्रवारी अग्रवाल समितीचे अध्यक्ष महेंद्र खेतान यांच्या अध्यक्षतेत भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. या शिबिरात फिजिशियन डॉ. अशोक अग्रवाल, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. आरती अग्रवाल, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. पूजा खेतान,वातरोग तज्ज्ञ डॉ. नीती केडिया, दंतरोग तज्ज्ञ डॉ. अंशुल गुप्ता, छाती व श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. यश केडिया, डॉ. शुभम अग्रवाल, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. ईशांक गुप्ता आणि अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अचिन मुरारका यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी केली.यात रक्त तपासणी,ब्लड प्रेशर व अन्य वैद्यकीय उपकरणे ठेवण्यात आली.

# आपत्तीला घाबरू नका, सज्ज राहा!

## श्री बागाजी विद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**अकोट :** तालुक्यातील रुईखेड येथील श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'आपत्ती व्यवस्थापन व पूर्वतयारी' या विषयावर विशेष प्रशिक्षण घेण्यात आले. नॅशनल मॅनेजमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणात नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, सुरक्षितता, बचावकार्य आणि आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजनांची माहिती देण्यात आली.प्रशिक्षक अनंत तराळे यांनी प्रात्यक्षिके व कृतीआधारित उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपत्तीच्या वेळी प्रसंगावधान राखणे, योग्य निर्णय घेणे आणि स्वतःसह इतरांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले.यावेळी मुख्याध्यापक निनाद मानकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि नववी व दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते.

# सावकारी प्रकरणातील शेतीच्या ताब्याबाबत पंचनामा

## धारूळ रामापूर येथील वादग्रस्त शेतजमिनीची महसूल अधिकाऱ्यांकडून पाहणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील धारूळ रामापूर शिवारातील गट क्रमांक २१ मधील वादग्रस्त शेतजमिनीच्या प्रत्यक्ष ताब्याबाबत महसूल प्रशासनाने ६ ऑक्टोबर रोजी पंचनामा केला. मंडळ अधिकारी, तलाठी आणि कोतवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या या पंचनाम्यात शेजारील शेतकऱ्यांचे जबाब नोंदविण्यात आले. संबंधित जमीन सुरुवातीपासून रमेश रामचंद्र खिरकर यांच्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या जबाबात नमूद केल्याची माहिती आहे.



धारूळ रामापूर शिवारातील गट क्रमांक २१ मधील १ हेक्टर ६२ आर क्षेत्राची ही जमीन २० एप्रिल १९९८ रोजी सावकारी व्यवहारात तारण म्हणून गैरअर्जदार सरिता विजय चांडक यांच्या नावे खरेदीखताद्वारे करून देण्यात आल्याचे प्रकरण आहे. मात्र, ही जमीन सुरुवातीपासून रमेश रामचंद्र खिरकर यांच्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणाची सुनावणी अकोला येथील जिल्हा उपनिबंधक कार्यालयात सुरू आहे.या प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधकांनी अकोट तहसीलदारांना संबंधित शेतजमिनीचा प्रत्यक्ष ताबा कोणाकडे आहे, याची वस्तुनिष्ठ माहिती पंचनाम्याद्वारे सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार तहसीलदारांच्या आदेशाने अकोलखेड मंडळ अधिकारी आणि रामापूर तलाठी यांनी अर्जदार व गैरअर्जदारांना लेखी नोटीस बजावली. त्यानंतर ६ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामा करण्यात आला.

पंचनाम्यावेळी अर्जदार रमेश रामचंद्र खिरकर उपस्थित होते; मात्र गैरअर्जदार सरिता विजय चांडक उपस्थित नव्हत्या. त्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरूपात महसूल अधिकाऱ्यांकडे सादर केले आहे. यावेळी शेताच्या धुऱ्यालगत असलेल्या शेतकऱ्यांचे तसेच उपस्थित साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले.

त्यांच्या सह्याही पंचनाम्यावर घेण्यात आल्या.उपस्थित शेतकऱ्यांनी संबंधित जमीन गेल्या १५ ते २० वर्षांपासून रमेश खिरकर यांच्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचे सांगितले. यंदा या जमिनीत खिरकर यांनी तूर पिकाची पेरणी केल्याचेही शेतकरी अरुण शामराव चामलाटे यांनी आपल्या लेखी जबाबात नमूद केले. या पंचनाम्यावेळी मंडळ अधिकारी पी. ए. होपळ, तलाठी राजाभाऊ खामकर, तलाठी जयश्री धवणे, कोतवाल तसेच शेतकरी धनराज श्रीराम धर्मे, अरुण शामराव चामलाटे, सोपान रमेश सरपे, अनिल रामदास आतकड, देवानंद रमेश खिरकर आणि अर्जदार रमेश रामचंद्र खिरकर उपस्थित होते.

### जिल्हा उपनिबंधकांकडे अहवाल सादर होणार

तहसीलदारांच्या आदेशानुसार प्रत्यक्ष ताब्याबाबत पंचनामा करून शेतकरी व साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. या प्रकरणाचा वस्तुनिष्ठ अहवाल लवकरच जिल्हा उपनिबंधक कार्यालय, अकोला येथे सादर करण्यात येणार असल्याची माहिती मंडळ अधिकारी पी. ए. होपळ आणि तलाठी जयश्री धवणे यांनी दिली. या अहवालानंतर सावकारी प्रकरणातील पुढील कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.


## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६९१/२०२६ — प्रोसेस नं.१२७६१/२०२६
चौ.ता. २७/११/२०२६ — दिनांक : ०६/१०/२०२६

**अर्जदार :** १. धिरज गजानन तायडे रा. ओल्ड खेतान नगर, कौलखेड, शंकर फर्नीचर मागे, अकोला. ता. जि. अकोला. २. श्रीमती. शोभा गजानन तायडे रा. एस.बि.आय. बॅक जवळ, खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गजानन श्रीरंग तायडे
**पत्ता :-** रा. खेतान नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गजानन श्रीरंग तायडे यांचे दि. ०४/०८/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**

I have changed my name From
**NAGHMA PARVEEN SHAIKH ALEEM -**
To- **NAGMA PARVIN QUAYYUM MALIK**
Address : C8 1950, Yusuf Ali Anjan Chowk, Akot File, Akola

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६९५/२०२६ — प्रोसेस नं.१२८७६/२०२६
चौ.ता. २७/११/२०२६ — दिनांक : ०८/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. मनकर्णाबाई रामराव पावडे २. विजय रामराव पावडे ३. राजेश रामराव पावडे ४. मंगेश रामराव पावडे ५. रेखा कैलास ताथोड सर्व रा. मु. पो. गुडधी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामराव शामराव पावडे
**पत्ता :-** रा. मु. पो. गुडधी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामराव शामराव पावडे यांचे दि. ०१/०२/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, आमचे पक्षकार विशाल शिवाजीराव ढाकरगे, रा. फ्लॅट क्र. २०२, २ रा माळा, बालाजी पॅराडाईस बिल्डिंग, रिंग रोड, रामकृष्ण नगर, अकोला यांनी सौ. शिला तुळशिराम चतरकर रा. डाबकी रोड, जुने शहर, अकोला त्यांच्या मालकीचे व ताब्यातील शेत विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे व लवकरच खरेदी खत नोंदवून घेणार आहे. मालमत्तेचे वर्णन :- मौजे निमकर्दा, ता. बाळापुर, जि. अकोला येथील शेत गट क्र. ३५ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १ हे. २० आर. शेत यास चतुः सीमा :- पूर्वेस - शीवदांड व त्यानंतर बोरकर यांचे शेत, पश्चिमेस - रमेश बनिया यांचे शेत, उत्तरेस - महादेव भाकरे यांचे शेत, दक्षणेस - मनाली शिवदांड व त्यानंतर महादेव खेडकर व वसंत खेडकर यांचे शेती सदरहू चतू:सीमेतील बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा बोजा, कर्ज, हक्क, गहाण, बक्षीस, अधिकार व्यवहार, वारस व इतर कोणत्याही हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाच्या आत आमच्याकडे लेखी कागदपत्रासह हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे पक्षकार खरेदीखत नोंदवून घेतील. त्यानंतर कोणाचाही कोणत्याही व कसल्याही प्रकारचा उजर किंवा वाद चालणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. करिता ही जाहीर नोटिस.

**ॲड. व्ही. जे. भाकरे**
'गीताई' पाटील चौक, गायगाव
ता. बाळापुर, जि. अकोला मोबाइल : ९७६३३४६५३०

## जाहीर नोटीस

**१) खरेदीदार (घेणार) :** नाव : मो. अजहर मो. एजाज (मोहम्मद अझहर मोहम्मद एजाज) राहणार : खैरमोहम्मद प्लॉट, अकोला. मोबाईल नंबर : ९१७५०३२७८६,

**२) विक्रेती (देणार) :** नाव: शगुप्ता खातून इस्माईल खान तर्फे / मालक : जुबेर खान नवाब खान, राहणारः जुने शहर, अकोला.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :**

मौजे अकोली खुर्द प्र. ता. जि. अकोला र. डी. र. स. डी. अकोला पुर्वीचे ग्रा.पं. अकोली खुर्द व आज रोजी म.न.पा.अकोला च्या कक्षेतील प्रेम नगर मधील रहीवासी वापराची अ.नं. २६ (सव्वीस) उत्तर दक्षिण वाटणी करून पश्चिमे कडील भागाची खुली जागा ज्याचे एकुण क्षेत्रफळ १०००.०० चौ.फुट जागा असुन या पैकी उत्तर दक्षिण वाटणीने पूर्वे कडील भागाची जागा आज रोजी तुम्हास विकली.

तरी या मालमत्तेवर किंवा होणाऱ्या व्यवहारावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, कोर्ट वाद किंवा आक्षेप (Objection) असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपल्या आक्षेपाच्या कायदेशीर कागदपत्रांच्या पुराव्यासह खालील पत्त्यावर किंवा दिलेल्या मोबाईल नंबरवर लेखी संपर्क साधावा.

**नावः मो. अजहर मो. एजाज**
मोबाईल नंबर : ९१७५०३२७८६


जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २९८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ऑक्टोबरमध्ये कमी पावसाची शक्यता

## पाणी व शेती नियोजनावर भर देण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**
भारतीय हवामान विभागाने ऑक्टोबर तसेच मान्सूनोत्तर कालावधीसाठी हवामानाचा हंगामी अंदाज प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार ऑक्टोबरमध्ये देशाचे एकूण पर्जन्यमान दीर्घकालीन सरासरीच्या ८५ टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. देशाच्या बहुतांश भागात सामान्यपेक्षा कमी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या हवामान अंदाजाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सिंचनाचे नियोजन तसेच शेतीतील पाण्याचा कार्यक्षम वापर यास प्राधान्य देणे आवश्यक आहे. भारतीय हवामान विभागानेही पाण्याची उपलब्धता नियमितपणे तपासणे, सिंचन संसाधनांचा योग्य वापर करणे, जलसंवर्धन व पाण्याची बचत करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

**शेतकऱ्यांना आवाहन**

ऑक्टोबर महिन्यातील संभाव्य कमी पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी उपलब्ध पाण्याचे नियोजन करून पिकांच्या पाण्याची गरज, सिंचनाची उपलब्धता आणि स्थानिक हवामान अंदाज लक्षात घेऊन कृषी व्यवस्थापन करावे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार कमी पर्जन्यमानामुळे मातीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता,



सिंचनाची गरज आणि कृषी उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असते.

**तापमानात वाढीची शक्यता**

ऑक्टोबर महिन्यात देशाच्या बहुतांश भागात कमाल तसेच किमान तापमान सामान्यपेक्षा अधिक राहण्याची शक्यता असल्याने उष्णतेचा परिणाम, पाण्याची वाढती मागणी आणि पिकांवरील ताण याबाबतही संबंधित यंत्रणांनी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश प्रशासनाने दिले आहे.

**नागरिकांना आवाहन**

घरगुती वापरातील पाण्याची नासाडी टाळा व आवश्यक तेवढेच पाणी वापरा, पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणाऱ्या स्रोतांचा काटकसरीने वापर करा, घरातील गळतीचे नळ व पाईपलाईन तात्काळ दुरुस्त करा, वाहन, अंगण, रस्ते धुणे यासाठी पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळा, उपलब्ध पावसाचे पाणी व घरगुती पाण्याचा शक्य तिथे पुनर्वापर करा, नागरिकांनी स्थानिक पाणीपुरवठा व्यवस्था व प्रशासनाच्या सूचनांना सहकार्य करावे. शेतकरी बांधवांनी उपलब्ध सिंचन पाण्याचा कार्यक्षम वापर करून पिकांच्या पाण्याचे नियोजन करावे. तापमान वाढीची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी विशेषतः दुपारच्या वेळेत अनावश्यक उन्हात जाणे टाळावे व पुरेसे पाणी प्यावे.

आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथे ०७१५२-२४३४४६/२९९०१० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविले आहे.

वीज पेट्यांची झाकणे गायब, ग्रीपाही बेपत्ता : महावितरणचा कारभार रामभरोसे

# तारासावंग्याच्या शिवेवर मृत्यूचा सापळा

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**
तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या तारासावंगा गावाच्या शिवेवर महावितरणच्या भोंगळ कारभाराचे दर्शन घडत आहे. ट्रान्सफॉर्मरजवळील वीज पेट्यांची झाकणे गेल्या कित्येक वर्षांपासून गायब असून, पेट्यांमधील ग्रीपाही बेपत्ता आहेत. विद्युत यंत्रणेतील घटक उघड्यावर पडले असतानाही संबंधित यंत्रणेचे लक्ष जात नसल्याने ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



ट्रान्सफॉर्मर परिसरातील उघड्या वीज पेट्या म्हणजे अपघाताला थेट निमंत्रणच आहे. या परिसरातून शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांची ये-जा सुरू असते. लहान मुलांचाही वावर असण्याची शक्यता असल्याने विद्युत प्रवाहाच्या संपर्कातून गंभीर दुर्घटना घडण्याचा धोका निर्माण झाला आहे. एखाद्याचा जीव गेल्यानंतरच महावितरणला जाग येणार का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

वीज पेट्यांची झाकणे आणि ग्रीपा गायब होऊनही दुरुस्ती का करण्यात आली नाही, हा ग्रामस्थांचा प्रश्न आहे. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याबरोबरच नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणे ही महावितरणची जबाबदारी असताना, या धोकादायक स्थितीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

तारासावंगा गावाच्या शिवेवरील या वीज यंत्रणेची तातडीने पाहणी करून उघड्या पेट्यांना झाकणे बसवावे, आवश्यक ग्रीपा व सुरक्षा साहित्य उपलब्ध करून द्यावे आणि परिसरातील संभाव्य धोका दूर करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आता महावितरणचे अधिकारी या गंभीर प्रकाराची दखल घेऊन तातडीने कार्यवाही करतात की एखाद्या दुर्घटनेनंतरच जागे होतात, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## काही क्षण आयुष्यभरासाठी मनात कोरले जातात



***नाम फाउंडेशनच्या कामानिमित्त वर्ध्यात आलेल्या नाना पाटेकर यांना छायाचित्रकार राहुल तेलरांधे यांच्या छायाचित्रांनी सजलेली वर्धा पर्यटन पुस्तिका भेट दिली होती. नानांनी आपुलकीने स्वीकारत केलेली विचारपूस आज आठवताना मन भरून येते. कालपर्यंत डोळ्यांसमोर असलेला तो चेहरा आज आठवणीत उरलाय. नाना, तुमच्या आठवणी कायम हृदयात जिवंत राहतील.***

# हास्य-व्यंग्य कविता ही समाजाला आरसा दाखवणारी अप्रतिम कला : रामदास तडस

**देवळी/जनमाध्यम**
हास्य-व्यंग्य कविता ही केवळ मनोरंजनाची कला नसून समाजातील विसंगती, दैनंदिन जीवनातील गोंधळ आणि मानवी स्वभावातील उणिवांवर मिश्कीलपणे बोट ठेवणारे प्रभावी माध्यम आहे. हसता-हसता समाजाच्या डोळ्यात अंजन घालण्याची ताकद हास्य-व्यंग्य कवितेत आहे, असे प्रतिपादन माजी खा.रामदास तडस यांनी केले.

देवळी येथील श्यामसुंदर मन्नालालजी अग्रवाल धर्मशाळेच्या सभागृहात स्व. श्यामसुंदर अग्रवाल यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'घडीभर बसा, पोटभर हसा' या हास्य-व्यंग्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत



होते.कार्यक्रमाला अखिल भारतीय स्तरावरील नामांकित हास्यकवी प्रा. कपिल जैन, सुप्रसिद्ध शायर इमरान राही, सावाजी स्पोर्ट्सचे अध्यक्ष मोहनबाबू अग्रवाल आणि सचिव प्राचार्य गणेश मालधुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शायर इमरान राही यांनी आपल्या बहारदार गझलांनी रसिकांची मने जिंकली. हास्यकवी प्रा. कपिल जैन यांनी दर्जेदार आणि सुमधुर कवितांच्या सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली. त्यांच्या कवितांमधून प्रेम, करुणा आणि मानवतेचा संदेश मिळाल्याचे मत मोहन अग्रवाल यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. स्व. श्यामसुंदर अग्रवाल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी देवळीतील विविध महाविद्यालयांमधून कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. मंगेश सुटे,तेजस्विनी टिपले आणि ईश्वरी चिखलकर यांना स्व. अशोक श्यामसुंदर अग्रवाल स्मृती पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन महेश अग्रवाल यांनी केले. प्रा. केशवराव कुंवारे यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. गणेश मालधुरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. दीपक अग्रवाल यांनी आभार मानले.यावेळी प्राचार्य सुनीता सोनारे, राजू लभाणे, नगर परिषद उपाध्यक्ष राहुल चोपडा, माजी नगराध्यक्ष जब्बार तंवर, उल्हास वाघ, श्रीकांत पवार, मधुसूदन अग्रवाल, विलास जोशी, गोल्डी वग्गा, अमोल मानकर, मोहन जोशी, प्रा. ज्ञानेश्वर काष्ठ आणि ॲड. मनीष सावरकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## उषा खुळे यांचे निधन

**तिवसा-** येथील त्रिमूर्ती नगर स्थित रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका उषा जानराव खुळे (वय ७३) यांचे बुधवारी ७ ऑक्टोबरला रात्री अल्पशा आजाराने नागपूर येथे उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्यापश्चात दोन मुले व मोठा आप्तपरिवार आहे.

# सहाय्यक आरोग्य संचालकांनी घेतला कुष्ठरोग निर्मुलनाचा आढावा

**वर्धा/जनमाध्यम**
राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी व ग्रामीण भागातील मोहिमांना गती देण्यासाठी वरीष्ठ पातळीवरुन थेट पाहणी केली जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणुन पुणेचे कुष्ठरोग व क्षयरोग सहाय्यक संचालक डॉ.सचिन एडके व वर्धाचे सहाय्यक संचालक डॉ.रा.ज.पराडकर यांनी जिल्ह्यातील दुर्गम आरोग्य केंद्रांना भेटी देऊन कृष्ठरोग निर्मुलनाचा आढावा घेतला.

यावेळी डॉ.सचिन एडके व डॉ.रा.ज.पराडकर यांनी आष्टी तालुक्यातील खडका, देऊरवाडा, टाकरखेडा उपकेंद्र, आर्वी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, तळेगाव शामजीपंत प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आष्टी व उपकेंद्रांना भेटी देऊन कामकाज व सेवांचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणी दौराप्रसंगी कुष्ठरोग पर्यवेक्षक नारायण बरेंडीया, मोहित कातोरे उपस्थित होते.

भेटी दरम्यान आरोग्य केंद्रामधील कुष्ठरुग्ण तपासणी मोहिमेची सद्यस्थिती जाणून घेऊन अतिदुर्गम भागातील एकही संभाव्य रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये, यासाठी कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन कुष्ठरोगाची लक्षणे असणाऱ्या रुग्णांची तपासणी करण्यात यावी, अशा सुचना केल्यात.

यावेळी वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक आणि आशा सेविका यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. मागील १० वर्षातील कुष्ठरुग्णांची यादी तयार करुन त्यांचा नियमित पाठपुरावा करावा. ५ वर्षातील कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी येत्या ३१ ऑक्टोंबर पर्यंत पूर्ण करावी, अशा सुचना दिल्यात. तसेच मल्टिड्रग थेरपी, औषधसाठा, क्षयरुग्णांना दिल्या जाणाऱ्या निक्षय पोषण योजनेचा लाभ आणि उपचाराचा पाठपुरावा याची त्यांनी तपासणी केली.

जिल्ह्यामध्ये मागील एलसीडीसीमध्ये १८८ केसेस शोधण्यात आल्या तर या मोहिमेदरम्यान आजअखेर ४२ नवीन केसेस शोधण्यात आल्या. सदर मोहीम १४ ऑक्टोंबर पर्यंत असल्याने कामात गती घेणे आवश्यक आहे जिल्ह्यात ०.९ टक्के दराने संशयित कुष्ठरुग्णांचा शोध घेतला गेला आहे. त्यामधील प्रलंबित २२०३ संशयित रुग्णांची तपासणी वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत वेळेत पूर्ण करावी, असे सांगितले. मोहीम यशस्वीरीत्या राबविण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले, कुष्ठरोगच्या सहाय्यक संचालकांनी कळविले आहे.

# लाख रुपये खर्च, तरी कचरा विलगीकरण केंद्र झुडपांत कैद

## सुजातपूर ग्रामपंचायतीचा कारभार चर्चेत

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**
गाव स्वच्छ ठेवण्यासाठी शासनाच्या निधीतून उभारलेले कचरा विलगीकरण केंद्रच झाडे-झुडपांच्या विळख्यात अडकले आहे. सुजातपूर ग्रामपंचायतीच्या हद्दीत अंदाजे एक लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या वास्तूचा प्रत्यक्ष वापरच सुरू नसल्याने निधी खर्च करूनही स्वच्छतेचा उद्देश साध्य झाला नसल्याचे चित्र समोर आले आहे.

गावातील कचऱ्याचे योग्य विलगीकरण व्हावे आणि परिसर स्वच्छ राहावा, यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. मात्र, सुजातपूर



येथील कचरा विलगीकरण केंद्रापर्यंत जाण्यासाठी व्यवस्थित रस्ताच उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे केंद्राच्या परिसरात झाडे-झुडपे वाढली असून, ही वास्तू वापराअभावी दुर्लक्षित अवस्थेत पडून आहे.

एकीकडे स्वच्छतेचा संदेश दिला जात असताना दुसरीकडे त्यासाठी उभारलेल्या सुविधेची अशी अवस्था असेल, तर निधी खर्च करण्याचा उपयोग काय, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. केंद्राच्या दुरवस्थेबाबत ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असता संबंधितांकडून प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे या केंद्राच्या देखभालीची जबाबदारी नेमकी कोणाची आणि त्याचा वापर कधी सुरू होणार, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामपंचायतीने तातडीने झाडे-झुडपे हटवून केंद्रापर्यंत जाण्यासाठी रस्ता तयार करावा आणि कचरा विलगीकरण केंद्र कार्यान्वित करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अन्यथा शासनाच्या निधीतून उभारलेल्या वास्तू केवळ शोभेच्या वस्तू बनून राहतील, अशी नाराजी व्यक्त केली जात आहे.

बलीपूरमध्ये महावितरणचे विशेष सेवा शिबीर

## सौर ऊर्जा योजनांची जनजागृती; ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा/जनमाध्यम**
राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत महावितरणच्या खारांगणा उपविभागाच्या वतीने डबलीपूर ग्रामपंचायतीमध्ये विशेष सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातून ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांना महावितरणच्या विविध योजनांची माहिती देण्यासह सौर ऊर्जा योजनांबाबत जनजागृती करण्यात आली. शिबिरात केंद्र शासनाच्या पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजनेसह राज्य शासनाच्या स्मार्ट योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेची माहिती देण्यासाठी विशेष माहिती स्टॉल उभारण्यात आला होता. या माध्यमातून इच्छुक नागरिकांना योजनांची माहिती देण्यात आली तसेच ऑनलाइन नोंदणीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. घराच्या छतावर सौर ऊर्जा संच बसवून वीजबिलात बचत कशी करता येते, तसेच सौर कृषी पंपाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याचा लाभ कसा मिळू शकतो, याबाबत महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. डबलीपूरच्या सरपंच सरला भलावी यांच्यासह लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांनी माहिती स्टॉलला भेट देत योजनांची माहिती जाणून घेतली. उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# दुष्काळी पंचनाम्यांना वेग; अधिकारी थेट शेताच्या बांधावर

## केळझरमध्ये सोयाबीन, कपाशी, तुरीच्या नुकसानीची पाहणी; पंचनाम्यावेळी उपस्थित राहण्याचे तहसीलदारांचे आवाहन

**सेलू/जनमाध्यम**
पावसाअभावी सोयाबीन, कपाशी आणि तूर पिकांच्या उत्पादनात घट होत असल्याने सेलू तालुक्यात दुष्काळी पंचनाम्यांना वेग आला आहे. केळझर येथे ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, कृषी सहायक आणि पोलीस पाटील यांनी शेताच्या बांधावर जाऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहितीही जाणून घेतली.

ग्रामविकास अधिकारी ईश्वर परतेकी, तलाठी अभिषेक शुक्ला, कृषी सहायक राजू माहुरे, पोलीस



पाटील प्रकाश खंडाळे आणि कोतवाल तालीम सय्यद यांनी शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी दिल्या. यावेळी पावसाच्या अनियमिततेमुळे पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम आणि संभाव्य उत्पादन घट यांचा आढावा घेण्यात आला. दरम्यान, पात्र शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी शेतकऱ्यांनी पंचनाम्यावेळी शेतात उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांनी केले आहे. आधार क्रमांक, बँक खात्याची माहिती, फार्मर आयडी आणि आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. पंचनामा अपूर्ण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन माहिती पूर्ण करून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

# राष्ट्रसंतांच्या विचारांचा जागर; मानस मंदिरात पुण्यतिथी महोत्सव

## १० ऑक्टोबरपासून तीन दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**
समाजप्रबोधन, मानवता, बंधुता आणि ग्रामविकासाचा संदेश देणारे वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त येथील तुकडोजी विचार प्रतिष्ठानच्या मानस मंदिरात १० ऑक्टोबरपासून तीन दिवसीय पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. भजन, प्रवचन, सामुदायिक ध्यान, सर्वधर्मीय प्रार्थना आणि मौन श्रद्धांजली अशा विविध कार्यक्रमांतून राष्ट्रसंतांच्या विचारांना उजाळा दिला जाणार आहे. शनिवारी १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी तीर्थस्थापनेने महोत्सवाचा प्रारंभ होईल. यानंतर तालुका सेवाधिकारी प्रकाश राऊत यांचे भाषण आणि भजनाचा कार्यक्रम होईल.रविवारी ११ ऑक्टोबर रोजी सकाळी मधुकर वाघमारे यांच्या मार्गदर्शनात परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात येईल. हभप काळे महाराज यांचे ध्यानविषयक प्रवचन, रामधून आणि विजय मंथनवार यांचे मार्गदर्शन होईल. दुपारी अडीच वाजता हभप पुण्यदासजी चरडे व संच श्रद्धांजलीपर भजने सादर करतील. सायंकाळी ४ वाजून ५८ मिनिटांनी मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल. प्रा. नितीन ठाकरे राष्ट्रसंतांच्या आर्त संदेशाचे वाचन करतील.यानंतर सर्वधर्मीय प्रार्थना होणार असून घनश्याम चौधरी यांचे भाषण होईल. भजनानंद कार्यक्रमात हरिदास बेलोणकर, प्रल्हाद गोलाईत, नागेश तागडे, वसंत भांडेकर, मयूर ढुमणे, शालिग्रामजी वानखेडे, डॉ. गजानन बोबडे आणि अजय मंथनवार सहभागी होतील. सोमवारी १२ ऑक्टोबर रोजी सकाळी मीनाताई पठाडे सामुदायिक ध्यान या विषयावर भूमिका मांडतील. सकाळी १० वाजता विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित 'मानस'चे प्रकाशन जिल्हा पेन्शनर संघटनेचे अध्यक्ष अरविंद गौरशेट्टीवार यांच्या हस्ते होईल. या कार्यक्रमाचे आयोजन मारोती बरडे व निर्मला किनगावकर करणार आहेत. सकाळी ११ वाजता हभप प्रशांत मानमोडे यांचे कालाकीर्तन होईल. देवराव कांबळे, उत्तम फरताडे, गजानन डेबे, ज्ञानेश्वर खडसे, गजानन लाखे व अन्य कलावंत साथसंगत करतील. सायंकाळी समारोपीय कार्यक्रमाने महोत्सवाची सांगता होईल. राष्ट्रसंतांचे विचार केवळ स्मरणात न ठेवता ते आचरणात आणण्याचा संकल्प या महोत्सवातून केला जाणार आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उत्सव समितीचे प्रमुख प्राचार्य बाळासाहेब धनवटे यांच्यासह प्रफुल्ल इंगोले, किशोर फरताडे, शोभा जाधव, प्राचार्य सतीश जगताप, अजय ठाकरे, अल्का देशमुख, वनिता देशमुख, मनोज



उईके, नारायण पिसूड्डे, प्रा. केचे, रुशील काकडे, प्राचार्य डॉ. हवा, नितीन निंबलवार, सिंधुताई वाघमारे, सुमित्रा डम्भे, श्रीमती भोयर, जयश्री वाडेकर आणि अन्य कार्यकर्त्यांनी केले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३१३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,दर्यापुर

Email- tah.daryapur@gmail.com Tel No-०७२२७-२३४२३४
क्रमांक/मह. सहा/प्रस्तु-१/कावि/१०८६/२०२६ दिनांक-६/१०/२०२६

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, **अर्जदार श्री. लक्ष्मण उकर्डाजी साऊरकर रा. भुजवाडा ता.दर्यापुर यांनी मौजा भुजवाडा ता. दर्यापुर** येथील गट क्रमांक २२२ क्षेत्र ०.६२ हे. आर या सदर शेतजमिनीला कुळ घोषीत करुन सदर शेतजमिनीचे खरेदी प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती अर्ज कार्यालयात सादर केला आहे.त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. मौजा भुजवाडा ता. दर्यापुर येथील गट क्रमांक २२२ क्षेत्र ०.६२ हे. आर या सदर शेतजमिनीला कुळ घोषीत करुन सदर शेतजमिनीचे खरेदी प्रमाणपत्र मिळणेबाबत जर कोणाची हरकत किंवा अक्षेप अथवा तक्रार असल्यास अथवा प्रकरणात काही म्हणावयाचे असेल तर त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ०७ दिवसा नंतर जर कोणाची हरकत किंवा अक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच प्रकरणात कोणालाही काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल.

शिक्का

**तहसिलदार, दर्यापुर**

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री.. एस. एस. भिंगारदेव, ७वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज :- १८८९/२०२६ **यश वि निरंक** पुढील तारीख २६.१०.२०२६

### जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार-1-Yash Ravindrao Kaware** Age 28 Years, Occu: Pvt Job R/o Ward no 46 Near Pusad Bank, Badnera road Rajkamal Chowk, Amravati Tq. & Distt.Amravvati

विरुध्द- गैरअर्जदार-**NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत Ravindra Pralhadrao Kaware हे दि. ०४.०७.२०२० रोजी धारणी ता. धारणी, जि अमरावती येथे मयत झाले अर्जदार **यश रविंद्र कावरे** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **यश रविंद्र कावरे** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि.०८.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**Chetan Tulshiram Aglawe +4 Versus NIL e**

किरकोळ अर्ज क्रमांक -२००२/२०२६ पुढील तारीख :- ०५.११.२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants- 1) Chetan Tulshiram Aglawe** Age 61 Yrs Occ-Labour,
**2) Roshan Tulshiram Aglawe,** Age 60 yrs, Occ-Labour,
**3) Sujata Tulshiram Aglawe,** Age 55 yrs, Occ-Household,
**4) Nanda Charandas Ganjare,** Age 66 yrs, Occ- Household, 1 to 4 R/o Mata Fail Old Town, Badnera, Tq & Dist. Amravati.
**5) Vrunda Madhukar Kapse,** Age-56 yrs, Occ-Household, R/o Pawan Nagar, New Town, Badnera, Tq & Dist. Amravati.

**==Versus== Non- Applicants**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Indubai Tulshiram Aglave** हे दि. २३.१०. २०१५ रोजी अमरावती येथे मयत झाले **Chetan Tulshiram Aglawe +4 Versus NIL** यानी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** ामाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Chetan Tulshiram Aglawe +4 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि ०११० २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर अमरावती**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२०९२/२०२६**
**Ananda Januji Daroli + others Versus NIL**
**पुढील ता.१८.११.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants :-**

1. **Ananda Januji Daroli,** Aged about 81yrs. Occ.- Nil
   R/o. Bari Pura, Juni Vasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
2. **Shamrao Januji Daroli (Dead)** Through his legal heir
2a) **Shubham Shamrao Daroli**, Age 59 yrs. Occ.- Labourer,
   R/o. Bari Pura, Juni Vasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
3. **Bhimrao Januji Daroli (Dead)** Through his legal heirs
3a) **Smt. Shobha Bhimraoji Daroli,** Aged about 75 yrs. Occ.- Housewife
   R/o.Near Baripura Chowk, Baripura, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati
3b) **Hemant Bhimraoji Daroli,** Aged about 53 yrs. Occ.- Service
   R/o.Maniband Complex, Co-op. Housing Society, A-21, Sinhgad Road, Vadgaon, Budruk, Pune, City Pune
3c) **Anil Bhimraoji Daroli,** Aged about 48 yrs. Occ.- Business
   R/o.Rosewood, A-7, Riddhi Siddhi, Paradise Sinhagad Road, Vadgaon, Budruk, Pune, City Police
3d) **Sudhir Bhimrao Daroli (Dead)** Through his legal heirs
3.d.i) **Smt. Meena Sudhir Daroli,** Aged about 46 yrs. Occ.- Housewife
3.d.ii) **Ku. Sharayu Sudhir Daroli,** Aged about 19 yrs. Occ.- Student,
   (3.d.i) and (3.d.ii) Both R/o. Near Baripura Chowk, Baripura, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati

-- Versus --

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Januji Laxman Daroli** हे दिनांक **०२.११.१९८८** रोजी **अमरावती** येथे मयत झाले.**Ananda Januji Darol + others Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Ananda Januji Darol + others Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०६.१००.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

शिक्का

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ३६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,दर्यापुर

Email- tah.daryapur@gmail.com Tel No-०७२२७-२३४२३४
क्रमांक/मह. सहा/प्रस्तु-१/कावि/११००/२०२६ दिनांक-६/१०/२०२६

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, अर्जदार गजानन अरविंद घटाळे रा. ईटकी ता. दर्यापुर यांनी मौजा ईटकी ता. दर्यापुर येथील गट क्रमांक २७ क्षेत्र ५.०६ हे. आर या शेताचे ७/१२ चे इतर अधिकार मधील मुंबई कुळ वहिवाटदार व शेतजमीन विदर्भ विभाग कायदा १९५८ मधील कलम ८ अन्वये प्रसिध्द केलेल्या यादी प्रमाणे रामचंद्र यांचे नाव स.नं. ५१ कुळ म्हणुन दर्ज करण्यात आला ही नोंद कमी करुन मिळणे बाबत विनंती अर्ज कार्यालयात सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. मौजा ईटकी ता. दर्यापुर येथील गट क्रमांक २७ क्षेत्र ५.०६ हे. आर या शेताचे ७/१२ चे इतर अधिकार मधील मुंबई कुळ वहिवाटदार व शेतजमीन विदर्भ विभाग कायदा १९५८ मधील कलम ८ अन्वये प्रसिध्द केलेल्या यादी प्रमाणे रामचंद्र यांचे नाव स.नं.५१ कुळ म्हणुन दर्ज करण्यात आला ही नोंद कमी करुन मिळणे बाबत जर कोणाची हरकत किंवा अक्षेप अथवा तक्रार असल्यास अथवा प्रकरणात काही म्हणावयाचे असेल तर त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत आपली कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर प्रकरणात कोणालाही काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल.

शिक्का

**तहसिलदार, दर्यापुर**

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्जः-२१०७/२०२६ **श्रीमती लतीका सात वि निरंक** पुढील तारीख ३१.१०.२०२६

### जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार 1.Smt. Lalita Dhyaneshwarrao Patshe** Age 59 years, Occu: Housemaker R/ow/o Dhyaneshwarrao Patshe, Akoli Road, Bhamti Maharaj Mandir Amba Vihar, H. V. P. M. Amravati **2.Shri. Yogesh Dhyaneshwarrao Patshe** Age 38 years, Occu: Service R/o S/o Gyaneshwar Patshe Akoli Road, Bhamti Maharaj Mandir Amba Vihar, H. V. P. M. Amravati **3. Sau. Karuna Parmanand Katolkar** @Kul Karuna Dhyaneshwarrao Patshe Age 36 years, Occu: Housemaker R/o W/o Parmanand Katolkar, Nijampur Post Bopapur, Tq. Achalpur, Distt.Amravati **4. Sau. Anuradha Ritesh Deshmukh** @Ku. Anuradha Dhyaneshwarrao Patshe Age 33 years, Occu: Housemaker R/o C/o Ritesh Deshmukh, Lahan Arvi Tq. Ashti, Distt. Wardha

**विरुध्द- गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Dhyaneshwarrao Tukaramji Patshe** दि. ०७.०८२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Lalita Dhyaneshwarrao Patshe + 3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827, CLUBBED WITH SECTION 304 OF CIVIL MANUAL ACT FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Smt. Lalita Dhyaneshwarrao Patshe + 3** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर, अमरावती.**

शिक्का

---

## जाहिर नोटिस

### अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश-०३, यांचे न्यायालय

किरकोळ दिवाणी अर्ज क. २९५/२०२६ ने.ता. ०३/११/२०२६

**Applicant :- 1. Mrs. Priyanka Jitendra Kakde**
**Age: 35, Occu. Private Job, R/o. C/o. Ujawala Wakode, Priya Township, Shegaon Rahatgaon Road, Amravati Tq. Dist. Amravati (Acting as the Natural Guardian and Mother of Minor Son Rudra Jitendra Kakde)**

**..v/s.. Non Applicant :-Nill**

**AN APLICATION UNDER SECTION 8 (2) OF THE HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT, 1956 READ WITH SECTION 29 AND 31 OF THE GUARDIAN AND WARDS ACT, 1890 SEEKING PERMISSION TO SELL THE IMMOVABLE PROPERTY**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ०३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**Property Discription- Property 1.** Agricultural land situated at Mouje Raipur, Tq. And Dist. Amravati, under Gat/Survey/Subdivision No. 19/1/B (Class-1) the Southern Portion measuring 0 Hectare 06 R out of total area 0 Hectare 56 R (Assessment Rs. 6.68 Paise)**Property 2.** Agricultural land situated at Mouje Raipur, Tq. And Dist. Amravati, under Gat/Survey/Subdivision No. 18/1 (Class-1) measuring 0 Hectare 75 R (Assessment Rs. 6.68 Paise)**Property 3.** The Total integrated parcel of land trasferred to the minor measures 0 Hectare 81 R, uniquely identified by boundaries GEDB in the Private map annexed as Appendix 'A' to the court-decreed compromise.

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक ०३.११-२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ०३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दोष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.आज दिनांक १०.२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला.

अमरावती दिनांक : ०८.१०.२०२६

**आदेशानुसार,**
**सहा. अधिक्षक (न्यायीक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१९५४/२०२६**
**सुषमा + १ - वि.- निरंक**
**पुढील ता.१६.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**

1. **Smt.Sushma Dattatray Joshi,** Age 74 yrs. Occ.-Homemaker
   R/o. w/o. Dattatray Joshi, Behind Sonar Wada Budhwara, Amravati
2. **Sau. Krupali Milind Saraf @ Ku. Krupali Dattatray Joshi**
   Age 45 yrs. Occ.- Service
   R/o. W/o. Milind Saraf, Prabha Colony, Near Jalaram Nagar, Rukhmini Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Dattatray Gajanan Joshi** हे दिनांक **१६.०८.२०२४** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Sushma Dattatray Joshi + 1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Sushma Dattatray Joshi + 1** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२४.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ अमरावती**
**वि. श्री. आर. आर खामतकर अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज२०४७/२०१६ **सुमनबाई + २ वि निरंक** पुढील तारीख २६.१०.२०२६

### जाहिरनामा / सायटेशन

**१. सुमनबाई पुंडलिकराव कैकाडे** वय-७५ वर्षे, व्यवसाय निरंक
**२. दिवाकर पुंडलिकराव कैकाडे** वय ५९ वर्षे, व्यवसाय - व्यापार दोघेही रा. तेलीपुरा, जुनी वस्ती बडनेरा मराठी शाळेजवळ, ता. जि. अमरावती **३. रुख्मीणी चुडामन कावळे** वय ५६ वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. एन. एम. सी. शाळेजवळ, प्लॉट नं. १३५, न्यू ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड भगवान नगर, ता. जि. नागपू

**विरुध्द- गैरअर्जदार NII**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत पुंडलिक बोदलाजी कैकाडे** हे दि. १७०९२०१३ रोजी बडनेरा, ता. जि. अमरावती येथे मयत झाले **अर्जदार सुमनबाई पुंडलिकराव कैकाडे + २** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्तु ममत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** त्यापेक्षा **सुमनबाई पुंडलिकराव कैकाडे +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दालविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयतः यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि.०३.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी**
**न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

शिक्का

---

## सायटेशन / जाहिरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत**
**आर.एम.जे.सी.क. ६५७/२०२६ ने.ता.०३/ १० / २०२६**

**अर्जदार १) श्री. अजाबराव भिमराव पंचाळे**, वय-५७ वर्ष, धंदा-मजुरी **२) श्री. पंजाब भिमराव पंचाळे,** वय-५५ वर्ष, धंदा-मजुरी दोघेही रा. खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती. **३) श्री. साहेबराव भिमराव पंचाळे,** वय ६० वर्ष, धंदा-मजुरी रा. वेंकय्यापुरा कॅम्प अमरावती, ता.जि. अमरावती. **४) श्री. शामराव भिमराव पंचाळे,** वय-४८ वर्ष, धंदा-मजुरी रा. शोभानगर अमरावती, ता.जि. अमरावती.

**// विरूध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण** दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांचे वडील **भिमराव आकोशराव पंचाळे** हे दिनांक १३/०६/२०२६ रोजी Vyankayyapura Amravati, Tq.Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.दिनांक :-०९/१०/२०२६

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि . श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्रमांक १९५१/२०२६ पुढील तारीख : १६.१०.२०२६**

**Sau. Jyoti Prakash Bangar @ Ku. Jyoti Kisanrao Dihade+ 1 Versus NIL**

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants- 1) Sau. Jyoti Prakash Bangar**@ Ku. Jyoti Kisanrao Dihade, Age 51 years Occ- Homemaker, R/o W/o Prakash Zimaji Bangar, Kapshi, Kalshi, Amravati Tal & Dist. Amravati.**2) Sau. Lakshmi Shankar Gadling** @ Ku. Lakshmi Kisanrao Dihade, Age 49 years Occ- Homemaker, R/o W/o Shankar Gadling, near Annabhau Sathe Nagar, Daroga Plot, Amravati Tal Dist. Amravati.

**==Versus== Non- Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत Shakuntala Kisanrao Dihade** हया दि. २३.१०. २०१५ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **Sau. Jyoti Prakash Bangar @ Ku. Jyoti Kisanrao Dihade+1 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Sau. Jyoti Prakash Bangar @ Ku. Jyoti Kisanrao Dihade+1 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सबहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :- १७०३/२०२६ पुढील तारीख :- ०३.१०.२०२६

**Swamini Nilesh Uplop Versus Rupesh Ramesh Redlawar,**

### जाहिरनामा / सायटेशन

**Applicants-1.Swamini Nilesh Uplop,** Aged 49 Years, Occu- Housewife, R/o C/o Babu Keshavrao Patrale, Plot No. 25, Shanti Nagar Road, Mahesh Nagar, Near Universal Farmacy, Nagpur City, Nagpur, Tq & Dist. Nagpur Rupesh Ramesh Radlawar,

**==Versus==**

Aged about 46 years, Occ- Service R/o Near Gajanan Maharaj Mandir, Hari Om Colony, Sai Nagar, Amravati, Tq & Dist. Amravati.

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत eceased Ramesh Janardanpant Redlawar हे दि. ०७.११.२०२२ रोजी अमरावती येथे मयत झाले.. अर्जदार Swamini Nilesh Uplop Versus गैरअर्जदार Rupesh Ramesh Redlawar यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत UNDER SECTION 2 OF BOMBAY APPLICATION REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा अर्जदार Swamini Nilesh Uplop Versus गैरअर्जदार Rupesh Ramesh Redlawar वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २००८-२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसाार**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

शिक्का

---

## -जाहीर नोटीस-

**विद्यमान आर.आर.खामतकर ३ रे न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०३)**

**कि.क्रि. अर्ज क्र.११३०/२०२६**

**अर्जदार- नागोराव रामचंद्र पकडे,**
**वय ७३ वर्ष, रा.बारीपुरा,**
नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती
**-विरुध्द -**
**गैरअर्जदार- निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
ग्रामपंचायत कार्यालय नांदगाव पेठ, ता. जि.अमरावती

ज्या अर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट क्र.३ मध्ये जन्म मृत्यू ची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३ (३) प्रमाणे यातील अर्जदार यांनी यांच्या मृत्यूची नोंद दिनांक २५/०७/२०१४ रोजी झाली आहे. अशी नोंद धरणेचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जासोबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपण आपल्या वकिलांमार्फत अगर स्वतः मा.कोर्ट क्र.३ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १६/११/२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास मा.कोर्ट क्र.३ पुढील योग्य तो हुकुम करतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**३ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**अमरावती**

शिक्का

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसव्दारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **श्री प्रमोद गुणवंतराव धोंडे, रा.महेंद्र कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती** यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी ॲड.डि.जी.आठवले, रा.हनुमान नगर, अमरावती जाहीर नोटीस देतो की,

मौजे तारखेडा, प्रगणे बडनेरा, शेत सर्व्हे नं. २३/३, मधील प्लॉट क्र.१२० याची एकूण क्षेत्रफळ १५२२ चौ.फुट (१४१.३९८ चौ.मी.) याची चर्तुसिमा :- पुर्वेस - प्लॉट नं. १२१, पश्चिमेस - प्लॉट नं.११९, उत्तरेस-रोड, दक्षिणेस- सर्व्हीस लाईन.

वर वर्णनांकित प्लॉटचे माझे पक्षकार खरेदीखताने मालक असून १९८८ पासून सदर प्लॉटवर घर बांधून राहत आहेत.सन १९८० ते १९८८ च्या काळात वर नमूद प्लॉटचा कोणासही व्यवहार झाला असल्यास कोणाचेही हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून आठ दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्यावर कागदपत्रांसह हरकती दाखल कराव्या. त्यानंतर माझे पक्षकार वारस हक्काने वर नमूद प्लॉटची नोद त्यांचे नावे करुन घेतील करिता ही जाहीर नोटीस.

**पत्ता :-**
**ॲड.डि.जी.आठवले**
रा.न्यु हनुमान नगर, अमरावती
पो.व्ही.एम.व्ही. ता.जि.अमरावती- ४४४ ६०४
मो.नं.- ९३२५६३०५४७

**सही/-**
**प्रमोद गुणवंतराव धोंडे तर्फे**
**ॲड.डि.जी.आठवले**
**अमरावती**

---

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टॅरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९, ९४२२१२०४०६**

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक १९५६/२०२६ पुढील तारीख १६.१०.२०२६

**अनिकेत व २ वि निरंक**

### जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार 1-Aniket Anil Wankhade** Aged 32 Years, Occu: Private Job R/o 68-A, Samta Colony, Kathora Road V. M. V. Amravati **2-Bhavana Anil Wankhade** Aged 61 Years, Occu: Homemaker R/o 68-A, Samta Colony, Kathora Road V. M. V. Amravati **3-Mrunali Ajinkya Tayde** Aged 37 Years, Occu: Business R/o W/o Ajinkya Tayde R/o A-702 Sai Residency, Indrayani Nagar, Priyadarshani School, Sector-7, Pune City, Pune

**विरुध्द-गैरअर्जदार-NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Anil Janrao Wankhade** हे दि. ०४.०५.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले अर्जदार **Aniket Anil Wankhade + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा Aniket Anil Wankhade + 2 वरीलप्रमाणे सदहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २४.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर, अमरावती**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती**
**वि . श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक १९५३/२०२६ Sandip Hariharrao Tathode+ 1 Versus NIL ने.ताः १६.१०.२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants 1) Sandip Hariharrao Tathode,** Age 58 yrs, Occ-Service, R/o Behind Rangoli Lawn Konark Colony, VMV Amravati Ta & Dist. Amravati. **2) Prashant Hariharrao Tathode,** Age 55 yrs, Occc- Service, R/o Near hanuman mandir, Urvashi Nagar, Kathora Road, Amravati Tal & Dist. Amravati

**==Versus== Non-Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत Harihar Nagorao Tathode** हया दि. ०५.०४. २०२६ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **Sandip Haribhau Tathode+ 1 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Sandip Haribhau Tathode+ 1 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :-१८८२/२०२६ **धिरज १ वि निरंक** पुढील तारीख २८.१०.२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**अर्जदार**-1-Dhiraj Balkrishna Mudholkar Aged -36 years, Occu-Business R/o Near Water Tank, Wadarpura, Rukhmini Nagar, Amravati 2-Mala Krushna Pithekar Aged -48 years, Occu- Household R/o Near Water Tank, Wadarpura, Rukhmini Nagar, Amravati

**गैरअर्जदार**-1- Dipak Balkrishna Mudholkar Aged-39 years, Occu-Business R/o Wadarpura, Camp Rukhmini Nagar, Amravati 2-Usha Nagesh Kusalkar Aged -40 years, Occu-Household R/o Swa-Swarup Building Flat No. 13/7, Sector No. 1,3-Indrayaninagar, Bhosari, Pune Shalini Raviraj Manjule Aged-39 years, Occu-Household R/o Gajrai Niwas Bank Colony, Near Police Canteen, Osmanabad 4 Asha Sanjay Giradkar Aged -46 years, Occu-Household R/o 1248, Hingana Road, Ward No. 2 Sai Colony, Wandadongri, Nagpur

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Vachhala Balkrishna Mudholkar** हे दि. ०६.१२.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार Dhiraj Balkrishna **Mudholkar + 1-Vs- Dipak Balkrishna Mudholkar +3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OFOF BOMBAY APPLICATION REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.Dhiraj Balkrishna Mudholkar + 1-Vs- Dipak Balkrishna Mudholkar +3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न वाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत मांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

शिक्का

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२०९०/२०२६**
**Chandrashekhar Bajranglal Varma + 4 Versus NIL**
**पुढील ता.१८.११.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants :-**

1. **Chandrasheekhar Bajranglal Varma,**
   Aged about 53 yrs. Occ.- Business
   R/o. Near Doodh Dairy, Dasara Maidan Road, Ganesh Colony, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Geetadevi Bajranglal Varma,** Aged about 70 yrs. Occ.- Household
   R/o. Near Doodh Dairy, Dasara Maidan Road, Ganesh Colony, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. **Tara Radheshyam Roda,** Aged 55 yrs. Occ.- Household
   R/o. Plot No.11,Mayur Colony, Jaihind College Road, Deopur,Dhule
4. **Rani Mahesh Varma,** Aged about 50 yrs. Occ.- Household
   R/o. 1001, 1002, Sadguru Garden, Carnations, Near Mangla High School, Kopari Colony, Thane (east), Thane
5. **Jyoti Anand Soni,** Aged about 46 yrs. Occ.- Household
   R/o. C/o. Anand Soni, 6-3-473, Flat No. 5-C, Koundinya Apartment, Street No.5, Himayathnagar, Hyderbad, Telangana.

-- Versus --

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Bajrnglal Chotelal Varma** हे दिनांक **२९.०८.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **Chandrasheekhar Chotelal Varma + 4 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Chandrasheekhar Chotelal Varma + 4 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०७.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

शिक्का

# नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी भाविकांची गर्दी उसळणार

## रुप बदलणारी पिंगळाई गडावरची पिंगळादेवी



**लेहेगाव/वार्ताहर**

पूर्वाभिमुख मोहक चेहरा, तेजस्वी डोळे, उंच कपाळ, मधोमध चंद्रकोर व कुमकुम डोक्यावर, वस्त्र परिधान केलेली पिंगळाई माता दिवसातून तीन वेळा रूप बदलते. सकाळी बाळ, दुपारी तरुण, आणि सायंकाळी ती वृद्ध असते असे भाविक मानतात. जिल्ह्यातील अमरावती मोर्शी रस्त्यावर गोराळा बस स्थानकावरून पूर्वेस एक किलोमीटर अंतरावर निसर्गाच्या सानिध्यात टेकडीवर पिंगळा देवीचे हे ऐतिहासिक मंदिर आहे. देवीच्या मूर्तीचे धड जमिनीच्या आत तर केवळ शिर वर आहे ,असे सांगितले जाते. पिंगळाई देवीच्या मंदिराचा व सभोवतालचा गाभारा हेमाडपंथी बांधणीचा आहे. मंदिराच्या समोर दीपस्तंभ आहे.

येथे वर्षातून शारदीय व चैत्र नवरात्र साजरा केला जातो.पौष महिन्यात चंडिका महायज्ञं उत्सव साजरा केला जातो.मंदिरापासून शंभर मीटर अंतरावर कापूर तलाव आहे. नागपूरकर भोसल्यांनी हा तलाव बांधल्याचे सांगितले जाते.शारदीय नवरात्र उत्सवात अश्विन शुद्ध अष्टमीला रात्री बारा वाजता मंदिरापासून तलावापर्यंत खापरी काढण्यात येते. खापरी म्हणजे मातीच्या मडक्यात ध्वनी पेटवून ती पुजाऱ्याने डोक्यावरून नेणे. या खापरीच्या दर्शनाकरिता परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धशक्तीपीठ असलेली पिंगळाई गडावरील पिंगळा देवीच्या मंदिरात नवरात्र निमित्त दहा दिवसाची पूजा उद्यापासून सुरू होत असून पिंगळा देवीचे दर्शन घेण्याकरिता विदर्भातून नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातून दर्शनाचा लाभ घेण्याकरिता जनसागर लोटणार आहे. यावर्षी ११ ऑक्टोबर पासून ही पूजा सुरू होत असून नवरात्रीच्या दहा दिवसाच्या काळात २० ऑक्टोबर पर्यंत विश्वस्त मंडळांनी अनेक सामाजिक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

यावर्षी पिंगळा देवी विश्वस्त मंडळाने भाविक भक्तांसाठी अनेक सुविधा, व्यवस्था केली असून कायदा सुव्यवस्था सांभाळण्याकरिता अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम साहेब यांचे मार्गदर्शनात व उपविभागीय पोलीस अधिकारी मोर्शी उमेश पाटील साहेब, शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार ईश्वर वर्गे साहेब यांनी चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे. पिंगळादेवीच्या दर्शनाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आव्हान पिंगळादेवी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विनीत पाखोडे, सचिव आशिष मारुडकर, मंदिराचे विश्वस्त पदमाकरराव पाखोडे मंदिराचे मुख्य पुजारी संदीप मारुडकर यांनी केले आहे.

# दिवाळीपूर्वी कोल्हापुरी बंधाऱ्यांचे पाणी अडविण्याची मागणी

**मेळघाट/वार्ताहर**

यावर्षी तालुक्यात पर्जन्यमान कमी झाल्याने आगामी काळात मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा परिषद पाटबंधारे विभागाच्या धारणी मुख्यालयांतर्गत असलेल्या सर्व कोल्हापुरी बंधाऱ्यांना दिवाळीपूर्वी गेट लावून पाणी अडविण्याची मागणी होत आहे.

धारणी मुख्यालयांतर्गत दोन पाटबंधारे विभाग कार्यरत आहेत. या विभागाच्या अखत्यारित हरिचाल, कढाव, उतावली, करदा आदी परिसरात शिंपना नदीवरील कोल्हापुरी बंधारे आहेत. तसेच गडगा नदीवर धुळघाट, माणसू, धावडी, रोहणी, खेडा आदी ठिकाणी कोल्हापुरी बंधारे कार्यरत आहेत. डवाल नदीवरही चार ते पाच कोल्हापुरी बंधारे असून, विविध गावांमध्ये नदी-नाल्यांवर पाणी अडविण्यासाठी मोठ्या प्रमाणात सिमेंट बंधारे बांधण्यात आले आहेत.

यंदा पावसाळ्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने संपूर्ण तालुक्यात पाण्याची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा जास्तीत जास्त काळ टिकवून ठेवण्यासाठी कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये युद्धपातळीवर पाणी अडविणे आवश्यक आहे. बंधाऱ्यांना गेट लावल्यानंतर पाण्याचा अनावश्यक विसर्ग होऊ नये तसेच बंधाऱ्यांमधून पाण्याची गळती होणार नाही, याची विशेष दक्षता घेणे गरजेचे आहे.यासाठी दोन्ही पाटबंधारे विभागांचे उपअभियंता तसेच सर्व सहाय्यक अभियंत्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील बंधाऱ्यांची पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

पाणी अडविल्यानंतर त्याचा गैरवापर होऊ नये यासाठी तालुका प्रशासनाने संबंधित परिसरातील सर्व तलाठ्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशीही मागणी करण्यात येत आहे.

पुढील पावसाळा सुरू होण्यास अद्याप सुमारे आठ महिन्यांचा कालावधी असल्याने अडविलेले पाणी काटकसरीने वापरणे अत्यंत आवश्यक आहे. तालुक्यातील उपलब्ध जलसाठा दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच योग्य नियोजन, देखरेख आणि पाणी वापराबाबत आवश्यक दक्षता घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# रविवारी संदिपपाल महाराज गिते यांचे मासोद येथे समाजप्रबोधनपर कीर्तन

**अंजनगाव बारी**-मासोद येथे 'एक गाव, एक दुर्गा' या संकल्पनेतून नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून, मानवता नवदुर्गोत्सव मंडळाच्या वतीने यंदा २६ वर्षांची परंपरा कायम राखण्यात आली आहे. नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. घटस्थापनेच्या शुभपर्वावर सप्तखंजेरी निर्माते, समाजप्रबोधनकार तथा सत्यपाल महाराजांचे शिष्य संदिपपाल महाराज गिते (रंभापूरकर) यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. हे कीर्तन रविवार, ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ८.३० वाजता मेन चौकातील दुर्गादेवी प्रांगण, मासोद येथे होणार आहे. कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजजागृतीचा संदेश देण्यात येणार आहे. 'एक गाव, एक दुर्गा'च्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये एकजूट व सामाजिक बांधिलकीचा जागर करण्यात येत आहे. या समाजप्रबोधनपर कीर्तनाचा व नवरात्रोत्सवातील विविध कार्यक्रमांचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मानवता नवदुर्गोत्सव मंडळ, मासोद यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत चोबिता येथे 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित

**चिखलदरा/वार्ताहर**



जिल्हा परिषद कृषि विभागामार्फत सेवा संकल्प अभियानांतर्गत चिखलदरा तालुक्यातील चोबिता गावाला प्रत्यक्ष भेट देऊन बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत नवीन विहिरीचा लाभ मिळालेल्या बुडी रावजी कास्देकर या लाभार्थ्याच्या घरी 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्यात आला.

जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके,कृषि विकास अधिकारी मल्ला तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.सदर भेटीदरम्यान निलेश राठोड,जिल्हा कृषी अधिकारी,(वि.घ.यो.) तसेच अश्विन राठोड, कृषी अधिकारी,पंचायत समिती चिखलदरा हे उपस्थित होते.यावेळी लाभार्थी कुटुंबाशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत मोटर, पाईप, पंपसंच, परसबाग इत्यादी घटकांचा लाभ घेणे बाबत आवाहन करण्यात आले.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध कृषिविषयक योजना,सेवा व विकासकामे ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जमातीतील आदीवासी शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावे असे आवाहन निलेश राठोड जिल्हा कृषी अधिकारी(वि.घ.यो.) यांनी केले आहे आदीवासी बांधवांचे स्थलांतर कमी करुन योजनेच्या माध्यमातून त्यांच्या शेतीमध्ये खऱ्या अर्थाने क्रांती घडून येणार आहे.त्यासाठी जास्तीत जास्त आदीवासी शेतकरी बांधवांनी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

# ज्येष्ठ नागरिक संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी उत्तमराव गावंडे, तर सचिवपदी दत्तात्रय भोयर यांची निवड

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रश्नांना व समस्यांना वाचा फोडण्यासोबतच त्यांच्या सामाजिक, आरोग्यविषयक आणि कल्याणकारी उपक्रमांना चालना देण्यासाठी कार्यरत असलेल्या वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ज्येष्ठ नागरिक संघ, चांदूर रेल्वेच्या सन २०२६-२७ ते २०२७-२८ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. नुकत्याच पार पडलेल्या वार्षिक आमसभेत ही निवड करण्यात आली.

जेष्ठ नागरिक संघाचे मावळते अध्यक्ष हरिहर म्हसतकर यांच्या अध्यक्षतेखाली आमसभा पार पडली. यावेळी संघाच्या आगामी कार्यकाळासाठी विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी उत्तमराव गावंडे, उपाध्यक्षपदी रमेश राऊत, सचिवपदी दत्तात्रय भोयर, सहसचिवपदी दीपक देशमुख तर कोषाध्यक्षपदी मधुकर जोग यांची निवड करण्यात आली. तसेच संचालक म्हणून हरिहर म्हसतकर, निळकंठ दिघडे, विश्वास दामले, दिगंबर बकाले, देवशंकर विश्वकर्मा, सुमेरसिंह भैसे, बाबाराव अडसड आणि शामराव ठवकर यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी संघाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा समाजाला लाभ मिळावा, तसेच त्यांच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे काम करता यावे, यासाठी आगामी काळात संघाच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यावेळी संघाचे संचालक, पदाधिकारी, सभासद तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सदस्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नागरिक दिन आणि वार्षिक आमसभा यशस्वी करण्यासाठी निळकंठ दिघडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# व्यसनमुक्ती सप्ताह कारला येथे उत्साहात



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी**

जिल्हा समाज कल्याण विभाग, अमरावती आणि संकल्प व्यसनमुक्ती केंद्र, कारला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या व्यसनमुक्ती सप्ताहाचा सांगता समारोह संकल्प व्यसनमुक्ती केंद्र, कारला येथे उत्साहात झाला. या सांगता समारोहाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा उमा दाळू होत्या. तर संस्थेचे सचिव एम.एम.भांबेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सचिन भोरे, सचिनजी अब्रुक,डॉ.शोण ए.देशमुख, अरुणा दोड, श्रद्धा बोरसे, सोनाली पडोळे व गजानन खडसे आदी मान्यवर विचारमंचावर उपस्थित होते. विविध प्रभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत प्रभावी संचालन डॉ. शोण देशमुख यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सोनाली पडोळे यांनी मानले.हा व्यसनमुक्ती सप्ताह यशस्वी करण्यासाठी प्रतीक वानखडे, किशोरचंद्र नवले, वैभव ढोके, भारत तेलगोटे, विनोद धुमाळे आणि शोभाबाई साखरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या मोहिमेमुळे परिसरात व्यसनमुक्तीबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

# खल्लार पोलिस स्टेशन हद्दीत २१ ठिकाणी एक गाव एक दुर्गादेवी

**खल्लार**-नवरात्र उत्सवाला दि. ११ सप्टेंबरपासून सुरुवात होणार असून खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील २४ गावात दुर्गा देवीचे स्थापना होणार आहे. मोचर्डा येथे दोन,कसबेगव्हाण तीन, हयापूर दोन दुर्गा देवी स्थापन होणार आहे.हे तीन गावे वगळता उर्वरित २१ गावांमध्ये एक गाव एक दुर्गादेवी स्थापन होणार आहे.तर सात ठिकाणी शारदा देवीची स्थापना होणार असून खल्लार येथे दोन ठिकाणी शारदा देवींची स्थापना करण्यात येणार असून सहा गावात एक गाव एक शारदा सहा स्थापना होणार असल्याची माहिती खल्लार पोलिसांनी दिली आहे.खल्लार पोलिस स्टेशन हद्दीत नवरात्र उत्सव शांततेत पार पाडावा नियमांचे उल्लंघन करु नये याबाबतच्या सूचना सार्वजनिक मंडळाना देण्यात आल्या आहेत.नियमाचे उल्लंघन करणाऱ्या मंडळावर ठाणेदार अमोल मुडे यांच्या मार्गदर्शनात खल्लार पोलिसांचे बारकाईने लक्ष आहे.

## निधन

### उषा खुळे



**तिवसा**-येथील त्रिमूर्ती नगर स्थित रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका उषा जानराव खुळे (वय ७३) यांचे बुधवारी ७ ऑक्टोबर ला रात्री अल्पशा आजाराने नागपूर येथील हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्यावर गुरुवारी तिवसा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यापश्चात दोन मुले व मोठा आप्तपरिवार आहे.

### शालिनी गुळकरी



**नागपूर**-ज्येष्ठ पत्रकार रवीन्द्र (रवी) नारायण गुळकरी यांच्या मातोश्री शालिनी गुळकरी यांचे गुरुवारी ८ ऑक्टोबर ला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे वय ७९ वर्षे होते. त्यांच्या मागे वृद्ध पती, ३ मुले, मुलगी आणि आप्तेष्ट-चाहत्यांचा मोठा परिवार आहे. शुक्रवारी अंबाझरी घाटावर हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मराठी भाषा समृध्दीसाठी इतर अंगांनीही झाली पाहिजे-डॉ.विजया डबीर

## विद्यापीठात अभिजात मराठी भाषा सप्ताह उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषा ज्ञानभाषा करावयाची असेल, तर इंग्रजी भाषेतील ज्ञान आपल्या भाषेत आणले पाहिजे. आपण मराठी बोलतो, पण भाषेवर तितकंच प्रेम असावं. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून विज्ञानात प्रगती करा. मराठीतील वाङ्.मय इंग्रजी भाषेत नेले पाहिजे. सरकारवर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्यालाच आपली मराठी भाषा समृध्द करावी लागेल. मराठी समृध्द आहेच, पण इतरही अंगांनी ती आणखी संपन्न झाली पाहिजे, असे परखड मत अमरावतीमधील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विजया डबीर यांनी मांडले.

महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मराठी भाषा विभाग आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने'अभिजात मराठी भाषा सप्ताह' निमित्ताने विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात आयोजित 'अभिजात मराठी भाषेची समृध्द परंपरा' या विषयावर व्याख्यान देतांना डॉ. विजया डबीर बोलत होत्या. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. माधव पुटवाड उपस्थित होते.



विषयाची मांडणी करतांना डॉ. विजया डबीर म्हणाल्या, भाषा प्राचीन असली पाहिजे, वाङ्.मय असले पाहिजे आणि हे सर्व मराठी भाषेने पूर्ण केले आहे.त्या म्हणाल्या, भाषा अखंड बदलत असते. भाषेच व्याकरण बदलल्यामुळे हे होतं. प्राकृत भाषा बदलत गेल्या, हे सुलभीकरण होय. व्याकरण हा भाषेचा गाभा आहे. संस्कृतमधील स्वर मराठीत आले. लीळाचरित्र हा मराठीतला पहिला ग्रंथ आहे. मराठी जन्माआधी ती सगळीकडे होती. शीलालेख, ताम्रपट यावरुन ते स्पष्ट होते. अपभ्रंशातून मराठी जन्मली. मराठी भाषा ही बाराशे वर्षे जुनी असून जी मराठी आहे, तीच अभिजात आहे. मराठी भाषेला अधिक समृध्द करावयाचे असेल, तर मराठी भाषा सगळीकडे सक्तीची केली पाहिजे. आपण सुध्दा सगळीकडे मराठी भाषेत बोललो पाहिजे

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांचे शाल, श्रीफळ देवून स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकातून डॉ. मोना चिमोटे यांनी मराठी भाषा सप्ताह तसेच व्याख्यान आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. संचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार डॉ. प्रणव कोलते यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# श्रीमती नरसम्मा महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणालीवर आधारित राष्ट्रीय संमेलन

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जगद्गुरू श्री देवनाथ इन्स्टिट्यूट ऑफ वैदिक सायन्स अँड रिसर्च, नागपूर तसेच कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावतीच्या श्रीमती नरसम्मा महाविद्यालयात 'भारतीय ज्ञान प्रणाली के वैज्ञानिक, सांस्कृतिक और दार्शनिक आयाम' या विषयावर द्वी दिवसीय राष्ट्रीय संमेलन झाले.

उपरोक्त राष्ट्रीय संमेलनाचे उद्घाटक म्हणून अमरावती जिल्ह्यातील, रिद्धपूर येथे स्थापन झालेल्या मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी संत साहित्यावर आपले विवेचन मांडले.या राष्ट्रीय संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी अमरावतीच्या डॉ. हेडगेवार हॉस्पिटलचे प्रबंध संचालक डॉ. यशोधन बोधनकर म्हणाले की वेद-उपनिषदांपासून गणित-खगोलशास्त्रापर्यंत सर्व ज्ञानाचा समृद्ध वारसा भारतीय ज्ञानात आहे. या सत्रात संगाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, प्राचार्य राजेश चंदनपाट, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. विद्या शर्मा, हे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी मंचावर उपस्थित राष्ट्रीय संमेलनाच्या समन्वयक प्रा. डॉ. संजय शामकुवर यांनी सदर आयोजनाची भूमिका तसेच दोन दिवसांची रूपरेषा सविस्तरपणे विशद केली. उद्घाटन सत्राच्या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. निखिल मोहोड तसेच



आभार प्रा. डॉ. चिखलकर यांनी केले. त्याच दिवशी उपरोक्त राष्ट्रीय संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात - राष्ट्रीय गीत 'वंदे- मातरमच्या' सार्धशती निमित्त प्रेरक इतिहास अकोल्याचे युवा विचारवंत अंबरीश पुंडलिक यांनी मांडला.या राष्ट्रीय संमेलनाच्या अंतर्गत भारतीय ज्ञान प्रणालीचे विविध पैलू उलगडणारे २३ संशोधनपर लेख – संशोधक आणि प्रबुद्ध सहभागीं द्वारा प्रस्तुत करण्यात आले. राष्ट्रीय संमेलनाच्या दुसऱ्या नागपूर विद्यापीठातून आलेले देवनाथ पिठाचे तज्ञ व्याख्याते डॉ. श्रेयस कुऱ्हेकर यांनी भारतीय ज्ञान प्रणाली संबंधित अध्ययन-अध्यापन प्रक्रिया कशा प्रकारे करावी, त्याचे संदर्भ संशोधनात कसे वापरावेत, याविषयीचे सोपे उपाय उपस्थित प्राध्यापक वृंदांसमोर चर्चेद्वारे स्पष्ट केले.याच ज्ञानयज्ञाच्या चौथ्या सत्रात नागपूरचे पवन गुप्ता, यांनी मांडलेल्या चा विषय युवा संशोधकांना फारच उपयुक्त ठरल्याचे मनोगतामध्ये व्यक्त झाले.

सदर संमेलनाच्या समारोप सत्रात रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी नव्याने अभ्यासक्रमात समावेश केलेल्या आय. के. एस. या विषयाबाबत जागृतीचे व सकारात्मकतेने उपाययोजना करण्याचे प्रमाण कमी असल्याने, हे प्रमाण वाढविणे काळाची गरज असल्याची त्यांनी सांगितले.नागपूरच्या डॉ. कुऱ्हेकर व पवन गुप्ता या समारोपीय कार्यक्रमास विशेष निमंत्रित म्हणून मंचावर उपस्थित होते. या समापन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरसम्मा न्यासाचे प्रा.श्रीकांत काळीकर यांनी आपल्या मनोगतातून भारतीय ज्ञान प्रणालीचे अनेक आयाम या संमेलनात स्पष्ट झाल्याने, ज्ञानाचा प्रकाश सर्वांना योग्य मार्गावर घेऊन जाईल अशी आशा व्यक्त केली. या दोन दिवसीय राष्ट्रीय संमेलनाचे आभार महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. डॉ. संजय शामकुवर यांनी तर समारोपिय कार्यक्रमाच्या संचालनाचे दायित्व प्रा. शितल खापरे यांनी पार पाडले.

यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंदांनी अथक परिश्रम घेतले. संस्थेचे पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट यांच्या कुशल नियोजनाने हे द्वितीय राष्ट्रीय संमेलन उत्तमरीत्या झाले. संमेलनात ४ राज्यातील एकूण १९८ प्राध्यापक, संशोधक व प्रबुद्ध नागरिकांनी सहभाग नोंदविला. भारतीय ज्ञान-इतिहास -संस्कृती यांच्याशी संबंधित विविध विषयांवर अभ्यासपूर्ण सत्रे, चर्चा होऊन भारतीय ज्ञान प्रणाली वर आधारित दुसऱ्या संमेलनाचे सूप वाजले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत महिला व पुरुषाचा जागीच मृत्यू

## मोर्शीजवळ भीषण अपघात

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी शहरालगत असलेल्या मायवाडी फाट्याजवळ शुक्रवारी, ९ ऑक्टोबर रोजी रात्री ८:३० वाजेच्या सुमारास एक अत्यंत भीषण अपघात घडला. अज्ञात आयशर ट्रकने मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील महिला आणि पुरुष दोघांचाही जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृतक महिला आणि पुरुष हे आपल्या स्प्लेंडर मोटरसायकलने (क्रमांक: एमपी ४८ एन १५७१) स्वतःच्या गावाकडे जात होते. मायवाडी फाट्यानजीक पाठीमागून येणाऱ्या एका अज्ञात आयशर ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की, दोघेही रस्त्यावर कोसळले आणि गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन पुढील शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे हलवले.



दरम्यान, अपघातग्रस्तांजवळ मिळालेल्या मोबाईलमधील संपर्क क्रमांकावर ठाणेदार आठवले यांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो क्रमांक दुसऱ्या राज्यातील असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे मृत महिला व पुरुषाची ओळख अद्याप पटू शकलेली नाही. मोर्शी पोलीस या घटनेचा पुढील तपास करत असून अज्ञात वाहनधारकाचा शोध सुरू आहे.

# मोतीलाल ओसवाल फायनान्सकडून घराला सील

## वृद्ध आईसह कुटुंब रस्त्यावर



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** ऐन दुष्काळाच्या झळा सोसत असलेल्या अंजनगाव सुर्जी तालुक्यात माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. तालुक्यातील खोडगाव येथील एका भूमिहीन शेतमजूर कुटुंबाला भर दुष्काळात बेघर करण्यात आले आहे.खोडगाव येथील विवेक दुर्योधन रामेकर (वय ४३) या मोलमजुरी करणाऱ्या मजुराच्या घराला मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लि. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी, दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी साडेचार वाजता सील ठोकून कुलूप लावले. या कारवाईमुळे ६४ वर्षीय वृद्ध आई आशा दुर्योधन रामेकर, पत्नी आणि लहान मुलांसह संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विवेक रामेकर यांनी २०१८ साली आपल्या छोट्याशा घरासाठी २ लाख ५७ हजार रुपयांचे गृहकर्ज घेतले होते. त्याचा मासिक हप्ता ४ हजार रुपये होता. कुटुंबीयांच्या दाव्यानुसार आतापर्यंत त्यांनी (पान २ वर)

### कुटुंबाचा टोकाचा इशारा-

घराला कुलूप लागल्याने रस्त्यावर आलेल्या रामेकर कुटुंबाने आता टोकाचा इशारा दिला आहे. 'आम्हाला जर आमच्या घराचा ताबा परत मिळाला नाही आणि न्याय मिळाला नाही, तर आम्ही संपूर्ण कुटुंबासह आत्महत्या करू,' असा गंभीर इशारा विवेक रामेकर यांनी प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे खोडगावसह संपूर्ण तालुक्यात चिंतेचे आणि संतापाचे वातावरण पसरले आहे.

### फायनान्स कंपनीची भूमिका-

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील खोडगाव येथील भूमीहीन शेतमजूर विवेक रामेकर यांच्या घराला सील लावल्या प्रकरणी मोतीलाल ओसवाल फायनान्स कंपनीचे कलेक्शन मॅनेजर चेतन घुरडे तसेच सदर कंपनीचे लीगल अधिवक्ता मनीष शर्मा यांनी सांगितले की या प्रकरणात मुख्य जुडिशियल मॅजिस्ट्रेट अमरावती कोर्टाच्या आदेशानुसार ही कार्यवाही करण्यात आल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने उत्कृष्ट महिला व पुरुष शेतकरी पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

## ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विदर्भातील उत्कृष्ट महिला आणि पुरुष शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून त्यासाठी शेतकऱ्यांनी दि. ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज पाठवावेत, असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.भैय्यासाहेब पुजदेकर पाटील यांनी आज एका पत्रकार परिषदेत केले.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या कार्याचे स्मरण म्हणून दरवर्षी विदर्भातील पुरुष आणि महिला शेतकऱ्यांना उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कारासाठी प्रत्यक्ष शेतीत काम करणाऱ्या महिला तसेच पुरुष शेतकरी प्रस्ताव पाठवू शकतात. पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविणाऱ्या महिलेच्या किंवा तिच्या पतीच्या नावाने शेती असणे आवश्यक आहे.

सोबतच यशस्वी उत्पादन, रोपवाटिका, बीजोत्पादन, सेंद्रिय निविष्ठा उत्पादन व वापर, व्यवस्थापन साठवणूक, प्रतवारी, पॅक हाऊस, मूल्यवर्धन प्रक्रिया, विपणन, निर्यात इत्यादी कार्यात प्रत्यक्ष सहभागी होऊन या कार्यात अधिकाधिक नफा कमावणारी शेतकरी महिला आणि शेतकरी पुरुष या पुरस्कारासाठी पात्र ठरतात, अशी माहिती ॲड.जे. व्ही.पाटील यांनी यावेळी दिली. यांत्रिकीकरण, (पान २ वर)

# मोर्शीत काँग्रेस कमेटी तर्फे महावितरणच्या मनमानी करभाराविरोधात आंदोलन

**मोर्शी/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे सचिव विपुल भडांगे यांचे नेतृत्वात महावितरणच्या मनमानी कारभारा विरोधात, शेतकऱ्यांच्या विविध समस्या निकाली काढव्या या मागणीकरिता प्रचंड जनसमुदाया सह महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.





शेतकऱ्यांना शेतामध्ये विद्युत कनेक्शन ऐवजी सोलर पंप चा आग्रह करण्यात येऊ नये, शासनाकडे निधीची तरतूद नसेल तर DDF योजने अंतर्गत कनेक्शन देण्यात यावे, मोर्शी तालुक्यातील ग्रामीण व शहर भागातील नागरिकांच्या घरावरून गेलेल्या उच्चदाब व लघुदाब वाहिनी स्थानांतरित करण्याकरिता डीपीडीसी योजनेमध्ये तातडीने प्रस्ताव पाठवण्यात यावा,शेतकऱ्यांच्या कृषी पंपावरील विद्युत कनेक्शन दुष्काळ परिस्थिती असल्यामुळे बंद करू नये,शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे माफ केलेले वीजबिलाची रक्कम वजा करण्यात यावी जोपर्यंत शेतकऱ्यांना वैध विजपुरवठा केल्या जात नाही तोपर्यंत जरी नियमबाह्य असले तरी त्या शेतकऱ्यांचा विद्युत पुरवठा खांडित करू नये,शेतकऱ्यांना शेतातील वीज पुरवठा व्यवस्थित रित्या अखंडित देण्यात यावा तसेच ब्रेक डाऊन झाल्यास तात्काळ उपाययोजना करून शेतकऱ्यांना सुरळीतपणे वीज पुरवठा करून देण्यात यावा घरगुती वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर मुळे येत असलेले जास्तीचे वीजबिल कमी करण्यात यावे अशा मागण्या धरणे आंदोलनादरम्यान करण्यात आल्या.

महावितरण च्या कार्यालयात प्रवेश करताच काँग्रेस कार्यकर्त्यांनी व शेतकऱ्यांनी महावितरण च्या विरोधात प्रचंड नारेबाजी व घोषणाबाजी करून परिसर दनानून टाकल्यामुळे काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच महावितरण चे कार्यकारी अभियंता विजय कासट यांना कार्यालयाबाहेर बोलावून प्रत्येक प्रश्नाचा जाब (पान २ वर)

# भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी बाबूजी नळकांडे यांचे निधन

**खल्लार/प्रतिनिधीः-** भारतीय जनता पार्टीशी अनेक वर्षांपासून एकनिष्ठ राहून पक्षाच्या कार्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी बाबूजी उर्फ अरविंद नळकांडे यांच्या निधनाने दर्यापूर परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. धामोरी या छोट्याशा गावापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास थेट दिल्लीपर्यंत पोहोचला होता. आपल्या कार्याच्या जोरावर त्यांनी राजकीय वर्तुळात वेगळी ओळख निर्माण केली होती. पंतप्रधानांपासून ते राज्यातील वरिष्ठ नेत्यांपर्यंत त्यांचा परिचय होता.



पक्षाचे काम आणि संघटन मजबूत करण्यासाठी सतत कार्यरत असलेल्या बाबूजी नळकांडे यांचा गेल्या तीन दिवसांपासून दर्यापूर, मुंबई आणि इतर ठिकाणी पक्षाच्या कामानिमित्त दौरा सुरू होता. या धावपळीच्या प्रवासातही कुटुंबाशी असलेली त्यांची जवळीक कायम होती. मात्र, (पान २ वर)

# अमरावती शिक्षक मतदार संघात २६ उमेदवार रिंगणात

## प्रीती रेवणेंसह चौघांची माघार, महायुती व महाविकास आघाडीत बंडखोरीचे कायम

**अमरावती/प्रतिनिधीः** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी आज शुक्रवार ९ ऑक्टोंबर रोजी आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवारासह चार जणांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले, त्यामुळे आता २६ उमेदवार लढतीत आहेत.



दुसरीकडे महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरीचे चित्र कायम आहे. यामुळे उमेदवारांना मत विभागणीचा फटका बसणार आहे. शुक्रवारी शेवटच्या दिवशी युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवार ॲड. प्रीती रेवणे यांनी उमेदवारी मागे घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व उद्योग मंत्री उदय सामंत व मंत्री संजय राठोड यांच्या आग्रहा नुसार महायुतीचा धर्म पाळत आमदार रवी राणा यांनी एक पाऊल मागे घेतल्याचे सांगण्यात आले. तसेच (पान २ वर)

### संगीता शिंदे, शेखर भोयर यांची बंडखोरी-

विद्यमान आमदार किरण सरनाईक हे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आहेत. भाजपमधील बंडखोर उमेदवारांनी त्यांची डोकेदुखी वाढवली आहे. त्यांच्या विरोधात भाजपचे राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांच्या भगिनी संगीता शिंदे, भाजपचे बंडखोर चंद्रशेखर भोयर, सुमित पवार यांनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे. बंडखोरांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला जाईल, असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले होते, पण या बंडखोरांनी लढत देण्याचा निर्धार कायम ठेवला आहे. याशिवाय शिवसेना शिंदे गटाचेच नेते माजी आमदार प्रा. श्रीकांत देशपांडे लढतीत कायम आहेत.

# देशी दारुची वाहतूक करणारा युवक ताब्यात

## -खल्लार पोलिसांची कारवाई

**खल्लार/प्रतिनिधीः-** महिमापूर ते वाकी रोड दरम्यान दुचाकीवरुन अवैध देशी दारुची वाहतूक करणाऱ्या २८ वर्षीय युवकास खल्लार पोलिसांनी आज (दि.९) सायंकाळी पाच ते सहा वाजताच्या सुमारास पकडले असून त्याच्या जवळून ६२ हजार रुपयाचा मुद्देमाल ताब्यात घेऊन जप्त केला आहे.

सांगवा बु येथिल सुरज वासुदेव वरठे (वय २८) हा महिमापूर रोडने दुचाकीवरुन अवैध देशी दारुची वाहतूक करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली.त्याआधारे पोलिसांनी महिमापूर वाकी रोडदरम्यान दुचाकी थांबवून आरोपीकडून १८० मिलीच्या ९० पावट्या, ९० मिलीच्या ६० पावट्या अशी १२ हजार रुपयाची अवैध देशी दारु व ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी ताब्यात घेऊन जप्त केली. आरोपी सुरज वरठे विरुध्द खल्लार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. ही कारवाई ठाणेदार अमोल मुडे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम ठाणेदार सुनिल पवार, पोहेकॉ वेंकेश नाकील, अक्षय केतकर यांनी केली.

# दारूच्या नशेत मारहाण, ५ जण गंभीर

## नांदेड बुजुर्ग गावातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदेड बुजुर्ग या गावात दारूच्या नशेत सुरू झालेला वाद काही वेळातच रक्तरंजित संघर्षात बदलल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हाणामारीत महिलेसह ५ जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे.



राजकन्या डोंगरदिवे (वय ४५),अमोल रवींद्र डोंगरदिवे ,प्रदीप रवींद्र डोंगरदिवे सह पद्मा मन्ना सखवार, सुरज मन्ना सखवार, राजू मन्ना सखवार जखमी झाले आहे. सखवार कुटुंबातील तिन्ही सदस्यांच्या डोक्यावर गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

माहिती नुसार, गावातील मंदिराजवळ अमोल आणि सुरज हे दोघे बसलेले असताना त्यांच्यात कोणत्या तरी कारणावरून शाब्दिक वाद झाला. दोघेही दारूच्या नशेत असल्याचे सांगितले जात आहे. या वादानंतर प्रकरण इतक्यावर थांबले नाही तर दोन्ही कुटुंबातील सदस्य एकमेकांसमोर आले. बघता बघता वाद विकोपाला गेला आणि दोन्ही बाजूंकडून (पान २ वर)

# केंद्रीय पथकाकडून अमरावती विभागातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा

## वाशिम जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी

**वाशिम/प्रतिनिधीः-** केंद्र सरकारच्या आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथकाने आज अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीचा वाशिम येथे बैठकीद्वारे आढावा घेतला. त्यानंतर पथकाने वाशिम जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली.



केंद्रीय पथकात वरिष्ठ अधिकारी अर्जेश कुमार मधोक, महेश कुमार, सीमा रानी, संजय मीना आणि अभय भारत यांचा सहभाग आहे. पथकातील सदस्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी प्रवीणकुमार देवरे, अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना, वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि कृषी (पान २ वर)

# अभिजात मराठीचा अभिमान नव्या पिढीपर्यंत पोहचवा- डॉ. उदय सामंत

**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठी भाषेचा समृध्द वारसा, संत साहित्य आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा अभिमान नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्यासाठी प्रत्येक विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने डॉ. के.जी. देशमुख सभागृहामध्ये 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. (पान २ वर)



# अंबा- एकविरा देवी मंदिरांच्या सुरक्षेचा पोलीस आयुक्तांनी घेतला आढावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भाची कुलस्वामिनी आई अंबादेवी आणि एकविरा देवी मंदिरात नवरात्रौत्सवाच्या दरम्यान भाविकांची मोठी गर्दी उसळते. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडेकोट तयारी सुरू केली आहे.या अनुषंगाने पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुरुवारी सायंकाळी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत दोन्ही देवी मंदिर परिसराची पाहणी करून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना (पान २ वर)



# जिल्हा बँकेत 'प्रशासक राज'

## विभागीय सहनिबंधक श्रीनिवास पांढरे प्रशासक

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अखेर प्रशासक राज सुरू झाले आहे. विभागीय सहनिबंधक श्रीनिवास पांढरे यांची बँकेच्या प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. विभागीय सह निबंधक गौतम वर्धन यांनी यासंदर्भात आदेश जारी केले आहे.



बँकेच्या संचालक मंडळाचा पाच वर्षांचा कार्यकाळ समाप्त झाल्यानंतर आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातून याचिका फेटाळली गेल्यानंतर हा प्रशासकीय बदल झाला आहे. आता नवीन संचालक मंडळाची निवड होईपर्यंत बँकेचा संपूर्ण कारभार प्रशासक पाहणार आहेत. दुसरीकडे, बँकेच्या निवडणुकी बाबतही हालचाली (पान २ वर)


# ५० हजारांच्या खरेदीवर ७५०० चे होम डेकोर मोफत

## सोबत इलेक्ट्रिक स्कूटर जिंकण्याची संधी

### -Couchpuffy ची रॉयल फेस्टिव्ह सेल सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** या नवरात्री आणि दस-याच्या खास पर्वावर फर्निचर खरेदीची संधी आणखी खास झाली आहे. काउचपफी फर्निचर्सने रॉयल फेस्टिव्ह सेल आणि ग्रैंड लकी ड्रॉची सुरुवात केली आहे, ज्यामध्ये फर्निचरच्या खरेदीवर शानदार मोफत भेटवस्तूंसोबत इलेक्ट्रिक स्कूटरसह अनेक आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी दिली जात आहे. ड्रीमलैंड बिझनेस पार्क, रहाटगाव रोड, अमरावती येथे स्थित काउचपफी हे १ लाख चौरस फुटांचे प्रीमियम फर्निचर आणि होम डेकोर मॉल आहे, जिथे घरापासून ऑफिसपर्यंतच्या गरजांसाठी फर्निचर आणि होम डेकोरची मोठी रेंज एकाच छताखाली उपलब्ध आहे.





एकाच ठिकाणी संपूर्ण घराची खरेदी (पान २ वर)